# अनुक्रमणिका


**4**
प्रारंभिक
**मोदींनी हेगडेंचा राजीनामा घ्यावा**
– जयंत पाटील

**5**

प्रबंध संपादकीय
**दीडशेव्या शताब्दीतच विचारांना हरताळ**
– दिलीप वळसे पाटील

**6**

संपादकीय
**अर्थसंकल्प : अर्धवट व कल्पकतेचा अभाव**
– डॉ. सुधीर भोंगळे

**5**
**राष्ट्रवादी अल्पसंख्यांक विभाग बैठक, भाषणे**

१) शरद पवार – १०
२) अजित पवार – १२
३) जयंत पाटील – १३
**राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभाग बैठक, भाषणे**

१) शरद पवार – १५
२) जयंत पाटील – १६
३) धनंजय मुंडे – १८
४) जयदेव गायकवाड – २२

**26**

नवी दिल्ली वार्तापत्र
**अर्थसंकल्प : २०२०–२१**
**चाकोरीबद्ध व मागे जाणारा!**
– आकाश

**36**

एनआरसी, सीएए संबंधी चर्चासत्र
**हिंदू व्होटबँक उभारणी हाच अजेंडा**
– संकलन डॉ. सुधीर भोंगळे

**50**
**कृषक शेती प्रदर्शन, बारामती, भाषणे**

– शरद पवार
– उद्धव ठाकरे – ५४
– आमीर खान – ५८
– राजेंद्र पवार – ६२
– डॅन अल्युग – ६४

**66**

हलके–फुलके राजकीय किस्से
**कानोकानी**
– घंटाकर्ण

**78**
अर्थसंकल्पावर राष्ट्रवादी काँग्रेसची प्रतिक्रिया
**अर्थसंकल्पाने महाराष्ट्राचा अपेक्षाभंग**

– अजित पवार – ७८
– जयंत पाटील – ८०
– छगन भुजबळ – ८२
– सुप्रिया सुळे – ८४

**86**
**सीएए–एनआरसी आगीशी खेळ**
– गहिनीनाथ

**92**
**मराठवाडा युवावक्ता पारितोषिक वितरण समारंभ**

**98**
**मराठी राजभाषा सकारात्मक दृष्टिकोन हवा**
– हेमंत टकले

**102**

शेवटचे पान– **नवी रात्र मुंबईची**
– हेमंत टकले







राष्ट्रवादी
स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!
मूल्य ३० रु./ पृष्ठे १०४ । फेब्रुवारी २०२० । वर्ष १३ वे / अंक २

**संचालक**
**हेमन्त टकले**
**प्रबंध संपादक**
**दिलीप वळसे पाटील**
**संपादक**
**डॉ. सुधीर भोंगळे**
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस, जे.एन.हेरेडिया मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई–४०० ०३८
०२२–३०२३५५३०/५५/५६
**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर
**मांडणी**
दिलीप रोडे

**वर्गणीचे दर–**
**वार्षिक रु. ५००/–**
**वर्गणीचा धनादेश**
**'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'**
या नावाने काढावा.
www.ncp.org.in
यावर मासिक उपलब्ध

**मुद्रक, प्रकाशक**
**हेमन्त प्रभाकर टकले** यांनी **'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.'** च्या वतीने मीडिया आर ॲण्ड डी., १३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३, सेक्टर–३,आरएससी–२८, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई–४०००६७ येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई–४०००२० येथून अंक प्रकाशित केले.

## प्रारंभिक



# मोदींनी हेगडेंचा राजीनामा घ्यावा

**महात्मा गांधींच्या स्वातंत्र्य लढ्यालाच नौटंकी म्हणत एका नव्या वादाला तोंड फोडणारे अनंतकुमार हेगडे यांच्या वादग्रस्त वक्तव्याने संपूर्ण स्वातंत्र्य लढ्याचा आणि या लढ्यात जीवाची बाजी लावून लढणाऱ्या व शहीद होऊन हौतात्म्य पत्करलेल्या स्वातंत्र्यसैनिकांचा अपमान झाला आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हेगडे यांचा तात्काळ राजीनामा घेऊन त्यांना पक्षातून काढून टाकले पाहिजे.**



'महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्य चळवळ ही ब्रिटिश सत्ताधाऱ्यांशी केलेली तडजोड होती. ज्या स्वातंत्र्य सैनिकांनी कोणताही त्याग केला नाही त्यांनीच उपोषण, सत्याग्रहामुळे स्वातंत्र्य मिळाले या गोष्टीवर देशाला विश्वास ठेवण्यास भाग पाडले आणि ते महात्मा (महापुरुष) झाले'', अशी मुक्ताफळे भाजपाचे कर्नाटकमधील खासदार अनंतकुमार हेगडे यांनी उधळली आहेत.

माजी केंद्रीय मंत्री आणि भाजपाचे नेते असलेले अनंतकुमार हेगडे हे वादग्रस्त वक्तव्य करून, खळबळ माजवून, लोकप्रियता मिळविण्याच्या मागे लागलेले प्रसिद्धीलोलूप नेते आहेत. महात्मा गांधीसंबंधी त्यांनी जी विधाने केली आहेत त्याबद्दल पक्षाने त्यांना नोटीस काढल्याचे वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाले आहे. पण ते पुरेसे नाही. महात्मा गांधींच्या स्वातंत्र्य लढ्यालाच नौटंकी म्हणत एका नव्या वादाला तोंड फोडणारे हेगडे यांच्या या वादग्रस्त वक्तव्याने संपूर्ण स्वातंत्र्यलढ्याचा आणि या लढ्यात जीवाची बाजी लावून लढणाऱ्या व शहीद होऊन हौतात्म्य पत्करलेल्या स्वातंत्र्यसैनिकांचा अपमान झाला आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हेगडे यांचा तात्काळ राजीनामा घेऊन त्यांना पक्षातून काढून टाकले पाहिजे.

सध्या महात्मा गांधींचे १५० वे जन्मशताब्दी वर्ष चालू आहे. महात्मा गांधींचा जन्म ज्या गुजरातच्या भूमीत झाला त्याच भूमीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचाही जन्म झालेला आहे. गुजरातेत आणि संपूर्ण देशभर महात्माजींची १५०वी जयंती मोठ्या उत्साहाने साजरी होत असताना हेगडे यांनी अशा प्रकारची विधाने करणे हे भाजपाला कमीपणा आणणारे व पक्षाची बदनामी करणारे आहे. यापूर्वीही भोपाळच्या खासदार साध्वी प्रज्ञा यांनी महात्मा गांधींची ज्या नथुराम गोडसेने हत्या केली त्याचे उदात्तीकरण व गौरव करणारी विधाने केली होती. त्यावेळीही साध्वींना पक्षाने फक्त नोटीस व समज दिली. पण त्यांच्यावर काहीही कारवाई केली नाही. 'म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण काळ सोकावतो,' अशी आपल्याकडे मराठीत एक म्हण आहे. तिचे प्रत्यंतर आता पुन्हा येते आहे. साध्वीही रोज निरनिराळी समाजविघातक वक्तव्ये करतेच आहे. त्यात आता हेगडेंची भर पडली आहे. असे अनेक भणंग नेते भाजपाकडे आहेत जे जाणीवपूर्वक समाजामध्ये विद्वेष पसरवून शांतता व सलोखा संपुष्टात कसा येईल व हिंदू-मुस्लिमांमध्ये तेढ कशी वाढीला लागेल यांचा हेतूतः व विचारपूर्वक प्रयत्न करताना दिसत आहेत.

महात्मा गांधी यांचे नाव घेऊन भाजपा सत्तेत आला आहे. त्याच गांधीजींचा अपमान भाजपाचे नेते करीत आहेत. जर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना हेगडेंचे म्हणणे अमान्य असेल तर त्यांनी तात्काळ हेगडे यांची भाजपामधून हकालपट्टी केली पाहिजे. महात्मा गांधीच्या १५० व्या जयंतीनिमित्त गुजरातची राजधानी असलेल्या गांधीनगरमध्ये मोदी साहेबांनी कोट्यावधी रुपये खर्च करून आंतरराष्ट्रीय दर्ज्याचे 'महात्मा मंदीर' उभे केले आहे. त्याच्याच समोर म. गांधींनी दांडी येथे १९३० साली जो मीठाचा सत्याग्रह करून ब्रिटिशांना 'या देशातून (पान १०० वर)



## प्रबंध संपादकीय



# दीडशेव्या शताब्दीतच विचारांना हरताळ

**घुसखोरांना देशातून हुसकावून लावायला कुणाचाच विरोध नाही. पण या देशात फक्त मुस्लिम धर्मिय लोकच घुसखोर आहेत का? अन्य धर्मियांना वेगळा न्याय आणि मुस्लिमांना वेगळा न्याय अशी भूमिका भारत सरकार का घेत आहे? शिवाय पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तान या तीन देशांपुरताच हा निर्णय का करण्यात येत आहे? शेजारील नेपाळ, श्रीलंका, ब्रह्मदेश व इतर देशातून आलेल्या घुसखोरांबाबत केंद्र सरकार कोणती भूमिका घेणार आहे? सरकारला धर्माच्या आधारे दुजाभाव करता येणार नाही. सर्वांना सारखाच न्याय व निकष लावावा लागेल. अन्यथा देशाच्या एकात्मतेला मोठा धोका निर्माण होण्याचा संभव आहे.**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५० वी जयंती सध्या आपण साजरी करीत आहोत. ज्या गुजरातच्या भूमीत महात्मा गांधींचा जन्म झाला त्याच भूमीचे सुपूत्र नरेंद्र मोदी हे आज देशाचे पंतप्रधान आहेत हा विलक्षण योगायोग आहे. गुजरात राज्याचे मुख्यमंत्री विजय रूपानी यांच्यापासून केंद्रीय कृषि राज्यमंत्री पुरुषोत्तम रूपाला यांच्यापर्यंत भाजपाचे सर्व नेते ''गुजरात ही महात्मा गांधी, सरदार वल्लभभाई पटेल आणि नरेंद्र मोदी यांची भूमी आहे,'' असा उल्लेख करतात. ज्या भूमीत जन्मलो त्याचा आदर व गौरवाने उल्लेख करण्यात चूक व आक्षेपार्ह काहीच नाही. पण जन्मापेक्षा विचार आणि कार्यकृती आपण अधिक महत्त्वाची मानत असू तर मग आक्षेपाचे मुद्दे व भाजप नेत्यांच्या दाव्यातला विरोधाभास ठळकपणे अधोरेखीत होऊन धडधडीतपणे जेव्हा समोर उभा राहतो तेव्हा दाव्याचे समर्थन कसे करायचे हा प्रश्न निश्चितपणे पडतो. एवढेच नव्हे तर अनेक प्रश्न मनात त्यामुळे निर्माण होतात. त्यातल्या फक्त एक-दोन प्रश्नांची चर्चा या ठिकाणी करणार आहे.

महात्मा गांधींच्या विचारानुरूप काम करायचे सोडून त्यांच्या विचारांना हरताळ फासणारे, काळीमा लावणारे काम केंद्र सरकार का करीत आहे? एकीकडे १५० वी जयंती साजरी करण्याचे नाटक करायचे आणि दुसरीकडे एनआरसी, सीएए, एनपीआर, सीएबी असे मुद्दे व विषय उकरून काढीत हिंदुत्वाचा छुपा अजेंडा भाजपाचे सरकार आणि विशेषतः गुजरातच्याच भूमीतले मोदी-शहा का राबवित आहेत? भारत हा देश फक्त हिंदूंचा आहे. इतर धर्मिय आमच्यासोबत राहू शकतील पण मुस्लिम धर्मियांना मात्र देशातून चालते झाले पाहिजे ही भूमिका कळत-नकळत, प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पण जाणीवपूर्वक भाजप नेते व केंद्र सरकार का घेते आहे? हे सगळे महात्मा गांधींच्या विचारांच्या विरोधी आहे असे सरकारला वाटत नाही का?

२४ एप्रिल, १९२४ रोजी 'यंग इंडिया' मध्ये हिंदू धर्म म्हणजे काय' हे विषद करताना स्वतः महात्मा गांधींनी लिहिले आहे, ''हिंदू धर्माचे हे सुदैव म्हणा किंवा दुदैव की हिंदू धर्माची कुठलीही अधिकृत अशी धर्मश्रद्धा नाही. म्हणून माझ्याविषयी गैरसमज होऊ नये यासाठी मी म्हणतो की सत्य व अहिंसा ही माझी धर्मश्रद्धा आहे. जर मला कोणी हिंदू धर्माची व्याख्या करावयास सांगितली तर मी एवढेच म्हणेन की अहिंसेच्या मार्गाने सत्याचा शोध म्हणजे हिंदू धर्म. एखाद्या मनुष्याचा ईश्वरावर विश्वास नसेल तरीही तो स्वतःला हिंदू म्हणवून घेऊ शकतो. धर्म म्हणजे सत्याच्या शोधाची अविश्रांत साधना.''



एवढेच लिहून गांधीजी थांबत नाहीत. ६ ऑक्टोबर, १९२१ च्या 'यंग इंडिया'त ते लिहितात, ''हिंदू धर्म हा एका विशिष्ट समाजाचा, वर्गाचा नाही. जगातील सर्व धर्माच्या प्रेषितांच्या पूजेला त्यात स्थान आहे. सर्वसामान्य रूढ अर्थाने हा प्रचारकी धर्म नाही. हिंदू धर्माने आपल्यात नानाविध जातीजमाती सामावून घेतल्या आहेत. पण त्या समावेशाचे स्वरुप सहजपणे अव्यक्त, नकळत विकसीत होणारे असे आहे. तुमची जी श्रद्धा असेल किंवा तुमचा जो धर्म असेल, त्यानुसार तुम्ही ईश्वराची उपासना करा असे हिंदू धर्म सागंतो, (पान १०० वर)

## संपादकीय



# अर्थसंकल्प : अर्धवट व कल्पकतेचा अभाव

**भारतीय अर्थव्यवस्था आज अनेक संकटांचा सामना करते आहे. यातली बरीच संकटे ही मोदी सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे व हुकूमशाही प्रवृत्तीमुळे निर्माण झालेली आहेत. या धोरणांना बदलून अर्थव्यवस्थेला पुन्हा एकदा नवी चालना देण्याची संधी अर्थसंकल्पाने अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना प्राप्त झाली होती. पण त्यांनी पुन्हा मोदींच्याच तोंडाकडे पाहात ती गमावली.**

अर्थसंकल्पाद्वारे अर्थकारणाचे वास्तव समाजासमोर उघड व्हावे ही अर्थसंकल्प सभागृहात सादर करण्यामागील मुख्य संकल्पना आहे. देशाच्या तिजोरीत येणारे उत्पन्न, त्यातून होणारा खर्च आणि या उत्पन्न खर्चाचे गणित बसविण्यासाठी करण्यात आलेली धोरणांची रचना याचे एकत्रित दर्शन, जे अर्थमंत्री जनतेपुढे ठेवतात त्याला अर्थसंकल्प असे आपण ढोबळमानाने म्हणतो. केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी २०२०-२१ सालचा अर्थसंकल्प १ फेब्रुवारीला सभागृहाला सादर केला. तो सादर करताना आवश्यक ती आकडेवारी न देता अनेक गोष्टी संदिग्ध ठेवण्याचा प्रयत्न केला. किंबहुना खरी माहिती न देण्याकडेच त्यांचा कल होता असे त्यांच्या पावणेतीन तासांच्या भाषणावरुन वाटले. रक्तातली साखर कमी होईपर्यंत बाई अर्थसंकल्प सादर करीत होत्या. पण त्या अर्थसंकल्पातून अर्थकारणातले वास्तव लोकांना किती नीट कळले असेल याबद्दल शंका आहे. कारण अर्थतज्ज्ञ आणि अर्थशास्त्राचे अभ्यासक आकडेवारी न दिल्यामुळे अगोदरच संभ्रमात असून त्यांनाही अर्थमंत्र्यांना नेमके काय म्हणायचे आहे हे उमगलेले दिसत नाही. अर्थ अभ्यासकांची जर ही स्थिती असेल तर सर्वसामान्य जनतेला या अर्थसंकल्पातून काही बोध होईल व समज येईल अशी अपेक्षा करणे खुळचटपणाचे आहे.

मागील अर्थसंकल्पात वित्तीय तुट ३.५ टक्क्यांवर राखण्याचे उद्दिष्ट्य होते. ती वाढणार हे ही घटकाभर मान्य करु. पण का वाढली याचा भाषणात अर्थमंत्र्यांनी कुठेही उल्लेख केला नाही. म्हणजे महसुली वाढ अपेक्षित झाली नाही का? त्याचे कुठेही विवेचन नाही. सरकारने थकबाकीदारांकडून करांची वसुली केली का, ती करण्यासाठी सरकार काय प्रयत्न करणार आहे याबद्दल भाषणात अवाक्षर नाही. चालू वर्षामध्ये व गेल्या वर्षीसुद्धा भांडवली खर्च किती होता, त्याच्यात वाढ झाली का घट झाली, तूट आटोक्यात राखण्यासाठी भांडवली खर्चाला कात्री लागली का, या कशाबद्दलही अर्थमंत्र्यांच्या भाषणात चकार शब्द नाही. तीच गोष्ट २०२०-२१ या वर्षाबद्दलची. आकेडवारीचा काहीच तपशील दिलेला नाही. यामुळे अर्थव्यवस्थेची स्थिती नेमकी कशी आहे हे कळायलाच मार्ग नाही. त्यामुळे शंका जास्त उत्पन्न होते की अर्थमंत्र्यांना वस्तुस्थितीच्या माहितीची दडवादडवी करण्यात जास्त रस आहे की काय? वित्तीय तूट आपण मर्यादित ठेवतो आहोत हे दाखविण्यासाठी दरवर्षीच्या अर्थसंकल्पात महसुलाचे आकडे फुगवून सांगितले जातात की काय अशी शंका अर्थतज्ज्ञांना आहे. कारण दरवर्षीच महसूलाचे अंदाज कसे काय चुकतात? दरवर्षी वित्तीय तूट कमी होण्याऐवजी वाढतेच आहे. याचा अर्थ उत्पन्न आणि खर्च याचा ताळमेळ घालण्यात सरकारला अपयश येते आहे. तूट कमी करण्याच्या नावाखाली भांडवली खर्चावर जेव्हा कुऱ्हाड चालविली जाते किंवा भांडवली खर्चाला कात्री लावली जाते तेव्हा त्याचा परिणाम अर्थव्यवस्थेच्या वाढीवरच होतो. या वाढीला खीळ बसते आणि मग रोजगार निर्मितीसह विकासाच्या सर्व विषयांना आपोआप पायबंद बसतो वा बेड्या घातल्या जातात. अर्थमंत्र्यांनी संपूर्ण भाषण केल्यानंतर जे मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण सभागृहाच्या पटलावर ठेवले त्यातून हेच निदर्शनास आले.

अर्थमंत्र्यांनी प्राप्तीकरासंबंधी आता नव्याने दोन पद्धती आणल्या आहेत. ज्यांना प्राप्तीकरात वजावटी नको आहेत त्यांना कमी दराचे आश्वासन दिले आहे. ही कल्पना वरकरणी चांगली वाटते पण याचा नेमका परिणाम महसूलावर काय होणार, करदात्यांना नेमका किती लाभ मिळेल आणि यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे करसंकलनावर म्हणजे प्रत्यक्ष करांच्या रकमेवर काय परिणाम होईल याचे आकडे व अंदाज अर्थमंत्र्यांनी कुठेही दिलेला नाही. प्राप्तीकर रकमेचे स्लॅब करताना वजावटीच्या अनेक सवलती काढून घेऊन

करदात्यांची मोठी फसवणूक अर्थमंत्र्यांनी केली आहे. मागील ऑगस्ट महिन्यात कंपनी कराचे दर केंद्र सरकारने कमी केले. त्याच्या पाठोपाठ ही नवीन पर्यायी व्यवस्था सुरु केली आहे. तेव्हा याचा परिणाम महसूलावर व वित्तीय तुटीवर काय होईल याबाबतही काहीही भाष्य नाही. अर्थसंकल्पाचे मॅक्रो चित्र लक्षात घेतले तर एकंदरीत सगळ्या तुटीच्या प्रश्नाबद्दल अर्थसंकल्पात काहीही माहिती नाही.

कृषि क्षेत्राच्या विकासासाठी १६ कलमी कार्यक्रम आखल्याचे अर्थमंत्र्यांनी भाषणात सांगितले. शेतकऱ्यांचे उत्पन्न २०२२ पर्यंत दुप्पट करण्यास आपण कटिबद्ध आहोत असेही त्या म्हणाल्या. अन्नधान्यापेक्षा देशात फळफळांचे उत्पादन वाढले असून फलोद्यानास चालना देण्याकरिता राज्य सरकारच्या मदतीने प्रत्येक जिल्ह्यात एक फळ उत्पादनास प्रोत्साहन देणार असल्याचे सीतारामन यांनी सांगितले. या शेतीमालाच्या वाहतुकीसाठी जादा रेल्वेगाड्या व हवाई वाहतुक मंत्रालयातर्फे 'कृषी उडान योजना' राबविणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. मात्र शेतीमाल प्रक्रिया उद्योगाला चालना देण्याकरिता आपण सरकारमार्फत काय करणार आहोत याचे त्यांनी सूचन केले नाही. आपण आज देशात जेवढा शेतीमाल पिकवितो त्यापैकी फक्त १ ते २ टक्के मालावर प्रक्रिया करतो. शेतीमाल नाशवंत असतो. तो फार काळ साठविता येत नाही आणि नवीन शास्त्रीय तंत्र व पद्धती वापरुन तो साठवायचा ठरविले तर त्याची व्यवस्था, तंत्रज्ञान आज आपल्याकडे उपलब्ध नाही आणि बाहेरुन ते आणले तर खर्च प्रचंड असल्याने आर्थिक गणित बसत नाही. तथापि मूल्यवृद्धी होण्यासाठी प्रक्रिया करणे तर गरजेचे व अनिवार्य आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे, ग्रामीण भागात बिगरशेती रोजगार निर्माण व्हावा, उद्योगांचे विकेंद्रीकरण साध्य व्हावे आणि त्या माध्यमातून ग्रामीण भागातून शहरांकडे जाणाऱ्या माणसांच्या लोंढ्याला म्हणजे ग्रामीण स्थलांतरणाला अटकाव होऊन शहरांवरचा बोजा कमी व्हावा, त्याला पायबंद बसावा यासाठी शेतीमाल प्रक्रिया उद्योगाला चालना देण्याची गरज आहे. परंतु या पैलूचा विचार संपूर्ण भाषणात कुठेही आला नाही.

सौर उर्जा निर्मितीद्वारे उत्पन्न मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना अन्नदाता योजनेचा विस्तार करुन प्रोत्साहन देण्याची नवी संकल्पना श्रीमती सीतारामन यांनी मांडली आहे. देशातल्या ग्रामीण भागाचा आणि शेतकऱ्यांच्या मूलभूत प्रश्नांचा त्यांचा अभ्यास असता तर असल्या तकलादू व मलमपट्टी लावणाऱ्या योजनांचे संकल्पन त्यांनी केले नसते. शेतकऱ्याकडे जी कायम पडीक जमीन आहे त्यावर तो सोलर पॅनेल बसवेल आणि त्यातून तयार होणारी वीज विकून त्याला उत्पन्न मिळेल हा आशावाद वरकरणी दिसायला कितीही चांगला असला तरी तो प्रत्यक्षात कृतीत उतरण्याची सुतराम शक्यता नाही. कारण मुळात सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचा खर्च कितीतरी प्रचंड आहे. ज्या शेतकऱ्याची जमीन पडीक आहे तो याचा विचार देखील करु शकत नाही. उलट आजकाल शेती आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्यामुळे विशेषतः कोरडवाहू व कुठलीही सिंचनाची सोय नसलेला शेतकरी अल्पभूधारक तर बनला आहेच पण त्याचा चालू शेतजमीन पडीक ठेवण्याकडेही कल वाढतो आहे. म्हणजे बारकाईने पाहिले तर आपल्या असे लक्षात येईल की कायम पडीक जमिनीपेक्षा चालू पड जमिनीचे प्रमाण अधिक आहे आणि ते दिवसेंदिवस वाढू लागले आहे. हा नैसर्गिक साधनसंपत्तीचा अपव्यय आहे. ही पडीक जमीन अधिकाधिक लागवडीखाली यावी यासाठी आपण कोणत्या तरतुदी करणार व कशा प्रकारची धोरणे राबविणार याबाबत मात्र अर्थमंत्री मौन बाळगतात.

शेतीमाल साठविण्यासाठी गुदाम व्यवस्था निर्माण केली तरी प्रत्यक्षात शेतीमालाच्या आधारभूत किमतीत सरकार जी वाढ करते त्याचा फार थोडा फायदा शेतकऱ्यांना मिळतो. कारण सरकारी खरेदी यंत्रणा आणि गुदामांची व्यवस्था ही देशाच्या मोठ्या भागात व जिथे शेतीमालाचे प्रत्यक्ष उत्पादन होते त्या गावात किंवा खेडोपाडी प्रत्यक्ष उपलब्धच होत नाही. खेडेगावातून किंवा उत्पादनाच्या ठिकाणापासून गोदामापर्यंत मालाची वाहतुक करणे हे अनेक कारणांनी उदा. रस्ते, वाहने, मजूर, संदेशवहन, वाहतुक खर्च वगैरे परवडत नाही. त्यामुळे गोदामांची व आधारभूत किमतीची योजना कागदावरच राहते ही वस्तुस्थिती आहे. या दृष्टीने केंद्रीय कृषी व अन्न नागरी पुरवठा मंत्री असताना २००९ मध्ये श्री. शरद पवार यांनी भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामांची क्षमता वाढविण्याचा व खेडोपाडी नवीन गुदामे उभारण्याचा जो कार्यक्रम आखला होता व जाहीर केला होता तो जास्त महत्त्वाचा व उपयुक्त ठरणारा आहे. गोदामे आणि आधारभूत किंमती यांची सांगड सरकार खरेदी यंत्रणेशी



घालणार की नाही याचे उत्तर अर्थमंत्री कधी देणार? ही सांगड घातली तरच शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. अन्यथा तो नुसत्या योजनांच्या माहितीची ऊब घेत अधांतरी आणि संकटांच्या थंडीत कुडकुडत राहणार आहे.

रोजगारवाढीच्या संदर्भात एकही शब्द अर्थसंकल्पात नाही. रोजगार सरकार कसा वाढविणार आहे, त्यासाठी कोणत्या योजना आखल्या आहेत याबद्दल अर्थसंकल्प काहीही बोलत नाही. तो मुका राहणे पसंत करतो. असे का? मागे २०१४ ला जेव्हा पहिल्यांदा मोदी सरकार सत्तेवर आले तेव्हा दरवर्षी २ कोटी रोजगार नव्याने निर्माण करु असे आश्वासन दिले होते. प्रत्यक्षात दरवर्षी २० लाख रोजगारही निर्माण झाला नाही. उलट नोटबंदीच्या निर्णयाने देशातील दोन कोटी लोकांवर रोजगार गमाविण्याची पाळी आली. हे सगळे अंगलट आल्यामुळे नेमकी नवीन रोजगार निर्मिती किती, कशी व कधी करणार याचा उल्लेख करणे अर्थमंत्र्यांना अडचणीचे व जड वाटले असणार. त्यामुळे त्यांनी या विषयाला वाळीतच टाकले. अर्थात मग रोजगार क्षमता वाढवायची असेल तर तांत्रिक व व्यवस्थापकीय शिक्षण आणि त्यातही मुख्यत्वे कौशल्य विकास शिक्षण यावर भर दिला पाहिजे. या कौशल्य विकास शिक्षणासाठी अर्थसंकल्पात फक्त तीन हजार कोटींची तरतूद आहे. ही तरतूद अत्यंत तुटपूंजी आहे.

केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे आज देशातली ६० ते ६५ टक्के कौशल्य विकास केंद्र बंद आहेत. केंद्र सरकारच्या सर्व नियमांची अंमलबजावणी करुन एक केंद्र उभारायचे असेल तर त्यासाठी किमान २५ लाख रु. खर्च येतो. सरकार केंद्र काढा असे सांगते पण त्याला कामाची गॅरंटी देत नाही. ज्यांना काम दिले जाते त्यांना किमान दीड ते दोन आणि जास्तीत जास्त चार वर्षे देखील पैसे मिळायला लागतात. कौशल्य विकास केंद्रात येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक तासाला सरकार ३८ ते ४६ रु. देते. म्हणजे एका विद्यार्थ्यासाठी २५ ते ४० हजार रु. सरकार खर्च करते. या हिशेबाने तीन हजार कोटीतून सरकार एक लाख मुलांचे सुद्धा शिक्षण करु शकणार नाही. बरं, सरकार कौशल्य केंद्राला बॅचेस देऊन व वर्क ऑर्डर देवून काम करायला लावतात आणि काम संपल्यानंतर त्याची तपासणी करतात. काम संपल्यावर मुले किंवा मुली केंद्रावर येतच नाहीत. शिक्षण चालू असताना तपासणी करायला पाहिजे. पण सरकारी यंत्रणा ते करीत नाही. त्यामुळे बरीचशी सेंटर्स ब्लॅकलिस्टेड होताहेत. कोल्हापूर मधल्या एका ब्युटीपार्लरच्या सेंटर चालकाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोटो ब्युटीपार्लर केंद्रात लावला नाही म्हणून त्याचा परवानाच रद्द केला. म्हणजे मोदींचा उदोउदो करण्यासाठी ही सेंटर्स चालविली जाताहेत का? आणि ब्युटीपॉर्लरमध्ये येणाऱ्या महिलांनी रोज मोदींचा पांढऱ्या दाढीतला चेहरा पाहिलाच पाहिजे का? असा प्रश्न चालकांना पडला आहे. आज इतरांना रोजगार देणारा सेंटरचालक मात्र कर्जबाजारी आणि बेरोजगार झाला आहे हे अर्थमंत्र्यांना बहुदा माहित नसावे.

या विषयाकडे अर्थमंत्री व केंद्र सरकार इतक्या उदासीनपणाने का पाहते आहे ही गोष्ट अनाकलनीय आहे. रोजगार क्षमता जर सरकार वाढविणारच नसेल तर मग 'सबका साथ, सबका विकास आणि सबका विश्वास' या केंद्र सरकारच्या वारंवार आवर्जुन मोठमोठ्याने ढोल बडविल्या जात असलेल्या घोषणेला काय अर्थ आहे? निव्वळ घोषणाबाज फोकनाड सरकार हा शिक्का अगोदरच मोदी सरकारवर बसलेला आहे. तो काहीसा पुसण्याचा प्रयत्न जरी या अर्थसंकल्पाने केला असता तर जनतेला थोडा दिलासा मिळाला असता. पण तीही संधी अर्थमंत्र्यांनी गमाविली.



देशातील पायाभूत सेवासुविधांच्या निर्मिती व विस्तारासाठी मोठ्या प्रमाणात परकीय भांडवल यावे आणि परदेशी गुंतवणूकदारांनी त्यात मोठी गुंतवणूक करावी यासाठी नवे माध्यम सरकारने तयार केले आहे असे अर्थमंत्र्यांनी भाषणात सांगितले. गंमत अशी आहे की मागील ३० वर्षे (म्हणजे १९९०-९१ पासून) जी आर्थिक सुधारणा झाली त्यामध्ये आम्ही एकाच बिंदूपाशी येऊन थांबलो आहोत आणि हा बिंदू पायाभूत सुविधांसाठी परकीय गुंतवणूकीचाच आहे. १९९१ साली सुधारणांना तत्कालिन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव आणि अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंह यांनी जेव्हा सुरुवात केली तेव्हा असे म्हटले होते की पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी परकीय गुंतवणूक आली पाहिजे म्हणून आम्ही उदारीकरणाचे धोरण राबवितोय. आता २०२० साली आम्ही पुन्हा तेच म्हणतोय. याचा अर्थ ३० वर्षे नुसती

वाहातच गेली का? त्या काळात काही घडले की नाही? आणि त्यापासून आम्ही काय बोध घेतला? याची उत्तरे अर्थमंत्री कधी देणार आहेत?

आज खरा आणि कळीचा मुद्दा असा आहे व ज्याच्याबद्दल कोणीच उत्तर देत नाही तो म्हणजे आज बँकांची जी मोठमोठी कर्जे आहेत व उद्योगांवर न फेडलेल्या कर्जाचा जो मोठा बोजा आहे त्याचे एक मुख्य कारण या पायाभूत सेवासुविधांशी संबंधित आहे. पायाभूत सेवासुविधांचे अनेक प्रकल्प हे मागील काही वर्षांपासून अडकून पडले आहेत, रेंगाळले आहेत. याला कारण नवीन जो भूसंपादन कायदा आलेला आहे तो मुख्यत्वे कारणीभूत आहे. या कायद्यामुळे जमिनींच्या किमती प्रचंड वाढलेल्या आहेत. जमीन मालकांना नुकसानभरपाईपोटी चौपट मोबदला द्यावा लागत आहे. शिवाय पर्यावरण खात्याकडून लवकर मंजुऱ्या मिळत नाहीत. निरनिराळी कारणे सातत्याने काढून पर्यावरण खाते फाईल्स परत पाठवित राहते. त्या खात्यातले लोक व अधिकारी असे का वागतात हे 'ओपन सीक्रेट' आहे. त्यांना भेटल्या शिवाय कुठलेच प्रकरण मंजूर होत नाही ही बाब सर्वांना विदीत आहे. आजकाल जलसंपदा विभागाचे सर्व प्रकल्प ज्या ठेकेदाराला काम मिळणार आहे तोच पर्यावरण विभागाकडून मंजूर करून आणतो. ही मंजुरी कशी मिळते हे मी येथे नव्याने सांगण्याची गरज नाही. या दोन मुख्य समस्या जर देशी उद्योजकांनाच भेडसावतात तर मग परदेशी गुंतवणूकदारांचे काय हाल होत असतील याचा नुसता विचार केला तरी पुरे! एन्रॉन, युनियन कार्बाईड पासून भारतातील अनेक प्रकल्पांमध्ये ज्या परदेशी उद्योजकांनी गुंतवणूक केली




त्यांच्याशी आपले सरकार कसे वागले? सातत्याने धोरणे कशी बदलली? त्यांचा किती छळ केला, आडकाठ्या आणल्या. कामगारांनी किती नाटके केली? मग परदेशी उद्योजक भारतात गुंतवणूक करायला कसा धजावणार?

याचा अर्थ परदेशी गुंतवणुकीसाठी उद्योजकांना केवळ कर सवलती देऊन भागणार नाही. उद्योग वा कारखाना व्यवस्थितपणे चालविण्यासाठी आवश्यक असणारे वातावरण व स्थानिकांचे सहकार्य निर्माण करण्याकडे लक्ष द्यावे लागेल. कायदेविषयक ज्या अडचणी आहेत त्या तातडीने सोडविण्याच्या संदर्भात सरकारची भूमिका सकारात्मक व प्राधान्याची हवी. केवळ कर सवलती दिल्याने आपोआप परकीय गुंतवणूक येईल असे मानणे हा भ्रम आहे. ते खुळेपणाचे लक्षण आहे. पायाभूत सेवासुविधांमधले रस्ते, सिंचन, शिक्षण, पाणी, ऊर्जा, सार्वजनिक आरोग्य हे बहुतेक विषय राज्य सरकारच्या अखत्यारित आहेत. परकीय गुंतवणुकीबाबत या राज्याराज्यांच्या धोरणांबाबत कुठेही सुसंगती व एकवाक्यता नाही. प्रत्येक राज्याचे धोरण निरनिराळे आहे. किंबहुना समोरची माणसे पाहून धोरणे बदलतात असेच चित्र अनेकदा पाहायला मिळते. गुंतवणूक करणाऱ्या व्यक्तीमध्ये राज्य सरकारला प्रभाव टाकून वळविण्याची, वाकविण्याची, नमविण्याची किंवा खरेदी करण्याची किती ताकद व क्षमता आहे यावरच धोरणे सैल-पक्की होणे अवलंबून असते. खरे तर हा मुद्दा गव्हर्नन्सचा आहे, व्यवस्थापनाचा आहे. यासाठी केंद्र सरकार सर्व राज्यांना एका व्यासपीठावर आणणार आहे का? ज्याला सहकारी संघराज्य पद्धती असे आपण म्हणतो ती राबविण्याची केंद्राची तयारी आहे का? ही महत्त्वाची गोष्ट आहे. राज्यांना विकासात व सत्तेत भागीदार करून घेण्याची राजकीय मानसिकता मोदी सरकारकडे आहे का? हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे.

विरोधी पक्ष हा लोकशाहीचा घटक न मानता तो शत्रू मानून त्याला संपविण्याची म्हणजे काँग्रेसमुक्त भारत करण्याची जी घोषणा पंतप्रधान मोदींनी करून ज्या पद्धतीने कारभार चालविलेला आहे ते पाहता केंद्र आणि राज्य यांच्या संबंधामध्ये व कामकाजात सुसूत्रता व एकवाक्यता येणे अवघड आहे. याचा परकीय गुंतवणुकीवर निश्चितच प्रतिकूल व विपरीत परिणाम होईल हे निराळे सांगायला वेगळ्या ज्योतिष्याची गरज नाही. त्यामुळे कल्पकतेचा अभाव व अर्धवट विचार हाच अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पाचा स्थायीभाव आहे.

■■

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या अल्पसंख्यांक विभागाची बैठक



# केंद्र सरकारच्या नागरिकत्व कायदा दुरुस्तीने देशाच्या एकात्मतेला धोका

## शरद पवार यांचे विचार

महाआघाडीचे सरकार स्थापन झाल्यानंतर आज पहिल्यांदा राष्ट्रवादी अल्पसंख्यांक विभागाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला विभागाच्या पदाधिकाऱ्यांबरोबरच अल्पसंख्यांक समाजाचे बहुतेक सर्व नेते उपस्थित आहेत. तुम्ही सर्वांनी निवडणुकीत जी महत्वपूर्ण व उत्तम कामगिरी बजावली त्याबद्दल सुरुवातीलाच मी तुम्हा सर्वांचे मनापासून अभिनंदन करतो. आता कुठे आपली कामाला सुरुवात होते आहे. अजून खूप काम करायचे बाकी आहे. मुख्य म्हणजे आपल्याला पक्षाची मजबुतीने बांधणी करण्याचे काम तातडीने सुरु करुन ते पूर्णत्वास न्यायचे आहे. बूथ बांधणीचे काम आपण शंभर टक्के पूर्ण करु शकलो नाही. ते उर्वरीत काम त्वरित पूर्ण करुन पक्षाची विश्वासार्हता व नावलौकिक पुन्हा वाढीला लावायचा आहे. मध्यंतरी अल्पसंख्यांक समाजाचे काही लोक आपल्यापासून दुरावले होते. परंतु ते आता पुन्हा आपल्याशी जोडले जात आहेत ही अत्यंत समाधानाची बाब आहे. केंद्र सरकारने नागरिकत्व कायदा दुरुस्तीच्या नावाखाली आज अशा प्रकारची पाऊले उचलली आहेत की ज्यामुळे अल्पसंख्यांक समाजामध्ये असुरक्षितता आणि भितीची भावना निर्माण झाली आहे. जाती-धर्माच्या आधारावर समाजासमाजात फूट पाडून मतभेद व भांडणे वाढीला लावण्याचे काम सरकार आज करते आहे. देशाच्या ऐक्यासाठी ही गोष्ट धोकादायक आहे. धर्माच्या आधारावर माणसांमध्ये फूट पाडू लागलो तर देशाची एकात्मता



व अखंडता धोक्यात येण्याची शक्यता आहे. तेव्हा या धर्मांध व जातीयवादी शक्ती आणि सरकारपासून आपल्याला दूर कसे राहता येईल व समाज एकसंघ कसा ठेवता येईल याचा गांभीर्याने विचार करण्याची व त्यासाठी तसे प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्र विधानसभेच्या नुकत्याच निवडणुका झाल्या. मला आनंद आहे याचा की या निवडणुकीत मुस्लिम समाजाने भारतीय जनता पक्षाला मतदान केले नाही. उलट भाजपाचा पराभव करुन शकेल अशा विरोधी पक्षांना मतदान केले ही खूप चांगली गोष्ट झाली. मुस्लिम समाज कदाचित कुणाला जिंकण्यास थेट सहाय्यकारी होत नसला तरी ठरविले तर एखाद्याला निश्चित पराभूत करु शकतो एवढी ताकद अल्पसंख्यांकांमध्ये आहे आणि ती या निवडणुकीत समाजाने सिद्ध करुन दाखविली आहे.

सरकार स्थापन झाल्यानंतर जेव्हा खाती आपल्याकडे कोणती घ्यायची याचा विचार पक्षात आम्ही सुरु केला तेव्हा आपल्या पक्षाच्या लोकांनी मला आवर्जुन सांगितले की अल्पसंख्यांक विभाग आपल्या पक्षाजवळच असला पाहिजे. तेव्हा हे खाते आपल्याकडे मागून घ्या. मग याबाबतची संपूर्ण जबाबदारी मी मा. अजित पवार आणि मा. जयंत पाटील यांच्यावर सोपविली. त्यांनी शिवसेना आणि काँग्रेस पक्षाच्या नेत्यांबरोबर वाटाघाटी व चर्चा करुन आवश्यक ती पावले टाकली व हा विभाग आता आपल्याकडे आला आहे. मला आनंद याचा आहे की या विभागाची जबाबदारी मा. नबाव मलिक यांच्यावर सोपविण्यात आली आहे. पक्षाचे प्रतिनिधी म्हणून मंत्रीमंडळात काम करीत असताना ते महाराष्ट्रातील सर्व अल्पसंख्यांक समाजांना आणि दलितांना व दुःख-हालअपेष्टा सोसणाऱ्या गोरगरिबांना बरोबर घेऊन जातील. त्यांच्या कल्याणासाठी वेगवेगळ्या योजना राबवितील. या सर्व योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी व समाजातील खऱ्या गरजू व शेवटच्या घटकांपर्यंत योजनांचे फायदे पोहोचविण्यासाठी जो निधी आवश्यक असेल तो वित्तमंत्री आणि मुख्यमंत्री उपलब्ध करुन देण्याकडे लक्ष देतील अशी मी आशा करतो.



काही दिवसातच आपल्या लक्षात येईल की या महाविकास आघाडी सरकारने अल्पसंख्यांक समाजाच्या हितासाठी व प्रगतीकरिता मोठे लक्ष देऊन जाणीवपूर्वक काम केलेले आहे. माझी आपणा सर्वांना सूचना व विनंती आहे की आपल्याला सर्वांना मिळून मिसळून व हातात हात घालून सहकार्याने काम करायचे आहे. त्या दृष्टीने विचार व प्रयत्न केले पाहिजेत. आज देशामध्ये जातीयवादी व धर्मांध शक्ती वेगाने पावले टाकून समाजातील एकता व शांतता उध्वस्त करण्याचा प्रयत्न करीत आहेत. हिंदू-मुस्लिम समाजामध्ये संघर्ष कसा वाढेल आणि फूट पडून धर्माच्या आधारावर हिंदूंची व्होटबँक कशी तयार करता येईल याचा भाजपा व केंद्र सरकार सातत्याने प्रयत्न करते आहे. भारतीय नागरिकत्व कायद्यात करण्यात येत असलेली दुरुस्ती व नागरिकत्व कायद्यात करण्यात येत असलेली दुरुस्ती व नागरिकत्व देताना सरकारकडून हेतूतः जो धार्मिक भेदभाव दाखविला जात आहे, यामागे अल्पसंख्यांकांवर अन्याय, अत्याचार करण्याचेच धोरण आहे. मुस्लिमांना निर्वासित ठरवून त्यांना या देशातून बाहेर काढण्याचा धर्मांध शक्तींचा व सरकारचा डाव आहे. त्याला विरोध करुन तो हाणून पाडण्यासाठी आपल्या सर्वांना एकजुटीने उभे राहावे लागेल. खांद्याला खांदा लावून लढावे लागेल.

आपण पहा पाच वर्षांपूर्वी या देशाची काय स्थिती होती. विकास किती वेगाने होत होता. अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन करुन जगातल्या २५ देशांची आपण गरज भागवित होतो. दुसरी हरितक्रांती आपण यशस्वी करण्याचा प्रयत्न केला. देश अन्नधान्यात स्वयंपूर्ण करुन आयात थांबविली. शेतीमालाची निर्यात वाढविली. आज केंद्र सरकारची सर्व धोरणे शेतकऱ्यांच्या विरोधात आहेत. शेतीमाल निर्यातीवर बंदी आणल्यामुळे भाव पडले आहेत. भारतीय जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आल्यापासून नोटबंदी, जीएसटी यांसारखे अनेक चुकीचे निर्णय केंद्र सरकारने घेऊन देशातला प्रत्येक क्षेत्रातला माणूस संकटाच्या खाईत ढकलला आहे. कोणत्या क्षेत्रातला माणूस आज सुखी समाधानी आहे हे तुम्ही मला दाखवा. मी अनेक ठिकाणी जातो. मोठ्या संख्येने लोक भेटतात आणि म्हणतात, महाराष्ट्रात भाजपाला तुम्ही परत सत्तेवर येऊ दिले नाही ही फार चांगली गोष्ट झाली. देशातले अनेक पक्षांचे नेते मला भेटल्यावर सांगतात, तुम्ही फार चांगला रस्ता आम्हाला दाखविलात. आता त्याच रस्त्याने आम्ही जाऊन भाजपाला सत्तेपासून रोखू. देशातील जनतेमध्ये भाजपला सत्तेपासून दूर ठेवल्यामुळे आनंद व उत्साहाने वातावरण निर्माण झाले आहे. ते तसेच कायम ठेवून वाढीला कसे लागेल या दृष्टीने आपण सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. अल्पसंख्यांक समाजाचे सर्व नेते व कार्यकर्ते या कामात लक्ष घालतील अशी अपेक्षा व्यक्त करुन मी थांबतो.

■■

# मुस्लीम समाजाच्या आरक्षणाबाबत सरकारमार्फत प्रयत्न करू



## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे उद्‌गार

शिवसेना, राष्ट्रवादी, काँग्रेस या सर्वांचे मिळून जे काही महाविकास आघाडीचे सरकार आलेले आहे, या सरकारला पाठिंबा दिलेल्या पक्षांनी हे सरकार व्यवस्थित कसे चालेल, यासाठी प्रयत्न केले पाहिजे. काही ठिकाणी प्रश्न निर्माण होऊ शकतात. ते प्रश्न अजिबात निर्माण होता कामा नये. हे सरकार महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात राहणाऱ्या सर्व जातीधर्माच्या लोकांना न्याय देण्याचे काम करू. पण, कधीकधी जाणीवपूर्वक अशा काही बातम्या पेरल्या जातात, काही गोष्टी सांगितल्या जातात की त्याच्यातून समज गैरसमज निर्माण होतात.

आपल्या सर्वांना साहेबांच्या साक्षीने विश्वास देऊ इच्छितो की, नवाब मलिक साहेबांकडे एका विभागाची जबाबदारी आहे. त्याला न्याय देण्यासाठी नियोजन खात्याची जबाबदारी माझ्याकडे आहे. सामजिक न्याय विभागाचे खाते असेल, अर्थ विभागाचे खाते असेल, आदिवासी विभागाचे खाते असेल, इतर मागासवर्गीय विभागाचे असेल, मी आपल्याला एवढीच माहिती देतो की, सध्या राज्य सरकारचा अर्थ विभाग सांभाळत असताना अडीअडचणी आहेत. कारण, आपण राज्यातील तमाम शेतकऱ्यांना दोन लाखांपर्यंतच्या कर्जमाफीचा निर्णय घेतलेला आहे. त्याची अंमलबजावणी महाराष्ट्रात व्यवस्थित झाली पाहिजे. तोही एक महत्वाचा घटक आहे. ते करत असताना आपल्याही विभागाला काही अडचण येणार नाही. ज्या ज्या काही चांगल्या योजना आहेत, त्या आपल्यासाठी आणण्यात येतील. त्या राबविण्यासाठी निधीही दिला जाईल.

मागे आघाडी सरकारमध्ये असताना आरक्षणाचा मुद्दा होता. आपलाही तो आहे. त्याला मागच्या वेळेस थोडेसे बाजूला ठेवण्यात आले. मात्र, या वेळी महाविकास आघाडीच्या सर्व मान्यवरांना विश्वासात घेऊन कशा प्रकारे आपल्याला पुढे जाता येईल, आणि तुमच्या मनात जी इच्छा आहे, ती कशी पूर्ण करता येईल, असा प्रयत्न केला जाईल. त्यामध्ये तसूभरही कमी पडणार नाही, असा विश्वास देतो.

आपल्या सर्वांचीच पहिल्यापासून भूमिका ही सेक्यूलर विचाराची आहे. त्याच पद्धतीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष काम करत आहे. आणि राहील याची ग्वाही देतो. धर्मनिरपेक्षता हे आपल्या पक्षाचे प्रमुख तत्त्व आहे. धर्मनिरपेक्षतेचे दोन अर्थ आहेत. एक भारतीय आणि दुसरा अमेरिकन. भारताच्या म्हणण्यानुसार धर्मनिरपेक्षता म्हणजे अ-धार्मिकता नव्हे. पण शासन सत्तेला कोणताही धर्म नसतो असे त्यात अभिप्रेत आहे. कोणताही एक धर्म दुसऱ्या धर्मापेक्षा श्रेष्ठ आहे असे शासनसत्ता मानत नाही. शासन सत्तेत सर्व धर्म समान आहेत, असे मानले पाहिजे. शासनसत्तेने सर्व धर्मांना समान वागणूक दिली पाहिजे आणि सारखाच आदर राखला पाहिजे.

■■

# मुस्लीम समाजातील मुलांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करा



## राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष व जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांचे उद्गार

अनेक अल्पसंख्यांक विभाग महाराष्ट्रात आहेत. मालेगाव आहे, भिवंडी आहे. पण, त्या पलिकडे महाराष्ट्रात अशी अनेक शहरे आहेत, अकोल्यासारखे शहर आहे की, जिथे अल्पसंख्यांक समाज फार मोठ्या प्रमाणात राहतो. त्यांच्या सुविधा सुधारण्याचे काम, तिथल्या शाळा सुधारण्याचे काम, तिथल्या युवकांना रोजगार देण्याचे काम आपल्याला चांगल्या पद्धतीने करता येईल. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, आपण आता सत्तेत आहोत. आपण आता पायभूत काम केले पाहिजे. समाजाच्या तळागाळात पोचून त्यांचा विश्वास संपादन करण्याचे काम तुम्हाला करायचे आहे. आपण जोरदारपणे काम करू, याचा मला विश्वास आहे. पण, त्याच्या बरोबर अल्पसंख्यांक सेलचे काम प्रभावीपणे झाले पाहिजे. अल्पसंख्यांक सेलने ठिकठिकाणी जाऊन शिबिरे घेऊन काम केले पाहिजे, याचे संकलन करून त्यांचे काम अल्पसंख्यांक विभागाकडून करून घेतले पाहिजे. आपल्याला चांगली संधी आहे. पवारसाहेबांनी दोन खात्यांचा आग्रह धरला. सामाजिक न्याय आणि अल्पसंख्यांक विभाग ही दोन्ही खाती आपण फार आग्रहाने आपल्याकडे घेतली. चूक दुरुस्त करण्याची संधी आपल्याला आली आहे. आपल्याला जोरदार काम केले पाहिजे. अल्पसंख्यांक समाजातील सर्व नव युवक आपल्या पक्षाशी जोडले पाहिजे. त्यातून संघटन कसे बळकट होईल, ते पाहिले पाहिजे. सामाजिक न्याय विभागाकडून मागासवर्गीय समाजाला शिष्यवृत्त्या देण्याचे काम होते. पण, मुस्लीम समाजाला कॉलेज, शाळेसाठी फारशी मदत होताना मला दिसत नाही. म्हणून नवाबभाईंना आमची सूचना आहे, पक्ष म्हणून की महाराष्ट्रातील जे मुस्लीम युवक आहेत, विद्यार्थी आहेत, त्यांची फी देण्यासाठी आपल्या खात्यातून काय व्यवस्था होईल का. कारण, महाराष्ट्रात विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा हा प्रश्न आहे की, अनेक विद्यार्थी दहावीपर्यंत जातात, नववीपर्यंत जातात , अकरावीपर्यंत जातात, पण पुढे जात नाही. त्याची दोन कारणे आहेत. शिक्षणाबद्दलचा आग्रह आणि आकर्षण समाजात कमी आहे. त्यामुळे जे शिकलेत ते फार पुढे गेले आहेत. म्हणून शिक्षणासंबंधी जर व्यवस्था आपण मुस्लीम समाजात करू शकलो, तर पुढची पिढी सक्षम होईल, असा मला विश्वास आहे. आज केंद्र सरकार अल्पसंख्यांक लोकांना सावत्रपणाची वागणूक देत आहे. हिंदू व्होटबँक तयार करण्यासाठी मुस्लिमांना सरकार जाणीवपूर्वक देशातून घालवून देण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यासाठी नागरिकत्व दुरुस्ती कायद्याचा घाट घातला जात आहे. या दुरुस्तीला आपण सर्वांनी प्राणपणाने विरोध केला पाहिजे. सुदैवाने आज मुस्लिम समाजाबरोबर दलित समाजही आंदोलनात सहभागी झाला आहे. देशभर केंद्र सरकारच्या विरुद्ध रान पेटले आहे. आपणही या अन्यायाविरुद्ध प्रखरपणे उभे राहण्याची आवश्यकता आहे.

■■

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या सामाजिक न्याय विभागाची बैठक



**एनआरसी, सीएए, सीएबी, व एनपीआरच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसच्या सामाजिक न्याय विभागाची बैठक २३ जानेवारी २०२० रोजी मुंबईतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मुख्यालयात झाली. त्यावेळी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी केलेले मार्गदर्शन.**

ज्यांच्या हातात देशाची सत्ता आहे, त्यांनी सर्वांच्या हिताची भूमिका घेऊन काम केले पाहिजे. पण, त्यांनी पार्लमेंटमध्ये जे काही निर्णय घेतले, नागरिकत्व नोंदणी, मतदारयादीमध्ये नोंदणी करणे. बहुसंख्य लोकांना त्याचे परिणाम अद्याप दिसून आलेले नाहीत. भारताच्या बाहेर जे राहतात त्यांना येथे येऊन नागरिकत्व देण्याचा विचार केला. त्याच्यामध्ये शीख आहेत, जैन आहेत, हिंदू आहेत, मुस्लीम नाहीत. भारताची ज्यावेळी फाळणी झाली हिंदुस्तान आणि पाकिस्तान, आणि पाकिस्तानची फाळणी होऊन बांग्लादेश वेगळा झाला. त्यावेळी बरेच भारतीय होते की, ते या ठिकाणी येण्यासाठी इच्छुक होते. पण, जे इच्छुक होते, ते फक्त हिंदूच होते, असं नाही.

मी जगाच्या क्रिकेटचा अध्यक्ष होतो आणि त्याच्या बैठका जगात अनेक ठिकाणी व्हायच्या. पाकिस्तानमध्येही व्हायच्या. मी त्यावेळी पाकिस्तानमध्ये अनेक वेळा गेलो. मी पाकिस्तानात ज्यावेळी पहिल्यांदा गेलो, त्यावेळी माझ्या डोक्यात एकच होते की, पाकिस्तान आणि भारताचे वैर, आणि तिथे गेल्यावर तिथल्या लोकांशी गप्पा गोष्टी केल्यावर अनेक लोकं असे भेटले की, ज्यांचा नातेवाईक भारतात आहे. कोणी दिल्लीला आहे, कोणी मुंबईला आहे, कोणी लखनौला आहे, कोणी हैद्राबादला आहे. आणि त्यांची मनापासून इच्छा आहे की, त्यांच्या भेटीगाठी व्हाव्यात, त्यांचं जाणंयेणं व्हावं. त्या सर्व नातेवाईकांमध्ये आस्था आहे. द्वेष नाही. आणि त्यात एक मोठा घटक असा आहे की, तो भारतात येऊ इच्छितो. या ठिकाणी परवानगी नाही.

जणगणना पण सुरू करण्याचा कार्यक्रम आता सुरू करत आहेत. त्याच्यामध्ये त्या माणसाचा जन्म ज्या गावात झाला, त्याची नोंद घेऊन करणार आहेत. आपल्याकडे अनेक गावांच्या बाहेर पालं असतात. त्या पालांमध्ये भटक्या जातींचे घटक असतात. आपण रस्त्याने जाताना पाहतो की, ते बांधव घोड्यावर किंवा कशावर आपला संसार थाटून या गावाहून त्या गावाला जायचे. आता या गावातून त्या गावात जाताना ते रेकार्ड कुठं ठेवणार. जर तुमच्याकडे रेकार्ड असेल तर तुम्हाला भारतीय नागरिकत्व मिळणार. त्या लोकांनी काय करायचं. ते जर त्यांनी दाखवले नाही, तर त्यांचा तो अधिकार नाही. ही जर भूमिका घेतली, तर ती न्यायाची भूमिका नाही.

हे आजचं सरकार करत आहे. या सर्वांचा परिणाम अल्पसंख्यांकावर होतोय. सामाजिक न्याय विभागात येणारा जो सगळा घटक आहे, त्यांना याची फळं मिळण्याएवजी याच्या यातना आज व उद्या मिळणार आहेत. म्हणून आपल्या सर्वांना जागृक राहिले पाहिजे आणि या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी एक जबरदस्त संघटन राष्ट्रवादीच्या नावाखाली उभं राहून केले



# राष्ट्रीय एकतेसाठी सर्व समाजांना न्याय द्यायचा आहे

**शरद पवार यांचे उद्गार**

पाहिजे. याच्यात ज्याच्यावर अन्याय होतोय, त्याची त्यातून सुटका करण्यासाठी हातभार लावला पाहिजे. ही जबाबदारी आपली आहे.

गेली पाच वर्षे आपल्याकडे सरकार नव्हतं. या वेळी आलंय. लोकांनी संधी दिली आहे. तीन वेगवेगळ्या पक्षांचे लोकं एकत्र आलेत. आणि आज सरकार त्या ठिकाणी बनलं आहे. आपल्या पक्षाच्या वतीने लहान घटकांच्या कामाचे निर्णय घेण्याचे अधिकार असलेले मंत्रालय आपण आपल्याकडे ठेवले आहे. सामाजिक न्याय खाते, अल्पसंख्याकाचा विभाग आपण आपल्याकडे ठेवला. आपण सांगितले की, दोन अधिकार कमी असणारे मंत्रालय चालेल पण या घटकांसाठी कामं झाली पाहिजेत. या वर्गांसाठी अटी नियम कसे निघतील, यासाठी योगदान द्यायचे आहे. त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी मदत करायची आहे. आणि ती करायची असतील, तर त्या खात्याला, त्या योजनेला राज्य सरकारने मोठया प्रमाणात आर्थिक मदत केली पाहिजे. त्यासाठी आम्ही म्हणालो की, काय कोणाला कोणती खाती घ्यायची असतील ती घ्या, पण अर्थ खाते आमच्याकडे द्या. त्यामुळे पैसा देण्याचा अधिकारच आम्ही आमच्याकडे ठेवतोय. आणि सामाजिक न्याय आणि अल्पसंख्यांक हे दोन्ही आमच्याकडे ठेवतोय. आणि या घटकांसाठी राज्य सरकार अधिकार कसे उत्तम वापरतात, याचे उत्तम चित्र आम्ही दाखवतो. ही भूमिका आपल्या सर्व सहकाऱ्यांनी घेतली.

आणि म्हणून या बैठकीची ही भूमिकाच ही आहे की, जो काही कार्यक्रम ठरवला जाईल, त्यात तुमच्या सर्वांची साथ गरजेची आहे. पूर्वी एका पक्षाचे सरकार असायचे, त्यामुळे त्या पक्षाचे लोकं असायचे. आता यातल्या तीन वाटण्या कराव्या लागणार आहेत. त्याची तीन वाटे करायचे आणि त्यातला एक वाटा आपल्याला उचलायचा आहे. त्यात जे काही येईल, त्यात आम्ही चार वाटण्या करायच्या ठरवल्या आहेत. एक सामाजिक न्याय विभागात काम करणारे आपले घटक, दोन अल्पसंख्यांकांमध्ये काम करणारे घटक, तीन महिलांमध्ये काम करणाऱ्या भगिनी, आणि चार पक्ष संघटनेत काम करणारे सगळे घटक, त्यामध्ये युवक आले, सेवा दल व इतर. त्यामध्ये कार्यकर्त्यांना सहभागी करून घ्यायचे आहे. त्यातून राज्याच्या सगळ्या भागाला आणि सर्व समाजाला न्याय द्यायचा आहे. तुम्ही ज्या ठिकाणी काम करताय, तिथं अधिक लोकांना मदत होईल, याची काळजी घ्यावी. आणि कामाला लागू. संधी मिळाल्यानंतर आपण काम कसे करतो, सत्तेचा वापर कसा करतो, हे महाराष्ट्रातील जनतेला दाखवू. त्यासाठी तयार रहा.

■■



# मागासवर्गीय समाज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी जोडण्याचे काम कार्यकर्त्यांनी केले पाहिजे

## जयंत पाटील यांचे उद्गार

महाराष्ट्राचे मंत्रीमंडळ स्थापीत होत असताना राष्ट्रवादी काँग्रेसकडे कोणती खाती असली पाहिजेत, यासाठी चर्चा होत असताना पवारसाहेबांनी तुम्हाला कोणती खाती मागायची असतील ती मागा, पण ही खाती ठेवा, असं म्हणून दोन खात्यांची नावे दिली. त्यातलं पहिलं खातं सामाजिक न्याय व दुसरं खातं अल्पसंख्यांक विकास होतं. ही दोन्ही खाती घेण्याचा आग्रह आदरणीय पवारसाहेबांनी केला आणि या दोन्ही खात्यांना चांगले संघटक असलेले नेते देऊन त्यांनी त्यांच्यावर मोठा विश्वास टाकलेला आहे.

आज धनंजय मुंडेसारख्या नेतृत्वाला सामाजिक न्याय विभागाची जबाबदारी मिळालेली आहे. आणि राष्ट्रवादी काँग्रेस हा आग्रही नेहमी राहिलेला आहे की, महाराष्ट्रातील पददलितांवर जे पिढ्यानपिढ्या अन्याय झाले, ते दूर करण्यासाठी सामाजिक न्याय विभागातून संधी मिळाली पाहिजे. आम्ही मंत्रीमंडळात 15 वर्षे होतो. काँग्रेस– राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीचे सरकार आलेले असताना. पण, त्यावेळी सामाजिक न्याय विभाग कधी आपल्या पक्षाकडे आला नाही. आज तो विभाग आपल्या पक्षाकडे आलेला आहे. आणि मागील 10 वर्षात बरीच सामाजिक स्थित्यंतरे झालेली आहेत. अशा पक्षाचे सरकार आपण पाहिले आहे की, ज्यांनी आपल्या पिढ्यान्‌पिढ्यांवर अन्याय करण्याची भूमिका ठेवलेली आहे. आणि चातुर्वर्णाचा पुरस्कार करण्याचे कामही भाजपने अप्रत्यक्षपणाने केलेले आहे. आणि म्हणून आज आपल्या सगळ्यांच्या ताकदीने सरकार निर्माण झालेले आहे. आणि आज पुन्हा आपल्या विचारांचे सरकार महाराष्ट्रात स्थापन झालेले आहे. त्यातून महाराष्ट्रात शाहू, फुले, आंबेडकरांचा विचार कसा बळकट होईल, त्यांच्या विचारांना ज्यांनी धक्का लावला, त्यांना खड्यासारखे बाजूला ठेवण्याचे काम महाराष्ट्रात केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घालून दिलेल्या घटनेप्रमाणे देश आणि राज्य चालले पाहिजे, ही भूमिका आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने घेतली पाहिजे. म्हणून आज आपला पुढचा मार्ग कसा असेल, आपल्या सर्वांना कष्ट कसे करावे लागतील, धनंजय मुंडेसारखा नेता जर आपल्याला मिळालेला असेल, तर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जवळपास 99 टक्के ठिकाणी अशी वस्ती नाही की, जिथे आपला समाज नाही. त्या समाजापर्यंत पोचण्याच्या अनेक योजना आपण करणार आहोत. समाजापर्यंत पोचताना तुम्ही मागं राहता कामा नये. सरकार आणि सरकारी कामे होत राहतील आणि तुम्ही मागे रहाल, मग तुमचं राजकीय अस्तित्व वाढणार नाही. आज मिळालेल्या या संधीचे तुमचं तुमच्या गावात, तालुक्यात, जिल्ह्यात तुमचे स्थान बळकट करण्यासाठी या संधीचा वापर करून राष्ट्रवादीचा कार्यकर्ता बळकट झाला पाहिजे. ही भूमिका घेऊन आजची

बैठक बोलावलेली आहे. मी आपल्याला विनंती करतो, पक्ष म्हणून आपण ताकदीने काम केले पाहिजे. मागच्या निवडणुकीत आपण कमी कसे पडलो, याचा विचार करून संघटन वाढविण्याचा विचार तुम्ही सर्वांनी केला पाहिजे. तुम्हाला काय ताकद द्यायची, तुमच्यात काय प्रेरणा द्यायची, जनतेत विश्वास संपादन कसा करायचा, हे काम नक्की करायचे आहे. हे काम करताना तुम्ही ज्या समाजात काम करताय, तो समाज पक्षाला जोडण्याचे काम करायचे आहे. त्यामुळे सामाजिक न्याय विभागात येणाऱ्या सर्व घटकांचा विश्वास संपादन करण्याच काम राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी केले पाहिजे. पवारसाहेब जो







संदेश देतील, तो घेऊन जाऊन आपण कामाला लागायचे आहे.

पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी प्रत्येक तालुक्यातील, जिल्ह्यातील सामाजिक न्याय सेल बळकट करण्यासाठी आपण चर्चा करू. त्यासाठी योजना काय आणायची, काय नाही आणायची, याबाबत धनंजय मुंडे यांच्याशी भविष्यात आपण चर्चा कराल, याबाबत माझ्या मनात शंका नाही. पण, महाराष्ट्रात सामाजिक न्याय विभागातील आमचा कार्यकर्ता असेल, मग तो मातंग समाजातील असेल, बौद्ध समाजातील असेल, आमचा चर्मकार समाजाचा कार्यकर्ता असेल, मग तो कोणत्याही समाजाचा कार्यकर्ता असेल, त्याला ताकद देण्यासाठी, त्याला ताकदीचा करण्यासाठी, महाराष्ट्रातील हे सर्व समाज राष्ट्रवादीशी जोडण्याची अधिक जबाबदारी तुमची आहे. पक्षाचा अध्यक्ष म्हणून मी यात एवढेच सांगेल की, यात जर कोणी कमी पडत असाल तर त्या ठिकाणी पर्याय उपलब्ध करण्याचे कामही पक्षाकडून करू. तुम्ही काही असं समजू नकी की, आपल्याशिवाय पक्ष दुसरीकडे कुठं पाहणार नाही. पर्याय आम्हाला शोधावा लागणारच आहे. त्यासाठी माझी कळकळीची विनंती आहे.

जयदेव गायकवाडसाहेबांनी संघटन अतिशय चांगले केलेले आहे. ते राजकीय कार्यकर्त्यापेक्षा साहित्यिक जास्त आहेत. त्यांचे हळूवार शब्दातील विचार ऐकण्यासारखे असतात. समाजातील प्रबोधनासाठी त्यांनी मांडलेले विचार आपण अनेकदा ऐकलेले आहेत. मी आपल्याला विनंती करेन की, आपण येथून जाताना जास्त ताकदीने काम करण्याचा विडा उचलून जावा. तुमच्या भागात तुमचे अस्तित्व तुमच्या नेत्यांना कळेल, अशा पद्धतीने काम करा.

महाराष्ट्रात आपले सरकार चातुर्वर्ण बाजूला करणार आहे. महाराष्ट्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घालून दिलेल्या विचारांचा प्रभाव कसा वाढेल, हे बघण्याची तुमची सर्वांची जबाबदारी आहे. ती जबाबदारी आपण पार पाडाल, अशी अपेक्षा व्यक्त करतो. ■■

# अण्णा भाऊ साठे यांचेही आंतराराष्ट्रीय स्मारक उभारणार

## धनंजय मुंडे यांची ग्वाही




विधानसभेच्या निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर कोणाच्याही मनात किंचितही वाटलं नव्हतं की, महाराष्ट्रात तीन पक्षांचे सरकार येईल. पण, आदरणीय साहेबांनी महाविकास आघाडीचे जनतेच्या मनातलं जनतेचं सरकार आणलं. त्याबद्दल आपल्या सर्वांच्या वतीने मी साहेबांचे आभार मानतो आणि अभिनंदन करतो.

महाविकास आघाडीमध्ये सहभागी होताना जेव्हा सामाजिक न्याय हा विभाग राष्ट्रवादी काँग्रेसकडे घेतला, त्यावेळी सामाजिक न्याय विभागाचा मंत्री म्हणून साहेबांनी माझ्यावर जबाबदारी दिली. त्याबद्दलही मी साहेबांचे आभार मानतो आणि धन्यवाद देतो. खरं तर ही जबाबदारी घेऊन मला आज 16- 17 दिवस झालेत. पण या सामाजिक न्याय विभागातून आपण काय करू शकतो, हे म्हणण्यापेक्षा साहेबांना जे अपेक्षित आहे, ते किती लवकर करू शकतो, याचा अंदाज मला या 17 दिवसांत नक्कीच आलेला आहे. अनेक जणांच्या मनात विचार येतो की, सामाजिक न्याय विभाग म्हणजे एक ठराविक, पण ज्यांच्या मनात हे येते, त्यांना हे माहिती नाही की, राज्याच्या साडेबावीस टक्के लोकांशी थेट संबंध असणारा जर कोणता विभाग असेल, तर तो हा सामाजिक न्याय विभाग आहे. थेट लाभ आपण महाराष्ट्रातील साडेबावीस टक्के जनतेला देऊ शकतो. या साडेबावीस टक्के लोकसंख्येमध्ये दुर्लक्षित, उपेक्षित, वंचित ज्यांच्यावर पिढ्यानपिढ्या अन्याय झाला, त्यांना न्याय देण्याचे काम या सामाजिक न्याय विभागाचे आहे. आणि ती जबाबदारी आदरणीय साहेबांनी अत्यंत विचारपूर्वक माझ्यावर दिली, हे फार मोठे आव्हान आहे. ते मी एकटा पेलू शकत नाही, ते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा सामाजिक न्याय सोबत असेल तर साहेबांना अभिप्रेत असणारे काम आपण सामाजिक न्याय विभागातून करू शकतो. या विभागामार्फत अनेक योजना, वैयक्तीक लाभ अगदी शिष्यवृत्तीपासून, जातपडताळणीपासून सामाजिक सुधारणा आणण्याचीही जबाबदारी सामाजिक न्याय विभागावर आहे.

आपल्या नेतृत्वाची दूरदृष्टी किती आहे, पहा. अनेक वर्षे राज्याचे नेतृत्व करत असताना, काम करत असताना जशी जशी पिढी बदलते, तसातसा काळ बदलतो. त्याला अनुरूप निर्णय सत्तेत असलेल्यांनी केले पाहिजेत. या बैठकीला आल्यानंतर साहेबांनी मला आदेश दिला की, आज एकविसाव्या शतकातही महाराष्ट्रात काही वस्त्यांना जातीच्या आधारावर नावे दिली आहेत. ती जोपर्यंत पुसली जात नाहीत, तोपर्यंत आपल्याला शाहू, फुले, आंबेडकर यांचा महाराष्ट्र वाटणार नाही. म्हणून साहेबांनी आदेश दिले की, इथून पुढे महाराष्ट्रात मग ते ग्रामीण भागात असो किंवा शहरात कुठंही जातीच्या नावावर वस्ती नको. आणि ती असेल तर त्याच्यात दुरुस्ती केली पाहिजे. त्याला शाहूनगर केले पाहिजे, त्याला आंबेडकर नगर केले पाहिजे, त्याला क्रांतीसूर्य

नगर केले पाहिजे. त्याला अण्णा भाऊ नगर केले पाहिजे. हा निर्णय येणाऱ्या कॅबिनेटमध्ये घेण्याचे आदेश मला साहेबांनी दिले आहेत. मी आपल्या सर्वांच्या साक्षीने सांगतो की, येणाऱ्या कॅबिनेटमध्ये याचा फक्त निर्णय नाही होणार, तर एक महिन्याच्या आत महाराष्ट्रात जिथे कोठे आणि सरकारच्या ज्या कुठल्या नोंदीमध्ये अशी जातीची नगर असतील, ती त्यांची ओळख पुसून शाहू, फुले, आंबेडकर, साठे नगर करण्याची जबाबदारी मी घेतली आहे.

सामाजिक न्याय विभागाचे काम फार मोठे आहे. परंपरागत त्याच योजना आहेत. तीच माणसं आहेत. लाभार्थ्यांपर्यंत काय जातं, हे मला आजपर्यंत कळालेलं नाही. सामाजिक न्याय विभागाच्या आजच्या या बैठकीमध्ये या विभागाचा मंत्री म्हणून मी आपल्याला सांगतो की, खऱ्या लाभार्थ्याला आणि वंचितातील वंचित समाजघटकाला ज्याला खऱ्या अर्थाने न्यायाची गरज आहे, त्याच्यापर्यंत सामाजिक न्याय विभाग न्याय आणि लाभ पोचविल्याशिवाय राहणार नाही.

त्यामुळे ते दिव्यांग ठरतात. हे फार मोठे काम आहे. साहेबांनी मंत्री म्हणून जबाबदारी माझ्या खांद्यावर दिली आहे. मी ती पेलू शकेल, साहेबांची जी इच्छा आहे, ती यशस्वीपणे पारही पाडू शकेल, असा विश्वास तुमच्या सर्वांकडे पाहिल्यानंतर मला येतो.

एवढंच हे करून जमणार नाही. साहेबांसमोर माझी विनंती आहे की, एक परवानगी द्या. शाहू- फुले- आंबेडकर- छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र आपल्याला पहायचा आहे. आज काय चालले आहे. माफ करा ही पक्षाची बैठक आहे, पण महापुरुषही आपण जातीत वाटून घेतले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांची जयंत म्हटली की, फक्त मराठा समाजाने एकत्र येऊन जयंती करायची का. परमपूज्य बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती म्हटली की, मागासवर्गीय समाजाने पुढं यायचे आणि त्यांची जयंती साजरी करायची का? साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांची जयंती म्हटली की, मातंग समाजाने पुढे यायचे आणि त्यांची जयंती साजरी करायची. महात्मा फुले यांची जयंती म्हटली की, माळी



या विभागामध्ये दुरुस्त्याही कराव्या लागणार आहेत. त्या करत असताना स्वाभाविकपणे काही लोकांची मनेही दुखावली जाणार आहेत. कारण, त्याच्यात अनेक जणांचे अनेक वर्षांपासूनचे संबध जोडलेले आहेत. याची पर्वा मी कधीच केलेली नाही. हे बदल केल्याशिवाय सामाजिक न्याय होऊच शकत नाही. म्हणून या सामाजिक न्यायामध्ये आपण येणाऱ्या काळामध्ये हे बदल करणार आहे. त्याच्यासाठी पहिला विचार घेऊ तो, आपला जो राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा सामाजिक न्याय विभाग आहे, जयदेव गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी आम्हाला सूचना द्याव्यात आपल्याला सामाजिक न्याय विभागामध्ये आणखी काय गोष्टी करता येतील. तुम्ही सांगा, आपण त्यात बदल करू. अनेक बदल करावे लागणार आहेत. वेगळे कायदे करावे लागणार आहेत.

हा सामाजिक न्याय विभाग फक्त मागासवर्गीय विभागातील जेवढ्या काही जाती आहेत, त्यांच्यासाठी नाही. निराधारांना साह्य करण्याचा विषयही या सामाजिक न्याय विभागातून येतो. विधवा, परितक्त्यांपासून श्रावणबाळ असो, निराधाराच्या योजना असो, दिव्यांगांच्या असो, आता वेगवेगळे 21 आजार आले आहेत,

समाजाने पुढे यायचे आणि त्यांची जयंती साजरी करायची. खरंच आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी जे स्वराज्य उभं केलं. ते काय फक्त मराठा समाजासाठी नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात अठरा पगड जातीचे राज्य होते. त्या स्वराज्यात अठरा पगड जातीला न्याय होता. त्यामुळे शिवाजी महाराजांचे स्वराज्य, भोसल्याचे स्वराज्य असं कधीच म्हणत नाही, तर रयतेचे स्वराज्य असं म्हणतात. परमपूज्य बाबासाहेबांनी जे संविधान लिहिले ते काय फक्त मागासवर्गीय समाजासाठी होते, आज या देशातील प्रत्येक माणूस ताठ मानेने जगू शकतो. लिहू शकतो, बोलू शकतो, पाहिजे ते करू शकतो, ते फक्त परमपूज्य बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला संविधान दिल्यामुळे. हे संविधान लिहिले ते काय फक्त मागासवर्गीय समाजासाठी होते? मग का आपण त्यांना आपल्यापुरते ठेवतो. आपल्या साहित्यातून, आपल्या लेखनीतून ज्या अण्णा भाऊंनी उपाशीपोटी राहून उपाशी माणसाची व्यथा लिहिली, तो उपाशी माणूस फक्त मातंग नव्हता. प्रत्येक उपाशी माणसाची व्यथा अण्णा भाऊंनी आपल्या लेखनीतून केली. आपण मात्र अण्णाभाऊंना आपल्या समाजापुरते ठेवतो. महात्मा

फुल्यांचे पण तसेच आहे. प्रत्येक महापुरुषाची ती अवस्था आहे.

आता सामाजिक न्याय विभागाची ती जबाबदारी आहे, परिवर्तन करावे. महापुरुषांनी एवढे मोठे काम केले आहे, की ते एका जातीपुरते मर्यादित नाही. पिढ्यानपिढ्या सांगण्याचे आहे. पुढच्या पिढ्यांना काय सांगणार आहे. एकविसाव्या शतकाहीतही हे सांगणार का, हे या जातीचे, ते त्या जातीचे. बदल आपल्याला करावा लागणार आहे. अशासाठी आदरणीय साहेबांशी चर्चा करून माझ्या सामाजिक न्याय विभागातील परळीमध्ये प्रस्थापित केलेले आहे. हे महाराष्ट्रामध्ये करावे, तरच महापुरुष महाराष्ट्रातील, देशातील जनतेला सर्वांची वाटतील. पुन्हा हे माझे, ते तुझे, हे असलं कशाला पाहिजे. आणि ही महापुरुषांची जयंती गावातील महत्त्वाच्या ठिकाणीच झाली पाहिजे. आपण पाहतोय की, 14 एप्रिल म्हटलं की, जयंती कुठं जाऊन साजरी करायची. अण्णा भाऊ साठे यांची जयंती म्हटली की, कुठं जाऊन साजरी करायची. हे का. हे बदल आपल्याला करायचे आहेत. आणि एकदा का हे बदल झाले, आणि महाराष्ट्राच्या पुरोगामी



सहकाऱ्यांशी आदरणीय जयंत पाटीलसाहेब, दादांशी चर्चा करून या महाराष्ट्रातील प्रत्येक गावात, प्रत्येक शहरात ज्या ज्या महापुरुषाची जयंती साजरी होत आहे, ती सर्व समाजाने एकत्र येऊन समता प्रस्थापित करून खऱ्या अर्थाने शाहू, फुले, आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांची समता आणायची आहे. त्यासाठी या गावांना वेगवेगळे पुरस्कारही आहेत. आम्ही केलयं, परळी शहरात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती कार्यक्रमाचा अध्यक्ष पुरोगामी विचाराचा ब्राम्हण समाजाचा असतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सार्वजनिक जयंतीचा अध्यक्ष हा मुस्लीम समाजाचा असतो. हे गेली 15 वर्षे आपण मातीत एवढा जरी बदल झाला तरी हे जातीयवादी पक्ष एवढे खाली जातील की, येणाऱ्या 50 वर्षांतही वरती येणार नाहीत.

आपल्या या कामातून आणि सामाजिक न्याय विभागाच्या मंत्रालयातून समाजिक न्याय विभागाला आपण जे काही सांगाल, आपल्या या पक्षाच्या सामाजिक न्याय विभागाच्या संघटनेला जे काही सांगाल साहेबांच्या आदेशावरून आपली कामेच नाही तर सामाजिक न्याय विभागातून न्यायही मिळेल आणि प्रतिष्ठाही मिळेल. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचा हाच आपला सामाजिक न्याय विभाग आहे, तो आपल्याला न्याय देतो, हे वंचित व उपेक्षित समाजाला येणाऱ्या काळात वाटेल, ही भूमिका मी मंत्री असलो

तरी स्वीकारली आहे.

मी आदरणीय साहेबांचे मनापासन आभार मानतो की, ज्यावेळी 2011 ला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक मुंबईत आंतरराष्ट्रीय करण्याचे ठरलं, त्यावेळी इंदू मिलची जागा देण्याचा निर्णय साहेबांनी त्यावेळी देशाचे कृषिमंत्री असताना पुढाकार घेऊन केला. स्मारक करण्याचा निर्णयही आपण आघाडी सरकारमध्ये असताना 2013 मध्ये घेतला. पाच वर्षात अनेक कार्यक्रम पाहिले, राज्याचे, देशाचे. माननीय पंतप्रधानांनी भूमिपूजनही केले, पण अजून काही झाले नाही. आता अत्यंत कमी वेळेत काम पूर्ण करायचे आहे, साहेबांच्या आदेशानी. आता बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाची स्वनियंत्रण करण्याची आणि प्रतिकृती करण्याची जबाबदारी सामाजिक न्याय विभागाकडे आलेली आहे. परवा दिवशी स्मारकाच्या जागेची साहेबांनी पाहणी केली. काही सूचना



आहे. मी आज साहेबांच्या समोर अत्यंत जबाबदारीने सांगतो, आपण परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकांची 14 एप्रिल 2023 ची जयंती इंदू मिलच्या आंतरराष्ट्रीय स्मारकात साजरी करू. हे आव्हान मी माझ्या खांद्यावर घेतले आहे. साहेबांनी ते दिले आहे. याच्यासारखं दुसरं वैभव माझ्यासाठी कोणतेही नाही. माझ्यासाठी याच्यासारखा दुसरा कोणताही गौरव नाही. वंचितातल्या वंचित, दिव्यांग, अनाथ, परावलंबी असलेल्यांना न्याय देण्याची जबाबदारी माझ्यावर या सामाजिक न्याय विभागातून दिली. त्यामुळे मी पुन्हा आपल्याला शब्द देतो की, आपल्या सर्वांच्या सहकार्यातून या सामाजिक न्याय विभागाचे काम असे करू, की या सामाजिक न्याय विभागातील सर्व समाजाला फक्त आपणच या ठिकाणी न्याय देऊ शकलो. तेही फक्त पवारसाहेबांनी आपल्याला न्याय दिला, हे 50 वर्षे हृदयावर कोरले जाईल.

आदरणीय जयदेव गायकवाड साहेब म्हणाले की, परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वारसा खऱ्या अर्थाने जर कोणी चालवला असेल, तर तो आपल्या साहेबांनी चालवला आहे. तो वारसा चालवत असताना परिणामांचा विचार केला नाही. मराठवाडा विद्यापिठाच्या नामांतराचा विषय आला, जिवलग सहकाऱ्यांनीसुद्धा साहेबांना सांगितले की, हा निर्णय तुम्ही घेऊ नका. परिणाम होतील, पण मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्ताराचा निर्णय घेऊन सत्तेला लाथ मारणारा विचारांचा वारस या देशात दुसरा कोणी नाही. त्यांच्या नेतृत्वाखाली आपण सगळे काम करतोय, याचा आपल्या सगळ्यांना अभिमान असला पाहिजे.

अण्णा भाऊ साठे यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाबाबत आजपर्यंत कोणीही मागणी केली नव्हती. समाजानेही केली नव्हती. अरे, या समाजात आपण लहानाचे मोठे झालो. मी सामाजिक न्याय विभागाचा मंत्री असल्यामुळे तशी मागणी पण केली. स्मारक करण्याची जबाबदारी गृहनिर्माण विभागाची



असल्यामुळे मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी तशी घोषणाही केली. मी त्यांना म्हटलो की, आपण आंतरराष्ट्रीय स्मारकाची घोषणा केली पाहिजे. हे सर्व आपल्याला करायचे आहे. हे स्मारक पिढ्यानपिढ्या एका जातीचा माणूस आहे म्हणून नाही तर माणसाला माणूस म्हणून जगण्याची प्रेरणा दिली आहे, म्हणून ते स्मारक आहे.

मी पुन्हा एकदा शब्द देतो की या सामाजिक न्याय विभागात साहेबांना अभिप्रेत आहे, असे काम करू. ज्या अपेक्षेने साहेबांनी माझ्यावर ही जबाबदारी दिलेली आहे, ती पूर्ण करायला पाच वर्षांचा वेळ आहे. मी आपल्याला शब्द देतो की, याचे परिणाम फक्त आपण अडीच ते तीन वर्षांत साहेबांना दाखवून देऊ, फक्त त्यासाठी आपली साथ पाहिजे.

■■

# पवारसाहेब हेच बाबासाहेबांच्या विचारांचे खरे वारसदार

## जयदेव गायकवाड यांचे उद्‌गार




साहेबांना मी सर्वप्रथम धन्यवाद देतो. मध्यंतरीच्या काळात प्रचंड संसदीय लढाई झाली. आपण सर्व कार्यकर्त्यांनी अंग मोडून काम केले. झालेल्या परिवर्तनाचे आपण शिल्पकार आहात. साहेब, यावेळच्या निवडणुकीबाबत सर्वत्र प्रचंड चर्चा झालेल्या आहेत. परंतु, आंबेडकर चळवळीतील सर्व कार्यकर्ते मनापासून अभिनंदन करतो की, खऱ्या अर्थाने हे की आम्हाला अपेक्षित असलेले आंबेडकरी विचारांचे परिवर्तन आपण घडवले. त्यामुळे आम्हाला मनापासून खूप समाधान वाटते.

मागच्या पाच वर्षात आम्ही पाहिले की, केंद्रात भाजपची सत्ता, राज्यात भाजपची सत्ता. त्यामुळे प्रत्येक दिवस आम्ही वैयक्तीक पातळीवर जगत असतानाही निराशाजनक जायचा. आर्थिक स्वरूपाचे प्रश्न, सामाजिक असे प्रश्न संपूर्ण देशात या लोकांनी असे प्रश्न निर्माण केले, आणि आम्ही पाहतोय की, गेल्या दीड महिना महाराष्ट्रात एक प्रकारचे स्वास्थ्य निर्माण झाले आहे. एका प्रकारची सामाजिक संतुलन करण्याची केवढी मोठी ऐतिहासिक कामगिरी आपण केलीत. गेली दीड दोन महिने हे सरकार कशा पद्धीने काम करतय, हे पाहिल्यानंतर हे आपल्या विचारांचे सरकार आहे. शाहू, फुले, आंबेडकर विचारांचे एक एक पाऊल टाकल्यावर खूप समाधान वाटते.

मी आपल्याला एक पत्र दिले आहे. त्यात फक्त तीन-चार मुद्दे मांडलेले आहेत. आदरणीय दादांनी इंदू मीलला भेट दिल्यानंतर महाराष्ट्रात एक वेगळ्या प्रकारची चर्चा सुरू झाली. एक चैतन्य निर्माण झाले. आणि साहेब आल्यानंतर आंबेडकरी जनतेमध्ये एक आनंद निर्माण झाला की, आता हे स्मारक होणार. साहेब, आपण 2011 सालामध्ये पक्षाचा वर्धापनदिन साजरा करताना एक सनद जाहीर केलेली होती. त्यामध्ये इंदू मीलच्या 12 एकर जागेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय स्मारक झाले पाहिजे, ही मागणी आम्ही पाचव्या क्रमांकावर टाकली होती. त्यावेळी तुम्ही विचारले की, ही मागणी पाचव्या क्रमांकावर का. ती मागणी तुम्ही पहिल्या क्रमांकावर टाकली. त्यावेळी आम्हाला लक्षात आले तुमचे बाबासाहेब आंबेडकरांवरील प्रेम किती आहे. नंतर आपण पाठपुरावा केला. त्यावेळेच्या पंतप्रधानांना भेटला. परंतु, 2014 साली आपले सरकार गेल्यानंतर इंदू मीलचा प्रोजेक्ट भाजपने हायजॅक केला. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक आम्हीच करणार, आम्हीच पूर्वी केले, अशा प्रकारच्या वल्गना केल्या गेल्या. पंतप्रधानांच्या हस्ते भूमिपूजन केले, परंतु प्रत्यक्षात कामाची एक वीट देखील लावली नाही. दरम्यानच्या काळात आम्ही तेथे जाऊन भेटी देत होतो, पण ते काम काही करत नव्हते. त्यानंतर आम्हाला लक्षात आले की, आपले सरकार आल्यानंतरच हे काम होणार. आणि परवा आपण गेल्यानंतर त्या परिसराची पाहणी केल्यावर आम्हा आंबेडकरवादी चळवळीच्या व सामाजिक न्याय विभागाच्या लोकांना आपला अभिमान वाटला.

महाराष्ट्र हे असे एक पुरोगामी राज्य आहे की, तेथे परिवर्तनाची प्रक्रिया दैनंदिन चालू असते. सरकारने याबाबत निश्चितपणे पावले टाकली पाहिजे, अशी जनतेची इच्छा असते.

आम्ही मागासवर्गीय समाजातून आलेले आहोत. येथे जवळपास तीस जिल्ह्यांतून कार्यकर्ते आलेले आहेत. गावांच्या रचनेमध्ये एक अदृश्य भिंत असते, तिला आपण वेस म्हणतो. कधी कधी वेशीची बांधणीही मजबूत असते. पण, कळत न कळत वेशीच्या आतले आणि वेशीच्या बाहेरचे, अशी गावाची रचना आहे. आणि वेशीच्या बाहेर पूर्वीचे अस्पृश्य लोक असायचे. मनुस्मृतीने तयार केलेल्या रचनेमध्ये ती पद्धत होती. म्हणून आम्ही सामाजिक न्याय विभाग मागणी करतोय की, या गावांच्या रचनेचा फेरविचार केला पाहिजे. आम्ही असं म्हणत नाही की, ती बाहेरची आतमध्ये घ्या, पण ती जी काही अदृश्य भिंत आहे, गावाची विभागणी करणारी, ती आपण तोडली पाहिजे आणि आपण मांगवाडा, महारवाडा, अशा पद्धतीने वापरू नका. दलित हा शब्द वापरू नका, असं हायकोर्टाने सांगितले. त्यामुळे तो वापरत नाही. तसा दलित हा शब्द काही जास्त वावगा नव्हता. साहित्यात तो रुळलेला होता. त्याच्या तपशीलात मी जाणार नाही. परंतु जेव्हा मी आमच्या गावात जातो, त्यावेळी अनेक मुलं मला ओळखत नसतात. त्यांना सांगितले जाते की, हे जयदेव गायकवाड, ते बौद्ध वाड्यात असायचे. तर, हे बौद्ध आहेत, अशी जी प्रथमदर्शनी दिसणारी अस्पृश्यता आहे, ती अस्पृश्यता नष्ट केली पाहिजे. ही जातीवाचक वस्त्यांना असणारी नावे आहेत, ती नष्ट केली पाहिजे.

बाबासाहेब असतानाच जी परिवर्तनाची वाटचाल चालू होती. त्यावेळेच्या महार लोकांनी आपल्या वस्तीला राजवाडा असं म्हणून त्याचे उद्दातीकरण करण्याचा प्रयत्न केला. परंतु राजवाडा म्हटल्यानंतर लोकं हसायचे. आजही त्या वस्त्यांची नावे आहेत. मी पुण्यात राहतो. आज पुण्यातल्या अनेक वस्त्यांची नावे जातीवाचक आहेत. चमडी गल्ली आहे. ढोर गल्ली आहे. चांभार गल्ली आहे. मला असं वाटतंय की, आपण प्रगती केलेली आहे. शिक्षण घेतलेले आहे. शिक्षण घेतलेला नवीन पिढीतील मुलगा ज्यावेळी गावाला जातो, त्यावेळी तो आम्ही मांगवाड्यात राहतो, असं सांगत नाही. त्यामुळे त्याला विकासनगर असे नाव द्या. प्रगतीनगर नाव द्या. किंवा अण्णा भाऊ साठे नगर नाव द्या. बाबासाहेब आंबेडकर नाव द्या. पण महापुरुषांची नावे नाही दिली तरी चालतील. अशी अनेक नावे असतील. प्रगतीचे प्रतिक असू शकतात. ही एक छोटीशी मागणी आहे. एक आदेश जरी काढला की, ही जातीवाचक नावे काढून टाका, तरी आंबेडकरी चळवळीला प्रचंड आनंद होईल, याची मला खात्री आहे.

अण्णा भाऊ साठे यांचे महाराष्ट्रासाठी मोठे योगदान आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत 105 लोकं हुतात्मे झाले. ते का हुतात्मा झाले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीसाठी मोठ्या सभा व्हायच्या. त्या सभा रंगवण्याचे काम कोणी केले असेल तर अण्णा भाऊ साठे आणि शाहीर अमर शेख. अण्णा भाऊ यांच्या साहित्याबद्दल बोलेल तेवढे कमी आहे. त्यांच्या साहित्याची जगातील अनेक भाषांत भाषांतरे झाली. त्यांनी साहित्यात सर्वसामान्य माणसाचे दुःख मांडले. त्यांना भारतरत्न द्यावे. स्मारकाबाबत मी मुंडेसाहेबांशी बोललो. त्यांच्याशी जयंतीबाबत बोलत असताना ते म्हणाले की, आपण त्यांचे आंतरराष्ट्रीय स्मारकही करू शकतो. तीही मागणी करतो. आणि त्यांना भारतरत्न द्यावे, याबाबत साहेबांनी प्रयत्न करावेत.

परिवर्तनाची ही प्रक्रिया करण्याकरिता पक्षाला विनंती आहे की, आंबेडकर जयंती महाराष्ट्रात साजरी केली जाते. मुंबईत एक जयंती साजरी करावी, आपल्या सोईच्या तारखेनुसार. त्यात आम्ही सांस्कृतिक कार्यक्रम आम्ही सादर करू. पण, पवारसाहेब उपस्थित असताना एक जयंती मुंबईत साजरी करा.









शाहू महाराजांची जयंती कोल्हापूरला साजरी करतो. फुल्यांची जयंती वाड्यावर जाऊन करतो. अण्णा भाऊंची जयंती वाटेगावला जाऊन करतो. तशी आंबेडकर जयंतीला सर्व मंत्रीमंडळ उपस्थित राहील, अशी अपेक्षा व्यक्त करतो. त्यातून महत्त्वाचा संदेश देशभर जाईल.

साहेब, सत्तांतर झाल्यामुळे आता कार्यकर्त्यांना वाटते की, आपल्याला काहीतरी मिळाले पाहिजे. कारण, आपला पक्ष हा परिवर्तनवादी आहे. त्यामुळे तळातील कार्यकर्त्यालाही न्याय मिळाला पाहिजे. तुम्ही आमचे आयडॉल आहात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यानंतर जर आमचे कोणी आयडॉल असतील, तर ते शरद पवारसाहेब आहेत.

हा समाज एकसंध पाहण्याचे स्वप्न बाबासाहेबांनी राज्यघटनेतून सांगितले. पण, आंबेडकर चळवळीकडे पाहिल्यानंतर आमचे प्रकाश आंबेडकर हे नेहमी मुख्य प्रवाहापासून दूर चाललेले दिसतात. मला त्यांच्यावर टीका करायची नाही. पण, त्यांचे विश्लेषण झाले पाहिजे. ते भूमिका अशी काही घेतात की, ते संघाच्या आणि भाजपच्या फार विरोधात आहेत. पण, प्रत्यक्षात ते भाजप आणि संघालाच मदत करतात. असं दाखवतात की, ते काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे विरोधक आहेत आणि ते असं दाखवतात आणि काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे सगळे लोक हे श्रीमंत आणि सरंजामदार आहेत. आपण त्यांना सांगितले पाहिजे. मी काँग्रेसबाबत सांगणार नाही, पण ज्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेतृत्व आदरणीय शरद पवारसाहेब करतात, त्यांनी केलेल्या निर्णयाकडे पाहिल्यानंतर असं वाटते की, मी फक्त एकच निर्णय सांगतो की, बाबासाहेबांनी राज्यघटनेत सांगितले की, कायद्यापुढे सर्व समान आहेत. स्त्री असो, पुरुष असो. पण, तसं होतं का, साहेबांनी पाहिले की स्त्रीयांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून जाता येत नाही. त्यामुळे स्त्रीयांसाठी राखीव जागा निर्माण करण्याचा निर्णय या देशात पहिल्यांदा पवारसाहेबांनी केला. आज स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्रीया 50 टक्के काम करतानाचे चांगले चित्र दिसते. म्हणून बाबासाहेबांच्या विचाराची खऱ्या अर्थाने अंमलबजावणी पवारसाहेबांनी केली. त्यामुळे ते बाबासाहेबांचे विचाराने नातू शोभतात. कोणी स्वतःला बाबासाहेबांचे नातू समजत असतील, पण त्यांनी लक्षात ठेवावे की तुम्ही नातू आहात, आमचा त्याला विरोध नाही. पण, तुम्ही फक्त त्यांच्या प्रॉपर्टीचे वारस आहात. विचारांचे वारस आम्ही देखील असू शकतो. पवारसाहेब आहेत. असं म्हणतात की, राष्ट्रवादी काँग्रेसवाले, पवारसाहेब इंदू मीलच्या जागेवर गेले आणि त्यांनी मतांवर डोळा ठेवला. उलट इंदू मीलची जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाला दिली पाहिजे, हे सर्वात प्रथम पवारसाहेबांनीच सांगितले. चार- पाच वर्षात ते झाले नाही. आता गती मिळत आहे तर लोकांचा बुद्धीभेद करण्याचा प्रयत्न केला जात आहे. आपण संघटनेच्या पातळीवर प्रयत्न आणि खेडोपाडी लोकांना सांगू की, सर्वसामान्य लोकांनाही सत्तेत आले पाहिजे, बाबासाहेबांनी पाहिलेले स्वप्न फक्त पवारसाहेब साकार करतात. आम्ही त्यांच्या पाठिशी उभे राहू.

■■

Nanded City, Pune

The Maximum City

Sinhagad Road, Pune

A 700 Acre Mega Township on Sinhagad Road, Pune.

# प्रत्येक घराला एक मन असतं.
# प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्व असतं.

आमच्या प्रत्येक घराचं मन आहे उत्साही, चैतन्यशील, आशावादी, जगण्याच्या ऊर्जेने पुरेपूर भरलेलं, आणि आमच्या शहराचं व्यक्तिमत्व आहे अभिरूचिसंपन्न, सुसंस्कृत, सर्वसमावेशक, निसर्गप्रेमी आणि भविष्यसन्मुख. कारण आम्ही आहोत नांदेड सिटी, ७०० एकर्सचं अतुलनीय जग, जिथे आहे संपूर्ण कुटुंबाच्या आणि कुटुंबातल्या प्रत्येकाच्या सुखाचा, सुरक्षिततेचा, आरोग्याचा आणि आनंदाचा सखोल विचार.

## आनंदी संकुल



**कुटुंबासाठी प्रफुल्लित, प्रदूषणमुक्त पर्यावरण**

- इको पार्क व ऑक्सिझोन
- १३,२०० पेक्षा जास्त झाडांची लागवड
- १२० एकर्सची हिरवाई

## CBSE व ICSE शाळा



**विद्यार्थ्यांसाठी प्रगतीशील वातावरण**

- CBSE व ICSE बोर्डाच्या शाळा
- दर्जेदार शिक्षण
- वॉक-टू-स्कूल मॉडेल

## जिमखाना



**तरूणाईसाठी अगदी आदर्श सिटी**

- सायकलिंग व जॉगिंग ट्रॅक्स
- २४,००० स्क्वे. फूट जिम्नॅशियम
- क्रीडांगण-द स्पोर्टस् कॉम्प्लेस (प्रस्तावित)
- विविध खेळांच्या स्पर्धा व कोचिंग

**नांदेड सिटी, उत्साही मन आणि उमदं व्यक्तिमत्व यांचा देखणा मिलाफ!**

A project by MAGARPATTA CITY

The pride of Pune

Call: 020-67275300 / 1 / 2

CREDAI PUNE METRO

www.nandedcitypune.com

info@nandedcitypune.com

An ISO 9001:2008, ISO 14001:2004, OHSAS 18001:2007 certified company.

tempestadvertising.com

# अर्थसंकल्प २०२०-२१

# चाकोरीबध्द आणि मागे जाणारा!

**आकाश**, नवी दिल्ली

**एक परिस्थिती गृहीत धरुन अर्थसंकल्पात उद्दिष्ट प्राप्तीची अपेक्षा करण्यात आली आहे. त्यामुळेच या घोषणांच्या अंमलबजावणीत गडबड झाल्यास सर्व आर्थिक खेळ बिघडण्याचा धोका नाकारता येत नाही. अर्थव्यवस्थेपुढील सर्वच संकटांना या अर्थसंकल्पाने उत्तरे दिली आहेत अशी स्थिती नाही. कच्च्या खनिज तेलाच्या आंतरराष्ट्रीय किंमतवाढीची तलवार अद्याप लटकतच आहे. रोजगारासाठी ठोस उपाययोजनांचा अभाव कायम आहे.**




AIR INDIA
BSNL
IDBI BANK
LIC
22795
Union
BUDGET
2020
INCOME
TAX

गंभीर आजारासाठी औषधयोजनाही काहीशी अधिक कठोर व प्रभावी-परिणामकारक करावी लागते ज्यामुळे गंभीर आजाराला काहीसा उतार पडून मग त्याआधारे पुढील उपाययोजना करणे शक्य होते. भारतीय अर्थव्यवस्था मंदगतीच्या संकटात सापडलेली आहे. गेली दोन वर्षे ही स्थिती कायम आहे आणि अर्थव्यवस्था उचल खाताना आढळत नसल्यानेच 2020-21च्या अर्थसंकल्पाकडे सर्वांच्या नजरा लागलेल्या होत्या. प्रत्यक्षात सरकारने रोगावर कडू औषध देण्याचे धाडस दाखवले नाही. उलट काही पुरोगामी किंवा प्रागतिक पावले उचलण्याऐवजी 'पुच्छगामी' उपाययोजना करण्यात सरकारने समाधान मानल्याचे आढळून येते. प्राप्तीकराच्या दरात कपात करण्याची बाब स्वागतार्ह असली तरी त्यामध्ये सहा श्रेण्या करुन प्राप्तीकर आकारणीतील गुंतागुंत कमी करण्याऐवजी वाढवून ठेवली आहे. देशातील उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी आयात शुल्कात वाढ करण्याचा निर्णयही असाच 'पुच्छगामी' आहे कारण हा प्रकार चक्क



घड्याळचे काटे उलटे फिरविण्याचा आहे. परदेशी मालाबरोबर भारतीय मालाची स्पर्धा झाल्यानंतरच लोकांना दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण वस्तु मिळतील. परंतु परदेशी वस्तुंवरील आयात शुल्क वाढवून त्यांची भारतीय बाजारातील उपलब्धता किंवा प्रवेश बंद केल्यास देशी मक्तेदारीचा धोका निर्माण होऊ शकतो. एकेकाळी भारतात फक्त बजाज व लँब्रेटा या दोन स्कूटर, फियाट व अँबॅसिडर या दोन मोटारी आणि दोन किंवा तीन मोटारसायकली उपलब्ध होत्या आणि लोकांना स्कूटरसाठी अतिरिक्त पैसे द्यावे लागत किंवा वर्षानुवर्षे थांबावे लागत असे. परंतु 1991 मध्ये जशी भारतीय बाजारपेठ खुली झाली त्यानंतर लोकांना विविध पर्याय उपलब्ध झाले आणि दर्जेदार उत्पादनेही मिळू लागली. या सरकारने आयात शुल्क वाढ करुन हे एक प्रतिगामी पाऊल उचलले आहे ज्यामुळे स्पर्धेऐवजी बाजारपेठ डबक्यासारखी साचलेली होण्याचा धोका संभवतो.

प्राप्तीकराचे उदाहरण घेतले तरी हेच लक्षात येईल. उत्पन्नाच्या मर्यादांमध्ये फेरबदल करुन सहा प्रकारची वर्गवारी करण्यात आली आहे. कराच्या दरात एवढी विविधता सर्वसाधारणपणे नसावी अशी एक अपेक्षा असते. परंतु या सरकारने पुन्हा एकदा पूर्वीप्रमाणे दरांची संख्या व विविधता वाढविलेली आहे. याचबरोबर प्राप्तीकरातून सवलत मिळविण्यासाठी करदात्यांना ज्या विविध बचतीच्या संधी आतापर्यंत उपलब्ध होत्या त्यात मोठी कपात करण्यात आली आहे. अर्थमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे प्राप्तीकर कायद्यात जवळपास शंभर अशा सवलतींच्या संधी उपलब्ध होत्या. त्यातील जवळपास सत्तर सवलती रद्द करण्याचा निर्णय झाल्याची माहितीही अर्थमंत्र्यांनी दिली. तसेच आगामी काळात उर्वरित सवलतीही बंद केल्या जातील असे सूतोवाचही त्यांनी केले आहे. यामागील तर्क देताना त्यांनी सांगितले की प्राप्तीकरासाठी एक नवी योजना लागू करण्यात येत आहे. त्यानुसार करदात्याला (तो ज्या श्रेणीत आहे त्यानुसार) कोणत्याही सवलतींचा लाभ न घेता वार्षिक प्राप्तीकर जेवढा








लागू होत असेल तर तो पूर्ण भरुन सुटकेचा निःश्वास टाकता येणार आहे. म्हणजेच सध्या करदाते विविध बचतीच्या संधी शोधून आपल्या स्वतःच्या भविष्यासाठी बचत करीत असतात त्याऐवजी त्यांनी त्या वर्षाच्या त्यांच्या उत्पन्नावर जो कर लागू होतो तोच पूर्ण भरुन टाकल्यास त्यांना बचतीचे मार्ग शोधत बसण्याची गरज भासणार नाही. उदाहरणार्थ एखाद्या करदात्याला त्याच्या उत्पन्नानुसार वर्षाला पाच हजार रुपये कर भरणे अपेक्षित असेल तर सध्याच्या तरतुदींनुसार त्याला वर्षाला त्याच्या पाचपट बचत दाखवावी लागते म्हणजेच पंचवीस हजारांच्या बचतीवर त्याला पाच हजार रुपयांचा कर वाचविता येणे शक्य होते. परंतु ज्यांना ही बचत शक्य नसते ते थोडीफार बचतही दाखवतात आणि करही भरतात. यात त्यांची ओढाताण होते. हे टाळण्यासाठी सरकारने आता कमी केलेल्या करांमुळे जेवढा कर बसतो तेवढा भरुन रिकामे होणे असा प्रस्ताव केलेला आहे. दिसायला ही बाब सोपी सरळ वाटत असली तरी यामुळे लोकांना बचतीचे मार्गच बंद करण्याचा हा भयंकर प्रकार आहे. आपल्या भविष्यासाठी आणि वृध्दापकाळासाठी लोक बचत करीत असतात व कर वाचविणे हे त्यासाठी निमित्त असते. परंतु ते निमित्तच नष्ट करुन सरकार लोकांना बचतीचे दरवाजे बंद करुन हाती आलेले पैसे उडविण्यास उद्युक्त करु पहात आहे. यामुळे लोक खरेदी करु लागतील, बाजारातील मागणी व खप वाढेल आणि अर्थव्यवस्थेला चालना मिळेल असा काहीसा विचित्र प्रयोग सरकारने या अर्थसंकल्पात केलेला आहे. त्याचे परिणाम काय होतील हे आगामी काळात कळून येईलच.

लोकांच्या बचतीचे पैसे सरकारलाच निधी म्हणून उपलब्ध होत असतात ही बाब देखील सरकार विसरलेले असावे. अशा स्थितीत सरकारकडे विविध कार्यक्रमांसाठी पैसे मिळविण्याचा एक मार्गच बंद होणार आहे. सर्वसामान्य लोकांकडून विविध मार्गांनी केल्या जाणाऱ्या बचती हा सरकारच्या हातातला एक हुकमी पत्ता असतो आणि त्या पैशाचा भांडवल म्हणून सरकारला उपयोग करता येतो. परंतु हा मार्ग बंद करण्यामागील सरकारचा हेतु लक्षात न येणारा आहे. अर्थव्यवस्थेच्या आरोग्याचा थर्मामीटर म्हणून 'वित्तीय तूट' या घटकाकडे पाहिले जाते. सर्वसाधारणपणे वित्तीय तूट आणि चलनवाढ म्हणजेच महागाई निर्देशांक यांच्या आधारे अर्थव्यवस्थेच्या आरोग्याची कल्पना येते. 2019-20 हे मंदीचे वर्ष राहिल्याने सरकारला महसुलाचे म्हणजेच कररुपी प्राप्तीचे अपेक्षित उद्दिष्ट गाठता आले नाही. त्याची परिणती वित्तीय तूट वाढण्यात झाली. या मिळकतीचे प्रमाण 3.3 टक्के राखण्याचे उद्दिष्ट गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात ठेवण्यात

आले होते. परंतु वर्ष संपताना वित्तीय म्हणजेच राजकोषीय तूट 3.8 टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. म्हणजेच त्यामध्ये अर्ध्या टक्क्याने वाढ नोंदली गेली आहे. एकंदरीत मंदीची स्थिती लक्षात घेऊन येत्या वर्षासाठी वित्तीय तूट 3.5 टक्के राखण्याचे उद्दिष्ट अर्थसंकल्पात ठेवण्यात आले आहे. सरकारने काही वर्षांपूर्वी 'एफआरबीएम'(फिस्कल रिस्पॉन्सिबिलिटी अँड बजेट मॅनेजमेंट ॲक्ट) कायदा संमत केला होता. त्यामध्ये वित्तीय किंवा राजकोषीय तूट ही टप्प्याटप्प्याने कमी करणे आणि तिचे प्रमाण जागतिक मापदंडांप्रमाणे राखण्याचे उद्दिष्ट समाविष्ट करण्यात आले होते. त्यानुसार या कायद्याचे पालन करण्याचा प्रयत्न प्रत्येक अर्थमंत्र्याने केला होता. परंतु कधीकधी परिस्थिती अशी निर्माण होते की या कायद्यातील उद्दिष्टांबाबत तडजोडीची भूमिका घ्यावी लागते. वर्तमान आर्थिक स्थिती लक्षात घेता यावेळी देखील तडजोडीची पाळी आलेली आहे आणि सरकारने ती तडजोड केलेली आहे. या तडजोडीमागील एकमेव कारण म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेवर आलेले अभूतपूर्व संकट होय. भारतीय अर्थव्यवस्थेला मंदगतीचा सर्प-विळखा असा काही बसला आहे की तो सैलावून अर्थव्यवस्थेला मोकळे करण्यासाठी सरकारला वित्तीय तुटीच्या उद्दिष्टाशी तडजोड करावी लागली आहे.

बाजारपेठेला चालना मिळण्यासाठी ग्राहकाच्या हातात पैसे खुळखुळावे लागतात. तो पैसा त्याच्या हातात असेल तर तो खर्च करण्यासाठी तो पुढे येऊन बाजारात मागणी व खप वाढेल. त्यातून उत्पादनाला चालना मिळेल व त्यातून उद्योगाच्या चाकांनाही गति मिळेल. त्यामुळेच सरकारने प्राप्तीकराच्या सहा श्रेण्या करुन प्राप्तीकराचे दर कमी केलेले आहेत. यामुळे प्राथमिक श्रेणीतील करदात्यांच्या प्राप्तीकर दरात निम्म्याने घट झालेली आहे. आतापर्यंत त्यांना वीस टक्के कर द्यावा लागत असे. आता त्यांना निम्मा म्हणजेच दहा टक्केच कर द्यावा लागणार आहे. यातून वाचणारा त्यांचा पैसा ते विविध गोष्टींवर खर्च करु शकतील आणि अर्थव्यवस्थेला प्रवाही करण्यातील त्यांची भूमिका अदा करतील. बाजारात जेवढ्या जास्त प्रमाणात पैसा खेळू लागेल त्या प्रमाणात चलनवाढ होईलही. परंतु अर्थव्यवस्थेची सध्याची स्थिती पाहता तो धोका पत्करावा लागणार आहे. तो धोका सरकारने अंशतः पत्करला आहे.

याच पार्श्वभूमीवर सरकारने आपल्या मिळकतीत वाढ करण्याचे काही नवे मार्ग शोधले आहेत. आगामी वर्षातही कररुपी महसुल किंवा मिळकतीत फार मोठी वाढ होण्याची शक्यता नसल्यानेच सरकारने राजकोषीय तुटीसाठी 3.5 टक्क्यांचे ठेवलेले उद्दिष्ट हीच बाब स्पष्ट करते. जर करसंकलनातून मिळकत होत नसेल तर सरकारला खर्चासाठी अन्य मार्गाने पैसा उभारणे अनिवार्यच आहे. त्यासाठी सरकारने आता एलआयसी(आयुर्विमा महामंडळ) आणि आयडीबीआय बँक या दोन वित्तीय संस्थांमधील आपल्या वाट्याची निर्गुतवणूक करण्याची घोषणा केली आहे. या व अन्य सरकारी







उद्योगांच्या निर्गुतवणुकीद्वारे सरकार 2.1 लाख कोटि रुपयांची प्राप्ती करु इच्छित आहे. हे उद्दिष्ट म्हणजे शिवधनुष्य आहे.

2019-20 या चालू किंवा मावळत्या आर्थिक वर्षात निर्गुतवणुकीद्वारे 1.05 लाख कोटि रुपयांच्या मिळकतीचे








उद्दिष्ट राखण्यात आले होते परंतु आता वर्ष संपताना केवळ 65 हजार कोटि रुपयांचीच प्राप्ती झाल्याचा दावा सरकारने केला आहे. परंतु एअर इंडिया किंवा इतर मोडकळीला आलेल्या सरकारी उद्योगांची विकाविकी करुन पैसे मिळविणे अशक्य होताना आढळल्यानंतर आता सरकारने चांगल्या फायद्यातील सरकारी वित्तसंस्थांकडे आपली नजर वळवली आहे. सरकारने बँकांच्या एकत्रीकरणाची जी मोहिम राबवली आणि महाकाय बँकांची निर्मिती केली त्यामागे या महाकाय बँकांमध्ये वेळप्रसंगी निर्गुंतवणूक करण्यास वाव मिळावा हा हेतु असल्याचे बोलले जाते आणि त्याची चुणूक या अर्थसंकल्पात पाहण्यास मिळते. जर वित्तीय संस्थांचा कारभार खासगी लोकांच्या हाती गेला तर अर्थव्यवस्थेत कोणता गोंधळ होऊ शकतो हे सांगण्यासाठी भविष्यवेत्याची गरज नाही. त्यामुळेच एलआयसी किंवा आयडीबीआय बँकेतील निर्गुंतवणूकीची बाब संवेदनशील झालेली आहे आणि तिला विरोध होणार आहे. बँक कर्मचारी युनियनतर्फे जारी करण्यात आलेल्या निवेदनानुसार ज्या बँकांनी बड्या उद्योगांना कर्जे दिली आणि ज्या उद्योगांनी त्यांची परतफेड केली नाही त्यांच्याच हातात बँका देण्याचा हा डाव म्हणजे निर्गुंतवणूक असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. मनमोहनसिंग ज्यांनी या देशात आर्थिक उदारीकरणाची व सुधारणांची सुरुवात केली व त्यानंतर विविध अर्थमंत्र्यांनी ती धोरणे पुढे नेली त्यातील कुणीही बँकांच्या निर्गुंतवणुकीचा पुरस्कार केला नव्हता हे येथे नमूद करावे लागेल.

या मुद्यातूनच या अर्थसंकल्पात खासगीकरणावर देण्यात आलेल्या विशेष भराकडेही लक्ष वेधावे लागेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या कारकिर्दीची सुरुवात करतानाच ‘गव्हर्नमेंट हॅज नो बिझनेस टु बी इन बिझनेस’ असे वक्तव्य झोडले होते. थोडक्यात सांगायचे झाल्यास सरकारने उद्योग चालविलेच नाही पाहिजेत अशी त्यांची भूमिका आहे. त्यामुळेच त्यांच्या सरकारने खासगीकरणाचा सपाटा लावला आहे. एअर इंडियाच्या खासगीकरणाचा निर्णय त्यांनी केला असला तरी अद्याप त्या अवाढव्य विमानकंपनीला गिऱ्हाईक मिळत नाही अशी स्थिती आहे. परंतु एअर इंडिया विकणे किती अयोग्य असेल याचे उदाहरण नुकतेच घडले आहे. चीनमध्ये करोनाव्हायरस या अति संसर्गजन्य आणि जीवघेण्या आजाराने धुमाकूळ घातला आहे. ज्या वुहान शहरात याचा प्रादुर्भाव झाला तेथील तीनशे भारतीयांच्या सुटकेसाठी सरकारने एअर इंडियाला आदेश देऊन दोन विमाने पाठवली व त्या लोकांची सुटका केली. एअर इंडियाने ती कामगिरी यशस्वीरीत्या पार पाडली. एअर इंडियाचे कर्मचारी त्यांना संसर्ग होऊ नये यासाठी विमानातून उतरले नाहीत आणि हवाई सुंदऱ्यांनी संपूर्ण

शरीर झाकणारे संरक्षण पोशाख घालून त्या लोकांची सेवा केली. हे का होऊ शकले? कारण एअर इंडिया अजुनही सरकारी आहे आणि सरकार हक्काने त्यांना आदेश देऊ शकते. आखाती देशात काही वर्षांपूर्वी युध्द पेटल्यावरही एअर इंडियाने हजारो भारतीयांची सुटका करण्याची अत्यंत मोठी जबाबदारी पार पाडलेली आहे. अशा एअर इंडियाचे










खासगीकरण झाल्यास आणि अशाच काही प्रसंग पुन्हा उद्‌भवल्यास सरकार काय करील? खासगी कंपन्या एकतर हा धोका पत्करणार नाहीत आणि पत्करल्यास त्याचे पैसे वसूल करतील. बहुधा यामुळेच भाजपचे खासदार सुब्रह्मण्यन स्वामी यांनी या खासगीकरणाला विरोध करताना कोर्टात जाण्याचा इशारा दिलेला आहे. एअर इंडियाचे सोडा सरकारने रेल्वेचे खासगीकरणही चालू केले आहे. रेल्वेचे खासगीकरण हा सामान्य माणसाला झटका आहे. आजही भारतातला सामान्य माणूस परवडणाऱ्या तिकिटातला प्रवास म्हणून रेल्वेला पसंत करतो. परंतु खासगीकरण करुन रेल्वेप्रवास महाग करुन टाकण्याचा खेळ हे सरकार करीत आहे. तेजस नावाची गाडी हे सरकार चालवणार आहे. सध्या दिल्ली – लखनौ तेजस गाडी चालवली जातच आहे. आता अर्थसंकल्पातील घोषणेनुसार आणखी 150 तेजस



प्रकारच्या गाड्या चालविण्याचा सरकारने निर्णय केला आहे. त्याचप्रमाणे रेल्वेत 'पब्लिक – प्रायव्हेट पार्टनरशिप' – 'पीपीपी' पध्दत लागू करण्याची घोषणाही सरकारने केली आहे. 'पीपीपी' पध्दत म्हणजे दुसरेतिसरे काही नसून मागील दाराने किंवा छुप्या पध्दतीने केले जाणारे खासगीकरण असते. त्यामुळे आतापर्यंत गरीब भारतीयांच्या प्रवासाचे मुख्य साधन म्हणून ओळखली जाणारी रेल्वेगाडी लवकरच त्यांच्या आवाक्यापलीकडे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत जनतेने पंतप्रधानांना मनापासून धन्यवाद द्यावेत! ब्रिटनमध्ये तीस वर्षांपूर्वी रेल्वे खासगीकरणाचा प्रयोग करण्यात आला होता. पण तो काही काळातच अयशस्वी ठरला आणि चक्क गुंडाळावा लागला. भारतात काय होईल हे आताच सांगता येणार नाही. परंतु रेल्वे असो किंवा अन्य कोणता विभाग असो, तो चालविणे अवघड झाले की त्याचे खासगीकरण करुन टाकायचे असा सपाटा या सरकारने लावला आहे. रेल्वेच्या कारभारात एक संज्ञा नेहमी वापरली जाते कारण त्यावरुन रेल्वेची वस्तुस्थिती काय आहे व रेल्वे कितीप्रमाणात व्यवस्थित आहे हे कळते. ही संज्ञा आहे 'ऑपरेटिंग रेशो' आहे. 'ऑपरेटिंग रेशो' म्हणजे काय? सामान्य भाषेत सांगायचे झाल्यास रेल्वेला शंभर रुपयांचे उत्पन्न प्राप्त करायचे झाल्यास त्यासाठी किती





खर्च करावा लागतो? त्यावरुन हा 'रेशो' ठरतो. सध्या हा 'रेशो' 97.6 टक्के आहे. याचा अर्थ रेल्वेला शंभर रुपये मिळाले असतील तर येणारा खर्च 97.6 रुपये इतका आहे. म्हणजेच ही स्थिती अत्यंत चिंताजनक किंवा वाईट आहे. रेशो जेवढा कमी तेवढी रेल्वेची मिळकत अधिक आणि त्यातून रेल्वेची प्रगती व विकास अधिक होऊ शकतो. परंतु या सरकारने रेल्वेची वाट लावण्याचे ठरविले आहे. वर्तमान रेल्वेत योग्य त्या सुधारणा करुन त्या अधिक प्रभावी व परिणामकारक करण्याऐवजी हे सरकार रोज नवनवीन गाड्यांची घोषणा करणे आणि विनाकारण लोकांना जागतिक दर्ज्याची रेल्वेसेवा पुरविण्याची स्वप्ने दाखवीत सुटले आहे. तेजस, गतिमान, बुलेट ट्रेन, गाड्यांमध्ये टीव्ही आणि अशा आणखीही नवनवीन लोकांना मूर्ख बनविणाऱ्या घोषणा हे सरकार करीत आहे आणि आहे ती रेल्वे व्यवस्था सुधारण्याकडे दुर्लक्ष करीत आहे. 'एक ना धड भाराभर चिंध्या' अशी या सरकारने रेल्वेची अवस्था करुन टाकली आहे.

सरकारने या अर्थसंकल्पात असंख्य स्वप्ने दाखवली आहेत. त्यामध्ये गेल्या काही वर्षात उद्योगपतींना छळण्याचा जो प्रकार सरकारने केला होता आणि त्यामुळे मोदी-सरकारने नवे 'इन्स्पेक्टर राज' देशात आणल्याची टीका सुरु झाली होती तिला उत्तर देण्याचा किंवा ती समजूत पुसण्याचा प्रयत्न सरकारने या अर्थसंकल्पाद्वारे केलेला आढळतो. उद्योगपति हे 'संपत्ती निर्माते'(वेल्थ क्रिएटर्स) आहेत ही बाब सरकार मान्य करते आणि त्यांना विनाकारण कर अधिकाऱ्यांचा जाच होणार नाही याबाबत सरकार खबरदार राहील असे आश्वासन









अर्थमंत्र्यांनी दिले असले तरी ते प्रत्यक्षात येईल काय याच्या उत्तरासाठी काही काळ थांबावे लागणार आहे.

या पार्श्वभूमीवरच अर्थव्यवस्थेसमोर सर्वात मोठे असलेले बेकारी कमी करण्याचे आव्हान आणि त्याबाबत सरकारने अर्थसंकल्पाद्वारे कोणता आणि किती दिलासा देण्याच प्रयत्न केला आहे याची दखल घ्यावी लागेल. सरकारने थेट रोजगार निर्मितीच्या दृष्टीने काही पावले उचलली आहेत असे आढळून येत नाही. सरकारने केवळ शिक्षण, कौशल्यविकासावर भर देणे, पर्यटनासारख्या क्षेत्राला काहीसे झुकते माप देणे किंवा आयात शुल्क –वाढीच्या माध्यमातून परदेशी मालावर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न आणि त्याचा परिणाम म्हणून भारतीय उद्योगांना उत्पादनवाढीसाठी प्रोत्साहन देणे, नव्या उद्योगांना संधी मिळणे असे उपाय केले आहेत. घरबांधणी क्षेत्राला आणखी वर्षासाठी करसवलत देऊनही त्या क्षेत्रात रोजगारनिर्मितीला वाव देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. कृषि क्षेत्रात सार्वजनिक गुंतवणूक करण्याने रोजगारास प्रोत्साहन मिळण्याची चर्चा नेहमी केली जाते. प्रत्यक्षात कृषि क्षेत्रासाठीच्या तरतुदीत गेल्यावर्षीच्या तुलनेत एक रुपयानेही वाढ न करता ती 1.5





लाख कोटि रुपयांवरच स्थिर राखण्यात आली आहे. फलोद्यान विकास, अन्न प्रक्रिया उद्योगांना काही प्रमाणात साह्य करण्याचे धोरण अर्थसंकल्पात आढळून येते. परंतु या सर्व प्रस्तावांचे स्वरुप अप्रत्यक्ष आहे. एक परिस्थिती गृहीत धरुन उद्दिष्ट प्राप्तीची अपेक्षा करण्यात आली आहे. त्यामुळेच या घोषणांच्या अंमलबजावणीत गडबड झाल्यास सर्व आर्थिक खेळ बिघडण्याचा धोका नाकारता येत नाही.

अर्थव्यवस्थेपुढील सर्वच संकटांना या अर्थसंकल्पाने उत्तरे दिली आहेत अशी स्थिती नाही. कच्च्या खनिज तेलाच्या आंतरराष्ट्रीय किंमत–वाढीची तलवार अद्याप लटकतच आहे. रोजगारासाठी ठोस उपाययोजनांचा अभाव कायम आहे. जागतिक अर्थव्यवस्था देखील अद्याप सावरलेली नाही आणि आणखी किमान वर्षभर त्यात सुधारणा अपेक्षित नसल्याचे भाकित आहे. त्यामुळे निर्यातीच्या क्षेत्रावरही मर्यादा आहेत. त्याचा परिणाम लघु व मध्यम उद्योगांवर पडत असल्याने रोजगाराचे हे क्षेत्रही अद्याप पिछाडीवरच आहे. या सर्व गुंतागुंतीच्या स्थितीवर तातडीने अल्पकालीन तोडगा काढण्यात सरकारला यश आलेले नाही. सरकारने केलेल्या घोषणा दूरगामी आहेत. पुढील पाच वर्षांच्या कालावधीच्या संदर्भातील आहेत. त्यामुळेच हा अर्थसंकल्प चाकोरीबध्द, घड्याळाचे काटे मागे फिरविणारा आणि साहसाचा अभाव असलेला निव्वळ कागदी असल्याचे स्पष्ट होते. म्हणूनच येणारे वर्षही कसोटीचेच राहणार आहे!

■■



# हिंदू

## व्होटबँक उभारणी हाच खरा अजेंडा

संकलन व शब्दांकन - डॉ. सुधीर भोंगळे

नागरिकत्व दुरुस्ती कायदा, राष्ट्रीय नागरिकत्व नोंदणी आणि राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी या विषयावरून देशभर सध्या जी अस्वस्थता व गोंधळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्या संबंधीची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रवक्त्यांना व्हावी म्हणून २१ जानेवारी २०२० रोजी मुंबईत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये एक चर्चासत्र झाले. त्यात झालेल्या चर्चेचा हा सारांश.





# देशात अघोषित आणिबाणी व मोदी-शहांची हुकुमशाही



**राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या पुढाकार व संकल्पनेतून २१ जानेवारी, २०२० रोजी मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रवक्त्यांसाठी एनआरसी, सीएए, एनपीआर आणि सीएबी या विषयांवर एक दिवसाचे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्रात न्यू साऊथ एशिया फोरमचे प्रमुख सुधेंद्र कुलकर्णी, पत्रकार संजय आवटे, खासदार सुप्रिया सुळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, राज्याचे मंत्री सर्वश्री दिलीप वळसे पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड, राजेश टोपे, आमदार विद्या चव्हाण, सुरेखा ठाकरे, महिला प्रदेशाध्यक्षा रूपाली चाकणकर, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे राज्यप्रमुख मेहबूब शेख, सक्षणा सलगर, आदिती नलावडे, रवी वर्पे, सूरज चव्हाण व अन्य मान्यवर सहभागी झाले होते. या चर्चासत्राचा संक्षिप्त सारांश येथे देत आहोत.**

आज भारताची लोकशाही आणि भारताची राज्यघटना धोक्यात आहे. देशात अघोषित आणिबाणी सुरु झालेली आहे. त्यामुळे देशाच्या आणि जनतेच्या स्वातंत्र्याला मोठी भिती निर्माण झाली आहे. १९७५ साली पंतप्रधान असताना श्रीमती इंदिरा गांधी यांनी देशावर आणिबाणी लादली होती. १९७५ ते १९७९ या काळात देशात आणिबाणी कशी आली, त्याचे लोकांवर काय परिणाम झाले, लोकांनी अत्याचार व त्रास कसा सहन केला आणि त्याला उत्तरही कसे दिले हे जनतेने व आपणही पाहिले आहे, अनुभवले आहे. पण आता नवीन प्रयोग चालू आहे. देशात आणिबाणी घोषित झालेली नाही. पण १९७५ मधील आणिबाणीच्या काळात ज्या गोष्टी चालू होत्या त्या करण्याचा प्रयत्न चालू आहे. म्हणजे एक प्रकारची अघोषित आणिबाणी आहे. प्रसार माध्यमे व पत्रकारांवर केंद्र सरकारने प्रचंड दबाव आणलेला आहे. माध्यमांचे मालक जाहिराती, पेड न्यूज, मोठमोठ्या रकमा व इतर आमिषे, धमक्या दाखवून खरेदी केले जात आहेत. सरकारची भलावण करुन आरत्या ओवाळणाऱ्या बातम्या व वृत्तांत दाखविणे त्यांना भाग पाडले जात आहे. नमोंचे सर्व कार्यक्रम सक्तीने प्रसारीत करावे लागत आहेत. सरकारच्या विरुद्ध लिहिणाऱ्या पत्रकारांना वा माध्यम प्रतिनिधींना मालकांवर दबाव आणून नोकरीतून काढण्यास वा इतर विभागात बदली करण्यास भाग पाडले जात आहे. सरकार विरोधी विचारधारा असलेल्या व्यक्तींना शहरी नक्षलवादी किंवा देशद्रोही ठरवून

चौकशी न करता थेट तुरूंगात धाडण्यात येत आहे. त्यांना जामीन मिळू दिला जात नाही. अनेक नेत्यांना स्थानबद्ध करण्यात आलेले आहे. गोहत्येच्या नावाखाली निरपराध व्यक्तींना जीव जाईपर्यंत मारले जात आहे. कुणी घरात शिजवून काय खावे, कसले कपडे परिधान करावेत यावर बंधने आणली जाताहेत. विचारवंत व लेखकांच्या लेखन व भाषण स्वातंत्र्यावर गदा आणून त्यांची निमंत्रणे रद्द केली जात आहेत वा त्यांच्या कार्यक्रमात घुसून धुडगूस घालून कार्यक्रम उधळले जात आहेत. अन्यथा दाभोलकर, पानसरे, कलबुर्गी, गौरी लंकेश यांच्यासारख्यांना गोळया घालून ठार मारले जात आहे. जंतरमंतरवर भारताची राज्यघटना जाळली जात आहे आणि हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांकडून म. गांधीजींच्या प्रतिमेला गोळ्या घालून नथुराम गोडसेच्या खुनी कृत्याचे समर्थन केले जात आहे. खासदार साध्वी प्रज्ञा नथुरामचे कौतुक करुन म. गांधींच्या हत्येबद्दल त्यांचे अभिनंदन करीत आहेत आणि भोपाळची जनता अशा नेत्यांना खासदार म्हणून निवडून देत आहे. किती अनागोंदी देशात माजली आहे.







जम्मू काश्मीरसह अनेक राज्यात संदेशवहन, इंटरनेट, मोबाईल, दूरध्वनी यंत्रणा या सर्वांवर बंदी घालून लोकांचा संवाद बंद करण्यात आला आहे. जनतेला तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करावा लागतो आहे. सरकारच्या दडपशाहीला जो कोणी मोर्चा काढून, आंदोलन करुन किंवा निदर्शने दाखवून विरोध करेल त्यांना पोलिसांमार्फत लाठीमार करुन, गोळ्या घालून, अश्रुधूर सोडून, पाण्याचे फवारे मारुन, बेदम चोपून तुरुंगात शिक्षा भोगण्यासाठी पाठविले जात आहे. १४४ कलम लागू करुन संचारबंदी जाहीर केली आहे जेणेकरुन पाचपेक्षा अधिक लोकांनी एकत्र येऊ नये आणि सरकारविरुद्ध कोणी काहीही कृत्ये करु नयेत असा प्रयत्न सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांचा आणि विशेषतः मोदी-शहा जोडगोळीचा चालू आहे. या जोडगोळीच्या स्पर्धेत आपण मागे राहू नये म्हणून जनतेवर अन्याय-अत्याचार करण्यासाठी उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह मोदी मंत्रीमंडळातील काही मंत्री व तऱ्हेवाईक राज्यांचे राज्यपाल हे त्वेषाने पुढे सरसावले आहेत.

इंदिरा गांधींच्या आणिबाणीत कुठेही सामाजिक विघटन झालेले नव्हते. जाती-धर्माच्या आधारावर समाजात फूट पाडण्यात आली नव्हती. धर्माधर्मात संघर्ष निर्माण करुन दंगली घडविल्या जात नव्हत्या. त्यावेळी राजकीय स्वातंत्र्य, सिव्हीललिबर्टी नाकारण्यात येऊन दडपशाही व एकाधिकारशाही करण्यात आली होती. पण आज



आणिबाणी घोषित वा जाहीर नसताना तसे वातावरण मोदी-शहांनी निर्माण केले आहे. सत्तेचे संपूर्ण केंद्रीकरण करण्यात येऊन  दोन माणसांच्याच हाती सर्व सत्ता एकवटण्यात आली आहे. मंत्रीमंडळ नामधारी आहे. मंत्र्यांना काडीचीही किंमत नाही आणि कवडीचाही अधिकार नाही. मोदी-शहांची तर इतकी दहशत आहे की भाजपचा एकही खासदार वा नेता त्यांना काहीही प्रश्न विचारु शकत नाही. भाजपातला सर्व संवाद बंद झाला आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नेत्यांना खुंटीला टांगून ठेवले आहे. सोयीसोयीची विचारसरणी स्वीकारण्यात येत आहे. संघाच्या ज्या वेगवेगळ्या संघटना व उपशाखा आहेत उदा. विश्वहिंदू परिषद, बजरंग दल, अभाविप, मजदूर संघ, जनकल्याण समिती, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी वगैरे. त्यांना सोयीने ताटातल्या चटणी लोणच्यासारखे तोंडी लावले जात आहे. सत्ता प्राप्त करुन ती टिकविण्यासाठी आज भाजपा व त्यांचे नेते किती खालच्या पातळीवर जाऊन कसे वागत आहेत हे जनता रोज उघड्या डोळ्यांनी पाहते आहे. त्यामुळेच ती मोदी-शहा जोडगोळीच्या कारभाराला दुसऱ्या टर्ममध्ये पहिल्या वर्षातच कंटाळली आहे.

भारतीय जनता पार्टी २०१४ पूर्वीही सत्तेवर आली होती. भाजपच्या अगोदर जनसंघ असो किंवा अटलबिहारी वाजपेयींच्या नेतृत्त्वाखालील भाजपा असो, ते राजकारण करताना कधीही इतक्या खालच्या पातळीला गेले नव्हते. मुसलमान व अल्पसंख्यांकांचा अनुनय करते म्हणून भाजप त्यावेळी 'काँग्रेस व्होटबँक की राजनिती कर रही है' असा आरोप करायची. आज भाजप हिंदू मतांचा आग्रह धरुन हिंदू धर्मिय व्होट बँकेचे लाड पुरवित आहे. २०१४ च्या निवडणुकीत हिंदू व्होट बँकेच्या आधारावर भाजपने सत्ता मिळविली. २०१९ च्या निवडणुकीत हिंदू विरुद्ध मुस्लिम असा खोटा लढा व संघर्ष पुलवामाच्या निमित्ताने उभा करुन ती ही निवडणूक जिंकली. 'सबका साथ, सबका विकास' अशी घोषणा देऊन लोकांना फसविले. अच्छे दिनाचे गाजर तर केव्हाच भाजप नेत्यांनी फेकून दिले होते. त्यामुळे आता सत्ता टिकवायची असेल तर धार्मिक आधारावर समाजात फूट पाडून हिंदू-मुस्लिमांमध्ये उभी दरी निर्माण करायची यासाठी भाजपाकडून सर्व प्रयत्न चालू आहेत.

अनेक दशकांपासून भारत हे हिंदू राष्ट्र म्हणून घोषित झाले पाहिजे ही हिंदू महासभेची आणि संघ परिवाराची तीव्र इच्छा आहे. ते त्यांचे अंतिम ध्येय आहे. भाजपच्या हातात सत्ता आल्यानंतर आणि केंद्रात एवढे प्रचंड


सत्यमेव जयते
CONSTITUTION OF INDIA
Preamble
WE THE PEOPLE OF INDIA, having solemnly resolved to constitute India into a Sovereign Socialist Secular Democratic Republic and to secure to all its citizens
JUSTICE
Social, economic and political;
LIBERTY
of thought, expression, belief, faith and worship
EQUALITY
of status and of opportunity; and to promote among them all
FRATERNITY
assuring the dignity of the individual and the unity and integrity of the Nation
IN OUR CONSTITUENT ASSEMBLY
this twenty-sixth day of November, 1949, do
HEREBY ADOPT, ENACT AND GIVE TO OURSELVES THIS CONSTITUTION

बहुमत मिळाल्यानंतर भारत देश हा हिंदू राष्ट्रात बदलण्याची हीच योग्य वेळ आहे असे हिंदुत्ववादी नेते व संघटनांना मनोमन वाटू लागले आहे. त्यामुळे सीएए, एनआरसी, एनपीआर याचे निमित्त करुन मुस्लिम अल्पसंख्यांकांच्या विरोधात राजकारण सुरु केले आहे. एनआरसीचेच दुसरे नाव एनपीआर हे असून ही अघोषित आणिबाणी आहे. यातून अल्पकालीन आणि दीर्घकालीन अशी दोन्ही प्रकारची ध्येये व उद्दिष्ट्ये भाजपाला साध्य करायची आहेत. यानंतरचे पुढचे पाऊल मग समान नागरी कायदा हे असणार आहे. हा भाजपाचा छुपा अजेंडा आहे. वाजपेयी आणि अडवानी हे या भूमिकेचा कधीही पुरस्कार करणारे नव्हते. म्हणून त्यांनी सत्ता हाती असतानाही असले उपद्व्यापी प्रकार करुन अल्पसंख्यांकांना भयभीत केले नाही व छळलेही नाही. म्हणून आता लोकांना मोदींचे सरकार नकोसे वाटू लागले आहे. हे सरकार इललिजिटेमेट नाही. जनतेनेच त्यांना निवडून दिले आहे. पण त्याचा गैरफायदा घेऊन भारताची राज्यघटना, लोकशाही, फ्रेमवर्क आणि तिचा ढाचाच बदलण्याचा प्रयत्न मोदी-शहांकडून सध्या चालू आहे. सरकारे येतात-जातात. पण राज्यघटना, संविधान हे कोणीही




बदलू शकत नाही. त्यात सुधारणा करु शकतात. आजपर्यंत त्यात शंभरपेक्षा जास्त वेळा दुरूस्त्या झाल्या आहेत. तथापि संविधानाच्या मूलभूत ढाच्याला कोणीही हात आजपर्यंत लावू शकलेले नाही. कॉन्स्टिट्युअंट असेंब्लीला बेसिक स्ट्रक्चर बदलता येते. पण त्यासाठी राज्यांचेही तेवढे पाठबळ लागते. घटनेतील प्रिॲम्बल आणि अन्य जी काही महत्त्वाची कलमे आहेत त्यांना आजपर्यंत कोणीही धक्का लावला नव्हता. आता ते संविधानच मोडून टाकण्याचा मोदी-शहांचा प्रयत्न आहे आणि हे जनतेच्या लक्षात आले आहे. म्हणून ती खवळून उठून जोरदार आंदोलने करते आहे.

'इंडिया इज अे सेक्युलर नेशन' हे प्रिॲम्बलमध्ये आहे. आणिबाणीच्या काळात हा शब्दप्रयोग झाला. 'समाजवाद' आणि 'धर्मनिरपेक्षता' हे शब्द इंदिराजींनी प्रिॲम्बलमध्ये घातले. आणिबाणीनंतर इंदिराजींचा पराभव होऊन जनता पत्राचे सरकार सत्तेवर आले. तेव्हांपासून डॉ. मनमोहन सिंह यांच्या सरकारपर्यंत म्हणजे १९७५ ते २०१४ या ३९ वर्षात कोणीही प्रिॲम्बलमधून 'सेक्युलर' हा शब्द काढून टाकावा असे म्हटले नाही. भारतीय संविधानाचा गाभा 'सेक्युलॅरिझम'



मध्येच आहे जो म. गांधी, पंडीत नेहरु आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मान्य केलेला होता. फंन्डामेंटल राईटस्‌मध्ये आजपर्यंत कोणीही बदल केले नाहीत. मात्र मोदी-शहांनी त्यातच बदल करण्याचा डाव टाकून प्रयत्न चालविले आहेत. स्वतः पंतप्रधान झाल्यापासून मोदी यांनी कधीही 'सेक्युलॅरिझम' हा शब्द उच्चारलेला नाही. त्यांना 'सेक्युलॅरिझम' हा शब्दच राज्यघटनेत नको आहे. या शब्दाचे जेवढे म्हणून विडंबन व मोडतोड करता येईल तेवढी करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्या दृष्टीने या शब्दावर ते निरनिराळ्या मार्गांनी हल्ले चढवित आहेत. आयडॅलॉजिकल ॲटॅक करण्याचा प्रयत्न करीत आहेत. राज्यसभेत जर भाजपाला बहुमत मिळाले तर राज्यघटनेतून ते 'सेक्युलॅरिझम' हा शब्द काढून टाकल्याशिवाय राहणार नाहीत. त्या दृष्टीने त्यांची तयारी चालू आहे.

जन्माने तुम्ही भारतीय असाल किंवा तुमचे वडील व आजोबा भारतीय असतील किंवा सलग १२ वर्षे तुम्ही भारतात राहिलेले असाल आणि भारतीय कायद्यांचा कधीही भंग केलेला नसेल तर भारताचे नागरिकत्व व्यक्तीला मिळू शकते हा सर्वसाधारण नियम आहे. मात्र गृहमंत्री अमित शहा यांनी पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तान या तीन देशातील मुस्लिम धर्मिय सोडून अन्य धर्मियांचा तिथे छळ होत असेल तर त्यांना भारताचे नागरिकत्व देण्याची तयारी दर्शविली आहे. मात्र मुस्लिम धर्मिय तिथे संख्येने अधिक असल्याने व त्यांचा छळ होत नसल्याने तेथून आलेल्या व्यक्ती वा घुसखोरांना नागरिकत्व दिले जाणार नाही असे स्पष्टपणे सांगितले आहे. थोडक्यात धर्माच्या




आधारावर माणसांमध्ये विभागणी करुन मुस्लिम धर्माच्या लोकांना भारतातून हाकलून काढायचा डाव मोदी-शहा यांनी आखला आहे व तो कृतीत उतरविण्यासाठी नागरिकत्व कायद्यात अनेक दुरुस्त्या करण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. भारतीय राज्यघटनेच्या कलम १४ आणि १५ चा त्यामुळे भंग होत असून धर्माच्या आधारे अशी विभागणी करता येणार नाही असे कायदातज्ज्ञ सांगू लागले आहेत. अर्थात हे सर्व प्रश्न सर्वोच्च न्यायालयासमोर येणारच आहेत. परंतु या प्रश्नांबाबतचा अभ्यास निदान सुबुद्ध नागरिकांचा तरी असला पाहिजे. कलम १४ आणि १५ चा भंग करुन नागरिकता देण्याचा नवीन प्रकार शहा यांनी करुन मोठी चालाखी केली आहे. अमित शहांचे लोकसभा व राज्यसभेतील भाषणे आपण नीटपणे अभ्यासली तर त्यांची चलाखी, अंतर्गत डाव व अंतःस्थ हेतू लक्षात आल्याशिवाय राहणार नाही. शेजारची



पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तान ही तीनच राज्ये का घेतली? शेजारची श्रीलंका आणि ब्रह्मदेश (म्यानमार) ही राष्ट्रे का सोडून दिली? अफगाणिस्तान आणि आपली भारताची सीमा यात १०६ किलोमिटरचे अंतर आहे. व्यवहारताः तो देश आपल्या सीमेवर आहे. पाकिस्तानची बॉर्डर आपल्या कंट्रोलमध्ये नाही. म्यानमारची बॉर्डर आपल्यापासून १६०० किलोमीटरवर आहे. म्यानमारमध्ये रोहिंग्या पिडीत आहेत. कारण ते मुस्लिम असल्यामुळे बौद्धांना नको आहेत. भूतान आपल्याला लागूनच आहे. तिथे ख्रिश्चनांना बौद्धांचा त्रास आहे. श्रीलंकेत तमिळींना त्रास आहे. पण नेपाळ, भूतान, म्यानमार, श्रीलंका हे देश शेजारी असून नागरिकत्वाच्या प्रश्नावर विचार करताना जाणीवपूर्वक वगळले आहेत. या पार्श्वभूमीवर अमित शहा यांची समर्थनाची तर्कहीनता किती तकलादू व वरवरची आहे हे समजून घेतले पाहिजे.

चीनचा शिनजियान नावाचा प्रांत आहे. तिथे मुस्लिम लोकसंख्या जवळपास ७ ते ८ कोटी आहे. मुस्लिम बहुसंख्य असा हा भाग आहे. या भागातील मुस्लिमांना चीन सरकारने दडपून टाकले आहे. त्यांचा छळ चालविला आहे. चीनमधील बौद्धांना हे मुस्लिम तिथे नको आहेत म्हणून त्यांची गळचेपी चालविलेली आहे. त्यांच्या मुलभूत अधिकारांवरच गदा आणण्यात आली आहे. त्यामुळे तिथले मुस्लिम पेटून आंदोलन करताहेत. सरकार त्यांना दाबण्याचा प्रयत्न करते आहे. यासंबंधी अमेरिकेतील वॉशिंग्टन पोस्ट, न्यूयॉर्क टाईम्स यांसारख्या वृत्तपत्रांमध्ये रोज मोठमोठ्या बातम्या व लेख छापून येत असून जागतिक बँकेने या प्रकारची चौकशी करण्यासाठी संचालक दर्जाचा एक वरिष्ठ दर्जाचा अधिकारी नेमला आहे. तो मूळचा भारतीय असून पूर्वीचा महाराष्ट्र केडरचा आय.ए.एस. अधिकारी आहे. या मुस्लिमांसाठी चीन सरकारने तिथे डिटेंन्शन कॅम्पही काढला आहे. चिनी लोकांना मुस्लिम तिथे नको आहेत. थोडक्यात, मोदी-शहांना म्यानमारमधून रोहिंग्या नकोत. पिडीत मुस्लिम धार्मिकरीत्या तेही नकोत. पाकिस्तानात अहमदीया मुसलमान आहेत. त्यांचाही तिथे छळ होतो आहे. सीएएखाली ते भारतात येऊ इच्छितात. पण त्यांना घ्यायला शहा तयार नाहीत. तेव्हा मोदी-शहा यांचा डाव ओळखा.



सलमान तसीर ही पाकिस्तानच्या राजकारणातली एक प्रमुख व्यक्ती होती. ते पंजाबचे गव्हर्नर होते. आपल्याकडे गव्हर्नर हा रबरी शिक्का आहे. त्याला फारसे अधिकार नाहीत. पण पाकिस्तानमध्ये गव्हर्नरला फार अधिकार असून ती अत्यंत महत्त्वाची पोस्ट मानली जाते. हे सलमान तसीर गृहस्थ वृत्तीने अगदी सेक्युलर होते. महंमद पैगंबराचा कुणी अपमान केला तर त्याला मृत्यूदंड देण्याची शिक्षा पाकिस्तानात आहे. आसिया बीबी नावाच्या एका महिलेला या चुकीच्या कायद्याची शिक्षा काहीही




गुन्हा नसताना भोगावी लागली. निर्दोष व्यक्तींनाही या कायद्याचा खूप त्रास झाला. म्हणून सलमान तसीर यांनी या कायद्याविरुद्ध चळवळ सुरु केली. कडव्या धार्मिक मुस्लिमांनी तसीर यांना ॲन्टी मुस्लिम म्हणून जाहीर केले आणि २०११ साली तसीर राज्यपाल असताना त्यांच्याच बॉडीगार्डने त्यांचा खून केला. जर सलमान तसीर यांनी माझा पाकिस्तानात छळ होतो आहे म्हणून मला भारतात यायचे आहे असे म्हटले असते तर त्यांना भारताचे नागरिकत्व मिळाले असते ?

२०१७ साली भारतातले काही महत्त्वाचे नेते पाकिस्तानात गेले होते. तेथील सहवान शहरामध्ये बाबा शहबाज लाल कलंदर नावाचे सुफी संत होते. केशरी रंगाचे कपडे घालून तिथे प्रार्थना व नृत्य करण्याची पद्धत आहे. त्याला धमाल म्हणतात. केशरी कपडे घालून नृत्य करणे हे तिथे इस्लाम विरोधी मानले जाते. ही धमाल प्रार्थना चालू असताना काही मुस्लिम लोक तिथे गेले आणि शंभर लोकांना मारुन टाकले. हे वृत्त जेव्हा प्रसिद्ध झाले तेव्हा त्या प्रथेला विरोध करण्यासाठी शीमा किरवाणी नावाच्या एका प्रसिद्ध कथ्थक नृत्यांगणेने दुसऱ्या दिवशी केशरी रंगाचे कपडे घालून जाहीर नृत्य केले. तिच्या विरुद्ध शिया लोकांनी फतवा काढला. असे कितीतरी प्रसंग सांगता येतील की ज्यामध्ये मुस्लिमांचाही तिथे छळ होतो आहे. नुकताच कर्तारपूरचा कॉरिडॉर जो बनविला गेला आणि शिखांचा गुरुद्वारा जो उत्तम बनला त्यामागे सध्याचे पाकिस्तानचे सेनाध्यक्ष जनरल बाजवा यांची प्रमुख भूमिका आहे. बाजवा हे अहमदीया आहेत म्हणून ते पाकिस्तानचे सेनाध्यक्ष राहू शकत नाहीत अशी कुजबूज व चर्चा पाकिस्तानात सध्या चालू



**आसिया बीबी यांच्या समवेत सलमान तसीर**



**बाबा शहबाज लाल कलंदर**

आहे. तेव्हा मुस्लिम राष्ट्रात मुसलमानांचा धार्मिक छळ होत नाही हे जे अमित शहा यांचे म्हणणे आहे ते खरे नाही. कोणती का कारणे पुढे करुन मोदी-शहा यांना मुस्लिम भारतात नको आहेत ही वस्तुस्थिती आहे आणि या दृष्टीने लोकसभा निवडणुकीच्या आधी नरेंद्र मोदी यांनी आसाममध्ये जे अत्यंत भावनिक भाषण केले आहे ते आपण बारकाईने लक्षात घेतले पाहिजे. त्यातून त्यांचा खरा हेतू व डाव काय आहे हे समजू शकते.

फक्त हिंदू आणि बौद्ध हीच भारतमातेची मुले आहेत का? मुसलमान नाहीत का? फाळणीच्या वेळेला मुसलमान देखील वेगळे झाले. काही मुस्लिम पाकिस्तानात गेले. काही भारतातच राहिले. मग जे भारतात राहिले ते मुस्लिम लोक भारतमातेची मुले नाहीत का? त्यातून सीएए निघाला आहे. आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटल्या तेव्हा त्यांनी पहिला प्रश्न विचारला, ''काय गरज होती नागरिकत्व कायद्यात दुरुस्ती करण्याची?'' अफगाणिस्तानातून पूर्वी ३०-४० हजार शीख भारतात आले. त्याना नागरिकत्व दिले ना!

नागरिकत्व देणे हे कव्हर आहे. खरा हेतू धार्मिक म्हणजे धर्माच्या आधारावर हिंदू-मुस्लिमांमध्ये फूट पाडणे हाच आहे. यामागील खरा मुख्य उद्देश आगामी काळात म्हणजे या वर्षात पश्चिम बंगालमध्ये विधानसभेच्या निवडणुका आहेत त्या भाजपला जिंकून ममता बॅनर्जी यांना मुख्यमंत्रीपदावरुन घालवायचे आहे. त्यासाठी प. बंगालवर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. प. बंगालमध्ये फाळणीच्या वेळी जे काय झाले त्याचा प्रभाव आजही तिथे आहे. त्या पार्श्वभूमीवर हिंदू मतांचे पोलरायझेशन




करायचे. मुस्लिम आणि हिंदू नागरिकांमध्ये दरी पाडायची आणि मुस्लिमांचा अनुनय करणाऱ्या ममता बॅनर्जींना हिंदू मतदारांपासून तोडायचे या पद्धतीने भाजप डाव टाकीत आहे. बांगला देशातून लाखो हिंदूंना आसामात आणून त्यांची व्होटबँक वाढवायची आहे. म्हणूनच अमित शहा म्हणाले हिंदूंसाठी कागदपत्रांची गरज नाही. फक्त त्यांनी मी हिंदू आहे असे सांगावे. हिंदूंची व्होट बँक आसामात भाजपाला तयार करायची आहे. त्यासाठी एनआरसी आणून १९ लाख निर्वासितांना हाकलून देशाबाहेर काढण्याची तयारी सरकारने सुरु केली. म्हणूनच आसामात आंदोलनाला प्रारंभ झाला. बाहेरुन हिंदू घुसविले तर प्रस्थापितांच्या राजकारणाला व स्थानाला धक्का लागण्याचा धोका आहे म्हणून आसामातले स्थानिक हिंदू लोकही नागरिकत्व कायद्याच्या दुरूस्तीला विरोध

हा फक्त मुसलमानांचा प्रश्न नाही. हा प्रश्न संविधानाचा आहे. तेव्हा यासाठी हिंदू समाजाचे आधी लोकप्रबोधन करणे गरजेचे आहे. अखंड भारताचे स्वप्न साकार करुन टिकवायचे असेल तर मोदी-शहा जोडगोळीचा आणि भाजपाचे कुटील कारस्थान सर्व जनतेने मिळून हाणून पाडले पाहिजे. वाजपेयी पंतप्रधान असताना असा प्रकार कधीही घडला नव्हता. डॉ. मनमोहन सिंह दहा वर्षे पंतप्रधान राहिले. पण त्यांनीही कधी धर्माच्या आधारावर नागरिकत्व द्या असे म्हटले नाही. भारताने सीएअे सुरु केल्यामुळे पाकिस्तानच्या जनतेलाही खूप त्रास होतो आहे. तिथल्या सर्व हिंदूंना पुन्हा भारतात घ्या असे म्हणण्यात काय शहाणपण आहे? यातून काहीही समाधान होवू शकत नाही. बांगलादेशही याबाबत आपल्याला रोज प्रश्न विचारतो आहे. शेख हसीना जेव्हा

म्हणून आंदोलनात उतरले आहेत. अगोदरच घुसखोरांमुळे आसामाची अस्मिता धोक्यात आलेली आहे. त्रिपुरा राज्य हे पूर्वी पूर्ण आदिवासी होतो. ब्रिटिश काळापासून तिथे बंगाली लोकांना आणले गेले व त्यांची संख्या वाढवित नेली. आज त्रिपुरामध्ये मूळचे फक्त २० टक्के आदिवासी उरले आहेत आणि ८० टक्के बाहेरचे आहेत. या आदिवासींना आता आपण अल्पसंख्यांक होवू अशी भिती वाटू लागली आहे. त्यामुळे ते फार प्रखरतेने आंदोलनात उतरले आहेत. पूर्वांचलातील सर्व राज्यांमध्ये हिंदूंची संख्या वाढवायची आणि तिथे कायमची पक्की व्होटबँक तयार करायची हा भाजपा आणि मोदी-शहा यांचा मुख्य हेतू आहे. त्यासाठी नागरिकत्व कायद्यात दुरुस्ती आणली आहे.

भारतातील सर्व हिंदू बांधवांना आपण हे समजून सांगितले पाहिजे की ब्रिटिशांसारखीच फोडा आणि झोडा ही निती जर भाजपाने वापरली तर भारतात शांतता राहणार नाही. देशाचा विकास होणार नाही. इतकेच नव्हे तर देशाच्या एकात्मतेला व अखंडपणाला पुन्हा तडा गेल्याशिवाय राहणार नाही. देशातील सर्व २०-२५ कोटी मुसलमानांना आपण बाहेर घालवू शकणार नाही. ते या देशातच काहीही केले तरी राहणार आहेत. रोज संघर्ष, हाणामारी व जाळपोळ करुन आपण देशाच्या मालमत्तेचे नुकसान करीत आहोत. याने देश आणखीन गरीब होऊन विकासात मागे जाणार आहे. तेव्हा सर्व सेक्युलर पक्षांनी या दुरुस्तीला विरोध करुन जनतेला सत्य समजावून सांगितले पाहिजे व देशाची फाळणी टाळली पाहिजे.

स्वतंत्र भारताच्या इतिहासात विद्यार्थी व युवक स्वतः होऊन इतक्या मोठ्या संख्येने सरकारच्या विरुद्ध आंदोलनात उतरण्याची ही पहिलीच वेळ आहे. देशाच्या सर्व भागातील तरुण नागरिकत्व कायद्याच्या दुरुस्तीला विरोध करीत आहेत असे चित्र आपण रोज पाहतो आहोत. तरुण युवकांची शक्ती ही फार प्रभावी आणि देशाच्या जडणघडणीला वळण देणारी असते. या तरुणांनीच पुढाकार घेऊन अनेक राज्यातून भाजपाला सत्तेबाहेर घालविले आहे. जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली भ्रष्टाचार विरोधी जे आंदोलन गुजरात आणि बिहारमध्ये झाले होते त्यातही मोठ्या संख्येने तरुण युवकच सहभागी झाले होते. पण त्यावेळचे आंदोलन हे देशव्यापी नव्हते. आज भाजपाच्या व विशेषतः मोदी-शहा यांच्याविरुद्ध जे देशभर वातावरण तयार झाले आहे त्या आंदोलनात सगळे नेतृत्वच तरुण युवकांच्या हाती आहे. हे युवकच पुढे देशाचे नेतृत्व करतात हे आसाम, बिहार व इतर ठिकाणीही पाहिले आहे. त्यामुळे ही युवकांची शक्ती कोणालाही दाबून टाकता येणार नाही. ती जितकी दाबण्याचा सरकार प्रयत्न करेल तितके मोठ्या संख्येने युवक, तरुण उफाळून येतील व संघर्ष तीव्र होत जाईल.

या आंदोलनाचे आणखीन एक वैशिष्ट्य म्हणजे हिंदू आणि मुस्लिम दोघेही एकत्र येऊन आंदोलन करताहेत. यापूर्वीही मुसलमानांचे प्रचंड मोर्चे निघाले. मोठमोठी आंदोलने झाली. त्यावेळी सर्व मुस्लिम हिरवे झेंडे घेऊन बाहेर पडायचे आणि इस्लाम खतरे में है अशा घोषणा द्यायचे. पण या वेळच्या आंदोलनात सर्व मुस्लिम लोक भारताचा राष्ट्रध्वज असलेला तिरंगी झेंडा घेऊन बाहेर पडले आहेत आणि देश खतरेमें है, देशाची अखंडता व एकात्मता धोक्यात आहे अशा घोषणा देताहेत. हा बदल फार सूचक व बरेच काही सांगून जाणारा आहे. मुसलमान माणूस पहिल्यांदा जयभीम म्हणतोय आणि दलित व मुस्लिम एकत्र होऊन सर्व शक्तिनीशी आंदोलनात उतरतो आहे.





**मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शरद पवार यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला, तेव्हा शेजारी उपमुख्यमंत्री अजित पवार, सौ. रश्मी ठाकरे व आदित्य ठाकरे.**

शहाबानो केसमध्ये राजीव गांधींची चूक झाली. त्याची फळे त्यांना भोगावी लागली. सर्व मुस्लिम समाज त्यावेळी कॉंग्रेसच्या विरोधी गेला आणि राजीव गांधींना सत्ता गमवावी लागली.

मुस्लिम समाजातही आता बराच बदल झालेला आहे. भारत हा आपला देश आहे ही राष्ट्रभावना त्यांच्यात वाढीला लागलेली आहे. कारण हा देश आपण सोडून जाऊ शकत नाही आणि बाहेरचे मुस्लिम देश आपल्याला निर्वासित म्हणून अत्यंत वाईट वागवतील व प्रथमतः त्यांच्या देशात घ्यायलाच तयार होणार नाहीत याची जाणीव त्यांनाही झालेली आहे. त्यामुळे भारताच्या विरोधी सुर मुस्लिम लोकही आता काढत नाहीत. या देशात जन्मलो, या देशातच मरणार या भावनेने मुस्लिम लोकही उभे राहू लागले आहेत. पूर्वीचा इतिहास पाहिला तर अनेक मुस्लिम नेत्यांनी भारताची फाळणी करुन पाकिस्तान निर्माण करायला विरोध केला होता. २३ ऑक्टोबर, १९४७ रोजी अब्दुल कलाम आझाद यांनी दिल्लीच्या जामा मशिदीमध्ये जे भाषण केले ते आज उपलब्ध आहे. आझाद भारताच्या फाळणीविरुद्ध लढले. त्यांनी फाळणीला विरोध केला. उत्तर भारतात अनेक मुस्लिम नेते पूर्वी पाकिस्तानचे समर्थक बनल्याचे आपण पाहिले होते. पण आज आपण काय चित्र पाहतो आहोत. जामा मशिदीत हजारो मुस्लिम जातात. सामुहिक जनगणमन हे राष्ट्रगीत म्हणतात. मुसलमान म्हणतात भारत ही आमची भूमी आहे. हिंदू-मुस्लिम ऐक्याचे व देशाच्या एकात्मतेचे असे चित्र पूर्वी कधीही बघायला मिळाले नव्हते. राज्यघटना हा आता प्रोटेस्टचा भाग झाला आहे. सामुहिकरित्या राज्यघटनेचे प्रिॲम्बल वाचले जात आहे. द पिपल ऑफ इंडिया फायटींग फॉर इंडियन कॉन्स्टिट्युअन्सी हे चित्र आपण पाहतो आहोत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना देशभरात आपल्या विरुद्ध वातावरण तयार झाले आहे हे कळले आहे. म्हणूनच डिसेंबर २०१९ मध्ये रामलिला मैदानावरील भाषणात ते धादांत खोटे बोलले आणि सभागृहात नागरिकत्वाच्या प्रश्नावर चर्चाच झाली नाही असे बेधडक खोटे विधान केले. पंतप्रधान मोदी खोटे बोलताहेत याचा अर्थच देश आणि राज्यघटना धोक्यात आहे हे जनतेलाही कळून चुकले आहे. त्यामुळे ती अतिशय सावध होऊन आता ताकही फुंकून पिऊ लागली आहे.

महाराष्ट्रात जो राजकीय बदल शरद पवार यांनी अत्यंत शिताफीने व कुशलरीत्या घडवून आणला त्यामुळे राष्ट्रीय राजकारणाला वेगळे वळण लागले आहे. मोदी-शहा यांना अंगावर घेऊन त्यांना धडा शिकविण्याचे जे काम शरद पवार यांनी केले त्यामुळे अन्य पक्षातील राजकीय नेत्यांनाही मोदी-शहांविरुद्ध लढण्याची प्रेरणा मिळाली आहे. झारखंडमध्ये झालेला सत्ताबदल हे त्याचेच निदर्शक आहे. झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी स्वतः आपण लढण्याची प्रेरणा शरद पवारांपासून घेतल्याचे सांगितले आहे. यामुळे देशातले वातावरण बदलून ते भाजपाविरोधी होत चालले आहे. शरद पवार यांचे यातले योगदान खूप मोठे आहे आणि ते वाढणार आहे. पवार साहेब हे देशातले एकमेव नेते असे आहेत ज्यांनी प्रखरपणे मोदी-शहा आणि भाजपाविरुद्ध उघडउघड संघर्ष करण्याची भूमिका घेतली आणि महाराष्ट्रात सत्तेवर येण्यापासून भाजपला रोखले. आता राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने व महाराष्ट्र सरकारने शरद पवार यांना महाराष्ट्रात अडकवून ठेवण्यापेक्षा त्यांना देशभर हिंडून भक्कम विरोधी आघाडी






उभी करण्यासाठी मोकळीक देण्याची गरज आहे.

समान नागरी कायदा हा आजचा खूप मोठा प्रश्न नाही. तो भाजपाच्या आयडॉलॉजीमधील अजेंडा जरुर आहे. राम मंदीर उभारणी, काश्मीरमधून ३७० कलम हटविणे या दोन्ही गोष्टी झाल्यानंतर भाजपाचा तिसरा अजेंडा समान नागरी कायदा हा आहे. तो आणण्याच्या दृष्टीने ते आज लगेच प्रयत्न करणार नाहीत. पण राज्यसभेतले बहुमत वाढल्यानंतर ते समान नागरी कायदा आणण्यास मागेपुढे राहणार नाहीत. भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघामध्ये जी चर्चा झालेली आहे त्यात हा विषय आहेच. वास्तविक संघाचे दुसरे संघचालक गोळवलकर गुरुजी हे समान नागरी कायद्याच्या विरोधात होते. 'बंच ऑफ थॉटस्' हे त्यांचे पुस्तक वाचल्यानंतर आपल्या ते लक्षात येईल. भारत हा खूप वैविध्यता असलेला विशाल देश आहे. त्यातले रितीरिवाज निरनिराळे आहेत. विविधता हा निसर्गाचा नियम आहे. जे मूळात निसर्गाने निर्माण केलेले आहे त्याला आपण विरोध करु नये अशी गुरूजींची भूमिका होती. राष्ट्रीय एकात्मता येण्यासाठी समान नागरी कायदा आवश्यक आहे असे संघवाले म्हणायचे आणि आजही म्हणतात देखील पण गुरूजींनी तसे कधीच म्हटले नाही. सुधारित नागरिकत्व कायदा, राष्ट्रीय नोंदणी व राष्ट्रीय लोकसंख्या सूची विरोधातील आंदोलनांमुळे जे नवीन दृश्य आपण बघतो आहोत त्यातून राष्ट्रीय एकात्मतेसाठी समान नागरी कायदा झाला पाहिजे हा आग्रह दुबळा झाल्याचे पाहायला मिळते. आज भाजप आणि मोदी-शहा जी भूमिका घेत आहेत ती स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची आहे.

संघ परिवार आणि काँग्रेस परिवार यात फरक काय आहे? असा जेव्हा विचार आपण करतो तेव्हा लक्षात येते संघाचे नेतृत्व सतत बदलत गेले. ते एकाच व्यक्ती किंवा कुटुंबाभोवती केंद्रित झाले नाही. काँग्रेस एका कुटुंबाभोवती केंद्रित राहिली. मुख्य म्हणजे १९५१ पासून संघ परिवारात कधीही फूट पडली नाही. काँग्रेस पक्ष कितीतरी वेळा फुटला आणि त्याची शकले शकले झाली. आज काँग्रेस परिवार कुठे आहे? अनेक राज्यातून काँग्रेस हद्दपार झाली आहे किंवा दुबळी, कमकुवत झाली आहे. तिचे नामोनिशान संपुष्टात आले आहे. अशा वेळी भाजपाच्या विरुद्ध प्रभावीपणे उभे राहण्यासाठी सर्व विरोधी पक्षांनी एकजूट करुन






एकदिलाने लढण्याची गरज आहे. या सर्व विरोधकांची मोट बांधण्याचे काम शरद पवार यांनी करावे अशी देशातल्या जनतेची अपेक्षा आहे. कारण देशातल्या सर्व पक्षाच्या नेत्यांशी त्यांचे चांगले संबंध आहेत आणि त्यांच्या शब्दाला देशात किंमत आहे.

भाजपाची आजची धोरणे उखडून टाकून त्यांना सत्तेवरुन खाली खेचायचे असेल तर लोकशिक्षणातून लोकप्रबोधन व जनमानस तयार करण्याचा कार्यक्रम हाती घेणे गरजेचे आहे. असे प्रबोधन कुठल्याही देशाला व समाजाला पुढे नेते हा आजपर्यंतचा इतिहास आहे. एनसीआर, एनपीआर यांची अंमलबजावणी राज्य सरकारांनीच करायची आहे. ती करण्यास काही राज्यांनी नकार दिलेलाच आहे. कारण अंमलबजावणी करणारी यंत्रणा केंद्र सरकारकडे नाही. यासाठी त्यांना राज्य सरकारवरच अवलंबून राहावे लागणार आहे. या कामी त्यांना राज्यांनी सहकार्य केले नाही तर मोदी-शहांचे अंतःस्थ हेतू वाळूतल्या पत्यांसारखे कोसळून पडणार आहेत. यासाठी विरोधी राज्यांनी मात्र प्रखर एकजूट दाखविणे गरजेचे आहे. आज मोदींना प्रश्न विचारणारा देशद्रोही ठरतो आहे. मोदी-शहांची पक्षात मोठी दहशत आहे. सगळे अधिकार आपल्या हाती केंद्रित करुन त्यांची वाटचाल हुकूमशाहीकडे चालू आहे. अजून मोदी सरकारचा कालावधी चार वर्षे शिल्लक आहे. पहिल्या वर्षीपासूनच मोदी सरकारला जनतेचा विरोध सुरु झाला आहे. हे आपण सारेजण पाहतो आहोत. एनआरसी, सीएए या प्रश्नांवरून सुरु झालेला विरोध आणखीन वाढण्याची शक्यता आहे. कारण बाकीचे प्रश्न उदा. आर्थिक मंदी, बेरोजगारी, नवीन रोजगार निर्माण न होणे, उद्योगांना टाळे लागणे, कामगार कपात, शेतीमालाला भाव न मिळणे, आधारभूत किंमती स्वामिनाथन आयोगाप्रमाणे न देणे वगैरे. अजून लोकांच्या आंदोलनाचे विषय बनलेले नाहीत. ते जेव्हा बनतील तेव्हा मोदी सरकारला सत्तेवर राहणे फार कठीण होईल. जनतेने मात्र आपल्या हितासाठी सदैव जागे राहणे गरजेचे आहे. आजच्या चर्चेचा एकच संदेश आहे - ''रात्र वैऱ्याची आहे. जागे राहा!''

■■

**बारामती येथील कृषी विकास प्रतिष्ठानने कृषि विज्ञान केंद्रामार्फत आणि महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाच्या सहकार्याने 'कृषक-२०२०' नावाचे पथदर्शी प्रकल्प उभे केलेले कृषी प्रदर्शन आणि शेती संशोधनासंबंधीचे चर्चासत्र १६ ते १९ जानेवारी २०२० या काळात बारामती येथे आयोजित करण्यात आले होते. राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, राज्याचे कृषीमंत्री दादा भुसे, पशुसंवर्धन व दुग्धविकासमंत्री सुनील केदार, पाणी फाऊंडेशनचे प्रमुख व अभिनेते आमीर खान, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार व प्रतिष्ठानचे अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या प्रदर्शन उद्घाटन सोहळ्याचा हा वृत्तांत.**





खरं म्हटलं तर या कार्यक्रमाची सुरूवात माझ्या भाषणाने होत असताना दोघांनी माझ्या हातात फुलांचा गुच्छ ठेवला. याचा अर्थ मला निवृत्त करायचं ठरवलेलं दिसतंय. काय हरकत नाही, अनेकांना वाटत होतं, मी निवृत्त होईन. पण तसं काय घडलं नाही आणि महाराष्ट्रातल्या जनतेनं विशेषत: तरूण पिढीनं हे काय घडवू दिलं नाही.

हा कृषकचा कार्यक्रम कृषि विकास प्रतिष्ठानच्या वतीनं आपण गेले काही वर्षे घेत आहोत आणि दरवेळेचा कार्यक्रम बघितल्याच्यानंतर मागच्या कार्यक्रमापेक्षा काहीतरी याठिकाणी सुधार आहेत, बदल आहेत, नाविन्यपूर्ण उपक्रम आहेत हे आपल्याला पाहायला मिळतं आणि त्याचं महत्त्वाचं कारण कृषि विकास प्रतिष्ठानचा जो या सगळ्या क्षेत्रात काम करणारा सेवक वर्ग आहे, त्याची बांधिलकी आणि त्याहीपेक्षा या सगळ्या कार्यक्रमाला आणि या सगळ्या लोकांना प्रोत्साहित करून नेतृत्व देण्याबद्दलची खबरदारी राजेंद्र पवार यांच्याकडून घेतली जाते आणि त्यामुळंच या कृषकमध्ये दरवेळेला आपल्याला काहीतरी नाविन्यपूर्ण पाहायला मिळतं.

जगाची शेती बदलली. अनेक दृष्टिनं वेगवेगळे प्रयोग होतायंत आणि त्यामुळं उत्पादकाचा भावही वाढल्याचं चित्र आपल्याला बघायला मिळतं. भारतासारख्या एवढ्या मोठ्या



# जेनेटिकली मॉडिफाईड पिकाचे तंत्रज्ञान भारताने स्वीकारणे गरजेचे

## शरद पवार यांचे विचार

देशामध्ये, प्रचंड लोकसंख्या असलेल्या या देशामध्ये माणसाच्या ज्या दैनंदिन गरजा आहेत, त्या भागवण्याच्यासाठी शेती हे क्षेत्र अत्यंत महत्त्वाचं काम करणारं क्षेत्र आहे आणि म्हणून तिथं बदल केले पाहिजेत. सुधारणा केल्या पाहिजेत. सातत्यानं संशोधन केलं पाहिजे आणि हे करणाऱ्या संशोधकांच्या कामाचं एकंदर चित्र हे प्रत्यक्षपणानं जमीन कसणाऱ्याच्या दारापर्यंत नेऊन पोचवलं पाहिजे. त्याची फार आवश्यकता आहे आणि हे काम आज याठिकाणी केलं जातं. बदल खूप होतायंत.

मघाशी डॉक्टर सी. डी. माई यांनी आपल्या भाषणामध्ये काही गोष्टी सांगितल्या. डॉक्टर माई हे भारताचे शेती विभागाचे आयुक्त होते. डॉ. माई हे या देशामध्ये शेतीच्या क्षेत्रामध्ये संशोधन करणारे जे संशोधक आहेत त्या संशोधकांची निवड करणाऱ्या समितीचे देशाचे अध्यक्ष होते आणि त्यांनी अनेक गोष्टी आपल्याला याठिकाणी नवीननवीन सांगितल्या. त्यांनी जीएम कॉपच्यासंबंधी सांगितलं. जीएम क्रॉपमुळं बदल झाल्याची गोष्ट खरी आहे. पण संशोधकांना सुद्धा आता मर्यादा आलेली आहे आणि त्याचं महत्त्वाचं कारण, देशाच्या सुप्रीम कोर्टनी या क्षेत्रात या पद्धतीनं काम करायला बंदी घातलेली आहे. खरं सांगायचं म्हणजे न्यायाधिशांचं हे काम आहे की नाही यावर मला भाष्य करता येणार नाही. त्यांनी अशा गोष्टींत लक्ष न घातलेलं बरं. पण कुठं संशोधन होत असेल, काही नवीन येत असेल, तर ते येऊनच द्यायचे नाही, हां ते अपायकारक असेल तर ते थांबवा. त्याला माझी हरकत नाही. पण ते उपयुक्त असेल तर ते थांबवण्याबद्दलची भूमिका काय योग्य नाही.

त्यांनी एका उसाच्याबद्दलचा उल्लेख केला आणि महाराष्ट्रामध्ये तसेच देशामध्ये ऊस घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या बद्दलची चर्चा नेहमी उलटसुलट होत असते. पाणी फार लागतं. पाणी फार घेतात. वेगवेगळ्या अनेक गोष्टींच्याबद्दल बोललं जातं. पण त्यांना पर्याय आहेत म्हणून आपण याठिकाणी ठिबकचं पाणी देतो. ठिबक सिंचन आता या भागामध्ये घराघरामध्ये पोहोचलंय आणि प्रवाहानं, पाटानं जे पाणी आपण एका एकराला देतो, तेवढ्या पाण्यामध्ये ठिबकनं तीन एकराचं क्षेत्र येऊ शकतं हे सिद्ध झालंय.

त्यामुळं पाण्यावर मर्यादा आणायच्यासंबंधीच्या सरकारच्या ज्या कल्पना आहेत त्या रास्त आहेत. त्या या ठिबकच्या पद्धतीनं आपण कृतीमध्ये आणू शकतो. पण त्यासाठी भांडवली गुंतवणूक करावी लागते, ती करण्याची सर्वसामान्य शेतकऱ्याची ताकद नसते. इथं सरकार पुढं आलं पाहिजे. सरकारनी या कामाच्यासाठी पैसा काढला पाहिजे आणि जो शेतकरी करत असेल त्याला अनुदान देऊन हे करण्याच्यासाठी प्रोत्साहित केलं पाहिजे. त्याची उपयुक्तता ही अधिक आहे.

डॉ. माई यांनी आणखी एक मुद्दा सांगितला तो इंडोनेशिया देशाचा. इंडोनेशियामध्ये नवीन वाण तयार केलंय त्याचा उल्लेख त्यांनी केला. तो नवीन वाण प्रामुख्यानं कमीत कमी पाण्यामध्ये उसाची वाढ कशी होईल याप्रकारचे संशोधन त्याठिकाणी केलं गेलं आहे. जावा आणि सुमात्रा बेटामध्ये आणि त्याचा उल्लेख त्यांनी याठिकाणी केला. खरं तर पाच एक वर्षापूर्वी ते माझ्या वाचनात आलं होतं आणि त्यावेळेला मी या देशातल्या काही जाणकारांना इंडोनेशियाला पाठवलं आणि ती संबंध पाहणी करायला सांगितली. हे इथंही करणं शक्य आहे. ती जात इथंही डेव्हलप करणं शक्य आहे. पण ती जीएमची होती आणि दरम्यान सुप्रीम कोर्टानं सांगितलं, की याच्यात काम करायचं नाही. संशोधन करायचं नाही. त्यामुळं आमचे सगळे प्रयोग थांबले. आमचे प्रयत्नही थांबले. इंडोनेशियामध्ये अशा प्रकारचा कुठला कायदा किंवा कोर्टाचा निर्णय नसल्यामुळं आज त्यांना हे काम करता येतं. पण इथं हे काम करायला मर्यादा आलेल्या आहेत.

आणि म्हणून सध्या कोर्टाचे निर्बंध लक्षामध्ये घेऊन लोकांचे शेतीच्या संदर्भातले उत्पादनवाढीचे प्रश्न सोडवण्याच्यासाठी जे जे काय चांगलं होत असेल, ते करत राहणं, त्याचं प्रत्यक्ष प्रदर्शन करणं. प्रदर्शन करणं याचा अर्थ स्टॉल्स नव्हे तर प्रत्यक्ष शिवारात त्या सगळ्या तंत्रज्ञानाचा वापर करून पीकावर काय परिणाम होतो







की सुधारणा येते हे दाखवण्याची खबरदारी घेणं आणि हेच सगळे कार्यक्रम आज याठिकाणी कृषि विकास प्रतिष्ठाननी गेल्या काही वर्षांपासून हातात घेतलेले आहेत. मला आनंद आहे, की नव्या पिढीतल्या शेतकऱ्यांचा त्याला फार पाठिंबा आहे. माझी खात्री आहे, की या चार दिवसांच्या कालावधीमध्ये कमीत कमी सात ते आठ लाख शेतकरी याठिकाणी येतील आणि याठिकाणी हे काय केलंय ते पाहतील.

आज या सहा-सात लाख शेतकऱ्यांच्या घरामध्ये हा आधुनिकतेचा आणि सुधारणेचा जो प्रयत्न आहे तो पोचवण्याबद्दलची काळजी कृषकच्यावतीनं घेतली जाते. याचा एकंदर उपयोग महाराष्ट्राच्या उत्पादनवाढीला हा निश्चितपणानं उपयुक्त ठरणारा आहे आणि मला आनंद आहे, या कामामध्ये अधिक राज्यांच्यावतीनं लक्ष केंद्रीत करण्याची आवश्यकता आहे. याचं गांभीर्य हे लक्षामध्ये घेऊन राज्याचे मुख्यमंत्री, राज्याचे शेतीमंत्री, राज्याचे दूध आणि त्यासंबंधीचे मंत्री आज याठिकाणी प्रकर्षाने आलेले आहेत त्या सगळ्यांचं याठिकाणी आपल्या सर्वांच्यावतीनं मी स्वागत करतो आणि जे काही त्यांनी याठिकाणी पाहिलेलं आहे ते उपयुक्त असेल, ते राज्याच्या अन्य भागामध्ये करण्याच्याबद्दलची काळजी घेण्याची राज्य सरकारची निती ही तयार करण्याच्याबद्दल आपण प्रयत्न करावेत. आम्हा सगळ्यांची साथ या कामाला राज्य सरकारला असेल, एवढंच याठिकाणी सांगतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

■■

# शेतकऱ्याला स्वत:च्या पायावर उभं केल्याशिवाय राहणार नाही

## मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे उद्गार



मला असं वाटतं, की गेल्या महिन्यामध्ये सहज बोलता बोलता पवार साहेबांनी मला नुसतं आमंत्रण नाही तर प्रेमानं आणि आग्रहानं आमंत्रण दिलं. मी विचार करत होतो, की असून असून काय वेगळं असणार आहे कृषि प्रदर्शनात. आजपर्यंत मी असं नाही, की मी कोणतं प्रदर्शन पाहिलेलं नाहीये. मुंबईमध्ये सुद्धा मध्ये मध्ये होतात. मोठे स्टॉल असतात. पॅव्हेलियन असतात. सगळा दिखावा खूप असतो. पण त्यातून नेमकं साधलं काय जातं हा एक प्रश्न असतो आणि थोडीशी माझी कल्पना, प्रामाणिकपणे बोलायचं झालं तर याही प्रदर्शनाच्या बाबतीत तशीच होती. पण इथं आल्यानंतर मला कळलं, की जर मी आलो नसतो तर एका मोठ्या अनुभवाला मी मुकलो असतो. कारण हे प्रदर्शन नुसतं प्रदर्शन नाहीये, तर मध्ये जी काही आपण सफर घडवली, त्यातून माझ्या लक्षात आलं, की प्रात्यक्षिकासह हे प्रदर्शन आहे. म्हणजे जिथल्या तिथे. नुसतं मोठं मोठं तत्वज्ञान सांगायचं. पुढे काय होईल ते माहिती नाही. तत्वज्ञान आहे. तसं नाहीये. ही गोष्ट अशी केली तर काय होतं याचं प्रात्यक्षिक दाखवणारं कदाचित जगातलं माहित नाही, पण देशातलं हे एकमेव प्रदर्शन असेल.

एक छोटी फिल्म आपण पाहिली आणि फिल्म पाहिल्यानंतर बोलण्यासाठी काय बाकी आहे असं मला वाटत नाही. अनेकदा असं म्हटलं जातं, की इवलेसे रोपटे लाविले दारी...वगैरे वगैरे काय असतं ना, त्याचा वेलू गेला...वगैरे. पण इकडे दिसतंय हे. आदरणीय पवार साहेबांनी त्या काळामध्ये जो विचार केला आणि त्याची मुहुर्तमेढ रोवली. खरंच अभिमान



फित सोडून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे 'कृषक' या शेती प्रदर्शनाचे उद्‌घाटन करताना, शेजारी शरद पवार, अजित पवार, दादा भुसे, विश्वजीत कदम व इतर



वाटावा असं काम त्यांनी ज्यांच्या ज्यांच्यावर जबाबदारी सोपवली त्यांनी करून दाखवलेलं आहे. मग राजेंद्रजी असतील, रणजितदादा असतील, अजितदादा आहेत. सगळं पवार कुटुंबीय. राजकारणामधले जे काही मतभेद होते, असतील ही मतभिन्नता हा भाग वेगळा आहे. पण जे काम चांगलं झालेलं आहे आणि समोर दिसतंय ते नाकारणे याला मी करंटेपणा म्हणीन.

आणि म्हणून मला आज खरंच अभिमान आहे, की जसं आपण नेहमी बोलत असतो, की जग बदलतंय, नवीननवीन तंत्रज्ञान येतंय, टेक्नॉलॉजी येतेय, अनेक ठिकाणी नवीन मशिन्स येतायंत. पण हे सर्व बघत आणि ऐकत असताना प्रश्न एक येतो, की बाबा हे सगळे जे काय चाललेले आहे, की नवीन टेक्नॉलॉजी येतेय, अमुक येतेय, तमुक येतेय, सगळं काय झाल्यानंतर सुद्धा अगदी दहा-दहा तास, बारा-बारा तास काम ज्याच्यासाठी आपण करतो, ते काम केल्यानंतर सुद्धा किंवा करत असताना पोटामध्ये जेव्हा कावळे ओरडायला लागतात, तेव्हा कळतं की हे सगळं आपण कशासाठी करतोय. दोन घास पोटात जाण्यासाठी आणि तिकडे मग काय आपण सगळा विकास करत असू, तर मग शेती, जी आपल्यासाठी दोन घास पिकवणारा शेतकरी आहे, राबराब राबतो. या जागेचं जे तुम्ही दाखवलं, की इकडे काय होतं, ती फिल्म बघत असताना पवार साहेब मला सांगत होते, की ही इथली जी जागा आहे, इकडे काय होतं, माळरान होतं. सगळी तडकलेली जमीन होती. पाण्याचा पत्ता नाही आणि त्या माळरानावरती हे सगळं नंदनवन उभं करून दाखवलं हे काय सोपं काम नाहीये.

शेती हा आपला पारंपरिक व्यवसाय म्हणा, हजारो वर्षांपासून शेती चालू आहे. आपला देश हा कृषिप्रधान देश मानतो आपण. आणि कृषिप्रधान देश म्हटल्यानंतर शेतीवर जर काय संकट आलं, शेतीसमोर आव्हान आलं तर हातपाय गाळून नाय चालणार. जर इतर व्यवस्थेमध्ये आणि क्षेत्रामध्ये नवीननवीन तंत्रज्ञान येत असेल, तर माझ्या शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञान आणि उपयोग करून घेण्याच्या गोष्टी जर येत असतील तर त्या का नाही स्वीकारायच्या. पूर्वीचा एक जमाना वेगळा होता. पूर्वीची लोकसंख्या आणि आत्ताची लोकसंख्या खूप फरक पडलेला आहे. पण त्या लोकसंख्येमुळे इतर सर्वच गोष्टींवर जो ताण येतोय, म्हणजे पाणी पुरत नाही. बरं महत्त्वाचा मुद्दा असा, की आपण चंद्रावरती जावू, मंगळावरती जावू, सगळीकडे जावू. पण पाणी



ही गोष्ट अशी आहे, की पाणी अजूनपर्यंत तरी आणि पुढे सुद्धा कधी बनवता येईल असं वाटत नाही. ना आपण पाणी बनवू शकत आणि जर का पाऊस कोसळायला लागला तर ना ते पाणी अडवू शकत. मग याचं नियोजन कसं करायचं? आणि याचं नियोजन केलं तर कमीत कमी पाण्यात, कमीत कमी जागेत जास्तीत जास्त पीक हे कसं येतं आणि ते येतानासुद्धा त्याला एक दर्जा पाहिजे. काहीतरी लावलं आणि उगवलं आणि गेलं मार्केटमध्ये. तसं नाही. दर्जेदार उत्पादन जर का आपण इतर वस्तूंमध्ये करत असू, तर माझ्या कृषिप्रधान देशामध्ये अन्नधान्याच्या बाबतीत का नाय करायचं. आणि नेमकं हेच काम आपण सगळेजण करता आहात.

जसं आमीर खानजी, तुम्ही सांगितलं, की मी तर इथे फक्त ऐकण्यासाठी आलो होतो. मी पण तसंच, बघायला आणि ऐकायला आलो होतो. आता मुख्यमंत्री म्हटल्यानंतर दोन शब्द, आपल्याला काय कळो न कळो बोलावे तर लागतात आणि मग बोलताना असं बोलायचं, की लोकांना वाटतं की मुख्यमंत्र्यांनी काय मार्गदर्शन केलंय. तसं काही नसतं. कळलेलं काही नसतं, पण असं बोलायचं, की आता हे नवीन तंत्रज्ञान आहे. तुम्ही म्हणणार, काय मुख्यमंत्र्यांचा अभ्यास आहे हो. पण हे तंत्रज्ञान खरंच आहे. बारीक बारीक गोष्टी, म्हणजे पहिली गोष्ट अशी आहे, की हेलिकॉप्टरमधून आल्यानंतर फुलांचे ताटवे बघितले. ते बघूनच पहिल्यांदी मन हरखून गेलं. आणि इथे मला लहानपण आठवलं, की मी लहान असताना गच्चीमध्ये स्वत: बाळासाहेब अगदी शेती नाही, पण छोटे छोटे वाफे करून तिकडे माँ आणि साहेब काहीतरी भेंडी, टोमॅटो, वांगी असं लावायचे. आता तुम्ही जे काय दाखवलंय, हल्ली नवीन एक पद्धत आलीय, व्हर्टिकल गार्डन आणि यांनी मला सांगितलं, व्हर्टिकल शेती. ती फुलं लावायच्याऐवजी जर रोजच्या उपयोगाच्या भाज्या लावल्या तर घरच्या घरी या भाज्या मिळू शकतात. व्हर्टिकल शेतीनंतर आता हवेतली शेती आलीय. म्हणजे मातीविना शेती. आता हवेतली शेती म्हणजे शेती तर हवी आहे, पण हवेमध्ये झाली तर आणखी हवी आहे. या सगळ्या शहरी भागातल्या गोष्टी झाल्या. शहरामध्येही आपण राहत्या जागेत करू शकू अशा गोष्टी इकडे दाखवतायंत.

ऑर्चिडची फुलं आहेत. ते ४० फूट उंच होणारे टोमॅटोचे वेल आहेत. हा सगळा चमत्कार आहे आणि हा चमत्कार करणारी महाराष्ट्राची ही भूमीच अशी आहे, की या मातीमध्ये चमत्कार जन्माला येतोच. मी इथं बसलो असताना दोन्ही दादा, म्हणजे अजितदादा आणि दादा भुसे. आपण सांगत होतात, की चंद्रपूरचा तो साधा शेतकरी, शेतकरी म्हटलं, की आपण म्हणतो हा काय अडाणी आहे, याला काय कळतंय, शाळेत नाय गेला, बुकं नाय वाचली. पण त्या अडाण्याचंसुद्धा ज्ञान अनेक विद्वानांना अक्षरश: तोंडात बोटं घालायला लावेल असं असतं. त्या चंद्रपूरचा एक

**साखर ज्यापासून तयार केली जाते त्या शुगर बीटची मुख्यमंत्री उद्धव ठाकरे पाहणी करताना, शेजारी अभिनेते आमीर खान, राहित पवार व इतर मान्यवर.**





महाराष्ट्राच्या भूगर्भ रचनेचे मॉडेल मुख्यमंत्री उद्धव ठाकरे पाहात असून शेजारी अजित पवार, विश्वजित कदम, नलावडे सर, सुनिल केदार आणि राजेंद्र पवार.

साधा शेतकरी प्रयोग करून करून त्याने तांदळाची एक अशी जात, वाण ही तयार केली आणि त्याला विचारलं, की हे केलंस तु, याला नाव काय द्यायचं? तर त्याने असा कायतरी हात केला, हातामध्ये घड्याळ होतं एचएमटीचं. त्याने त्या तांदळाला नाव दिलं एचएमटी. ठीक आहे, त्याने त्याला वेळेवरती सुचलं नाही म्हणून एचएमटी तर एचएमटी. घड्याळ होतं ना.

पवार साहेब, मघाशी मला सुप्रियांनी विचारलं, की का हो तुमचं घड्याळाचं दुकान आहे का? मी म्हटलं नाही, घड्याळवाले माझे पार्टनर आहेत. पण सगळं कसं ते वेळ जुळून यावी लागते. नाहीतर काय उपयोग नसतो. तर अशी सगळी चांगली वेळ जुळुन आलेली आहे, आणि ती जुळून एवढ्यासाठी आली आहे, की मी नुसतं हे हास्यविनोदासाठी नाहीये, तर मला असं वाटतं, की योग्य वेळेला महाराष्ट्राची सत्ता ही आपल्या हातामध्ये आलेली आहे. इथे ही जी काय सगळी प्रयोगशीलता आहे, एकतर मी ठरवलेलं आहे, की तुम्हाला कोणालाही न सांगता मी इथं परत येणार आहे. मग इथे ज्या काही गोष्टी नवीननवीन आलेल्या आहेत, मग ते ठिबक सिंचन असेल, शेततळी असतील, शेतीसाठी जे काय करणं गरजेचं आहे, ते हे सरकार केल्याशिवाय राहणार नाही, आणि हे करायचंच हे ठरवूनच मी करतोय. हे करायचंच आहे. नाहीतर नुसतं आपण बघतोय, दुष्काळ पडतोय, कधीतरी अवकाळी येतेय, गारपीट होते आणि आम्ही नुसतं काय करायचं, जायचं, पंचनामे करायचे, मग वेळेवरती नुकसान भरपाई दिली, नाही दिली, हे नाही चालणार. शेतकऱ्याला स्वत:च्या पायावर उभं केलंच पाहिजे, आणि ते करणं हे सरकारचं काम आहे, आणि सरकार म्हणून आम्ही त्याला प्राधान्य दिल्याशिवाय राहणार नाही, नव्हे ते देतो आहोत. हेसुद्धा आमचं एक ठरवलेलं काम आहे. या कामासाठी मला तमाम शेतकरी बांधवांचे आणि माता-भगिनींचे आशिर्वाद पाहिजेत.

हे काम सोपं नाहीये. हे दिसतंय सगळं तंत्रज्ञान, देणारी लोकं आहेत, शिकवणारी लोकं आहेत, पण जसं ते ठिबक सिंचनाचं पाणी तळागाळात मुळापर्यंत जातं आणि त्या पाण्यातून त्या झाडाला योग्य असं खत-पाणी आणि इतर औषधंसुद्धा दिली जातात, तसं हे काम आपल्याला सगळ्यांना मिळून केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर मी म्हणेन महाराष्ट्राच्या दिशेला बघून संपूर्ण देशातल्या मातीमध्ये हे झिरपवलंच पाहिजे, आणि माझा संपूर्ण महाराष्ट्र, माझा संपूर्ण देश सुजलाम् सुफलाम्, हे नुसतं बोलण्यापुरतं नाही तर ते करून दाखवण्याची हिम्मत जी आपल्यामध्ये आहे, ती हिम्मत दाखवण्याची गरज आहे आणि त्या हिमतीसाठी मला म्हणजे सगळ्यांनाच , त्यामध्ये अजितदादाही आले, आपल्याला, सरकारला सगळ्यांचे आशिर्वाद पाहिजेत, ते आशिर्वाद असू द्यावेत. जयहिंद! जय महाराष्ट्र!!

■■

**हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते आमिर खान यांनी बारामती येथील कृषि प्रदर्शनाला भेट दिली आणि माहिती घेतली. आमिर खान यांनी पाणी फौंडेशनच्या माध्यमातून महाराष्ट्रातील अनेक गावांमध्ये पाणी साठविण्यासंदर्भातील कामाला मोठी चालना दिली आहे. कृषि प्रदर्शनात त्यांची छोटेखानी मुलाखत घेण्यात आली. त्याचा गोषवारा....**



प्रश्न : बॉलिवूडमधील एवढ्या मोठ्या अभिनेत्याला पाण्याच्या बाबतीतच काम करावे असे का वाटले?

आमिर खान : सर्वांना नमस्कार! खरं तर आम्ही सत्यमेव जयते या नावाने एक टीव्ही शो केला होता. त्याचे तीन सीझन झाले होते. याठिकाणी माझे मित्र सत्यजित बसले आहेत. आम्ही एकत्रितपणे हा शो केला होता. कार्यक्रमाच्या तीन सीझननंतर आपण काय करायला पाहिजे यावर विचार केला. त्या टेलिव्हिजन शोमुळे मोठे मोठे बदल घडून आल्याचे आम्ही पाहिले. आपण केवळ एकाच विषयावर ठाम राहिलो आणि त्यावर काम करत राहिलो तर अधिक योगदान देता येईल का, असा विचार केला. या विचारातूनच आपण पाण्यापासून सुरूवात केली पाहिजे असे ठरवले. कारण, पाणी ही आपल्या सर्वांसाठी अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. त्यातच आम्ही दोघेही महाराष्ट्रात राहणारे असल्यामुळे आम्ही ठरविले, की महाराष्ट्रातूनच सुरूवात करू या. त्यामुळे आम्ही पाण्याची निवड केली.

प्रश्न : पाणी फौंडेशनने आतापर्यंत जलसंधारणावर मोठ्या





# पाण्याबरोबरच शेतीच्या व्यापक प्रश्नांवर काम करण्याचा प्रयत्न

## अभिनेते आमीर खान यांची मुलाखत

प्रमाणात काम केले आहे. आता या साठवलेल्या पाण्याचा शेती करण्यासाठी अतिशय कुशल पद्धतीने कसा वापरला केला जावा. यावर तुम्हाला काय वाटते?

आमिर खान : खरं तर गेल्या चार वर्षांपासून आम्ही जे काम करत आहोत, त्यातून आम्ही गावकऱ्यांना पाणी साठवणूक व्यवस्थापन शिकवत आहोत. एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, की हे सर्व काम आम्ही करत नाहीये. गाववाले करत आहेत. आम्ही त्यांना केवळ शिकवत आहोत. आम्ही एक माध्यम आहोत. या वर्षापासून आम्ही एक निर्णय घेतला आहे, की केवळ पाणी साठवणूक व्यवस्थापनच नाही, माती आरोग्य, गवताळ जमिन तयार करणे, वनांचे पुनरूज्जीवन तसेच पीक घेण्यायोग्य जमीन तयार करणे आणि पाणी व्यवस्थापन या आणखी पाच गोष्टी आम्ही शिकवणार आहोत. एकप्रकारे आम्ही खोलात जाण्याचा प्रयत्न करत आहोत. पाण्याबरोबरच आम्हाला शेतीचा व्यापक दृष्टिकोनही अंगिकारायचा आहे. आमच्या मनात सध्या याविषयीचेच विचार आहेत.





प्रश्न : तुम्ही सत्यमेव जयतेचे वेगवेगळे भाग केले. त्यामध्ये तुम्ही प्रामुख्याने ज्या मुलभूत समस्या आहेत, समाजाचे जे मुलभूत मुद्दे आहेत, ते तुम्ही समोर घेऊन आलात आणि त्याच्याबरोबरीने तुम्ही त्या मुद्यांवर तोडगाही काढून दाखवला. लोकांना कल्पना दिल्या. यातून तुम्ही अनेक गावकऱ्यांच्या संपर्कात आला. आता आम्ही या सर्व ग्रामीण मुद्यांना एकाचवेळी एकाच व्यासपीठावर घेऊन आणू इच्छित असू आणि त्यानंतर त्यावर एखादे धोरण निश्चित करू इच्छित असू, म्हणजे या हे सर्व ग्रामीण मुद्दे सर्व आणि त्यावरील उपाययोजना गावांतील लोकांपर्यंत कसे पोहोचविता येईल. तर यावर तुमचे मत काय असेल?

आमिर खान : हा तर खूप मोठा प्रश्न विचारला तुम्ही. याचे उत्तर पवार साहेबांकडे असेल. मला वाटतंय, की त्यांचा जो अनुभव आहे प्रत्येक क्षेत्रातील. निश्चितच खूप प्रश्न आहेत आपल्या सर्वांच्यासमोर, ग्रामीण लोकांसमोर आणि आम्हा सर्वांचा हाच प्रयत्न आहे, की एक-एक करत त्यांचा सामना केला पाहिजे आणि उपाययोजना शोधण्याचा प्रयत्न करत केला पाहिजे. आम्ही तेच करत आहोत.

प्रश्न : ज्या पद्धतीने पाणी ही माणसाची मुलभूत गरज आहे, तुम्ही त्यावर कामही केले. त्याचप्रमाणे शिक्षण, ज्यावर आम्ही येथे काम करत आहोत. कृषि आधारित शिक्षण हीसुद्धा आपली मुलभूत गरज मानली जाते. पाणी फौंडेशनच्या माध्यमातून तुम्ही आधीच जलक्रांती आणली आहे. आता अशाच पद्धतीने एक









रिफॉर्मड् एज्युकेशन मॉडल म्हणजे सुधारित शिक्षण मॉडलच्या बाबतीत बोलायचं झाल्यास तुम्ही त्याकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहता?

आमिर खान : हे पाहा, शिक्षण हे खूपच महत्त्वाचे आहे आणि आमच्या पाणी फौंडेशनमध्ये जो एक कार्यक्रम आहे, तो म्हणजे शालेय मुलांबरोबर आम्ही एक कार्यक्रम घेतो. त्यामध्ये आम्ही त्यांना निसर्गाविषयी, पर्यावरणाविषयी संवेदनशील बनवतो. तर हा आमचा कार्यक्रम त्यांच्याबरोबर सुरू आहे. शिक्षण तर खूपच महत्त्वाचे आहे. मला वाटतं, की या क्षेत्रात जेवढे करू, तेवढे कमी आहे. प्रत्येकावर शिक्षणाचा मोठा परिणाम होतो. आपल्या जीवनाचा हा एक महत्त्वाचा भाग आहे. त्यावर आपण पूर्ण लक्ष केंद्रीत केले पाहिजे. प्रत्यक्षात मी याठिकाणी बोलायला नाही, तर ऐकायला आलो होतो. कारण, याठिकाणी राजेंद्रजी, पवार साहेब, संपूर्ण कुटुंबाने चांगले काम केले आहे. प्रत्यक्षात ते पाहायला आलो होतो. गेल्या दोन-तीन वर्षांपासून ही गोष्ट माझ्या मनात होती, की मी याठिकाणी यावे आणि काहीतरी शिकावे. आत्ता मी जी काही छोटी भेट दिली, त्यावरून मला असं वाटतं, की संपूर्ण माहिती घेण्यासाठी तीन-चार दिवसांसाठी आले पाहिजे. कारण हा एवढा मोठा विषय आहे आणि तो समजण्यासाठी तीन-चार दिवस तरी लागतील. मला हा विषय पूर्णपणे समजून घेण्याची इच्छा आहे. धन्यवाद!

■■



# शेतकऱ्यांनी आधुनिक शेतीचे प्रयोग स्वत:च्या शेतावर राबवावेत

## राजेंद्र पवार यांचे विचार

ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट ही संस्था ग्रामीण भागातील कृषि, सामाजिक, शैक्षणिक आणि महिला सक्षमीकरणासाठी विविध उपक्रमांच्या माध्यमातून जवळजवळ पन्नास वर्षे काम करत आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील उत्कृष्ट तंत्रज्ञान बारामतीत यावे याकरिता ट्रस्टने अनेक परदेशी विद्यापीठे आणि कृषि संस्थांबरोबर सामंजस्य करार केले आहेत. यासाठी विद्यापीठांच्या कुलगुरूंची नेहमीच मदत होत असते. याचेच उदाहरण म्हणजे, नेदरलँडच्या सहकार्याने व राष्ट्रीय कृषि विकास संस्थेच्या सेंटर ऑफ एक्सटर्न ऑन डेअरी तसेच सेंटर ऑफ एक्सटर्न व्हेजिटेबल हे दोन्ही प्रकल्प शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरत आहेत.

ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट आणि कृषि विज्ञान केंद्र,



बारामतीमार्फत गेल्या चार वर्षांपासून भारतातील सर्वात मोठ्या शेती प्रात्यक्षिकांवर आधारित हे कृषि प्रदर्शन आयोजित केले जात आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना शेतीतील अद्ययावत तंत्रज्ञान आणि आधुनिक शेतीचा मंत्र यांची ओळख होण्यासाठी कृषि केंद्रातील नामांकित कंपन्यांची विविध नाविन्यपूर्ण उत्पादने, पीक प्रात्यक्षिकांवर प्रदर्शित करत आहोत. आपण कालची आणि आजची शेती पाहिली आहे. परंतु, भविष्यातील शेतीसाठी

आवश्यक असलेले तंत्रज्ञान या प्रदर्शनातून पाहायला मिळत आहे. शेतकऱ्यांनी दूरदृष्टिने शेती करण्यासाठी शेतीतील वास्तव जाणून घेण्यासाठी नव्या कृषि संस्कृतीचे आणि नव्या कृषि क्रांतीची उज्ज्वल दिशा शोधण्यासाठी नक्कीच हे कृषि प्रदर्शन पथदर्शी ठरत आहे. प्रदर्शनात देशातील विविध कंपन्यांची तसेच बहुराष्ट्रीय कंपन्यांची कृषि आधारित उत्पादनांची दालने उभी करण्यात आली आहेत. त्याद्वारे शेतकऱ्यांनी हे आधुनिक प्रयोग अवलंबून स्वत:च्या शेतीत सुधारणा करावी, ही अपेक्षा मी व्यक्त करतो.

भारतातील शेतकरी आपल्या शेतात जोखीम पत्करून प्रयोग करतो. तरीही नवीन काहीतरी करायचा प्रयत्न त्याला करावाच लागतो. परंतु, हे करताना नेहमीच यश मिळते असे नाही. त्यामुळे बऱ्याचदा त्याला नुकसानही सोसावे लागते. भारतातील कृषि धोरण तयार करताना सामान्य शेतकऱ्यांच्या काय अपेक्षा आहेत, याचा विचार फार कमी झालेला दिसतो. याउलट परदेशात अशाच प्रात्यक्षिकाधारित प्रदर्शनांचे आयोजन केले जाते. कृषि धोरणे शेतकऱ्यांना सोबत घेऊन, त्यांच्याशी सल्लामसलत करून ठरवली जातात. शिक्षणासाठी मी अमेरिकेत असताना तेथील कृषि अधिकारी शेतकऱ्यांच्या मिटिंग्ज घेत असत. त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी चर्चा करत. त्याच विचारातून आपल्याकडे याठिकाणी कृषि प्रदर्शन आयोजित करण्यास सुरूवात केलेली आहे.

आज या उद्‌घाटनाच्या निमित्ताने माननीय उद्धवजी ठाकरे यांच्या रूपाने धडाडीचे नेतृत्व, देशाच्या कृषि क्षेत्राची धुरा सांभाळणारे आदरणीय पवार साहेब, कृषिसंबंधी निर्णय घेणारे राज्यकर्ते, विविध विद्यापीठांचे कुलगुरू तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांमधील संशोधक, धोरणकर्ते हे सगळेच एकाच व्यासपीठावर आले आहेत. या सर्वांच्या ज्ञानाचा मिलाफ होऊन, विचारमंथन होऊन शेतकऱ्यांच्या हितासाठी परिणामकार आणि उपयुक्त निर्णय घेता येतील आणि दूरदृष्टिने शेती क्षेत्रात क्रांतीकारी बदल होऊ घालतील अशी अपेक्षा मी व्यक्त करतो. या कार्यक्रमासाठी उपस्थित सन्माननीय व्यासपीठ आणि आपणा सर्वांचे मी मन:पूर्वक आभार मानतो. यापुढेही संस्थेची यशस्वी वाटचाल अशीच कायम राहण्यासाठी आपले नेहमीच सहकार्य राहील, ही अपेक्षा बाळगतो. धन्यवाद!



■■



# इंडो-इस्त्रायल केंद्रातर्फे प्रत्येक खेड्यापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न

## इस्त्रायलचे कृषी सल्लागार डॅन अॅल्युग यांचे उद्‌गार

बारामती येथे होत असलेल्या या कार्यक्रमास सन्माननीय मुख्यमंत्री साहेब व अनेक मान्यवर उपस्थित आहेत, शरद पवार आहेत. शरद पवार हे तर भारताप्रमाणेच आमच्या इस्त्रायलमध्येही एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक आहेत. इस्त्रायलमध्ये आम्ही त्यांना नेता मानतो. त्यांनी इस्त्रायलसारख्या पार्टनरवर विश्वास ठेवल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

बारामती येथे जे काही घडत आहे, त्यामुळे मी खूप प्रभावित झालो आहे. या ठिकाणी छोटेसे सादरीकरण करण्यापूर्वी मी आपणास सांगू इच्छितो की, मी एक शेतकरी आहे. जेव्हा आम्ही इस्त्रायलहून एक काऊन्सलर म्हणून भारतात येत असतो तेव्हा आम्हाला परत जायचे आहे, हेही आमच्या चांगले लक्षात असते. शेतकऱ्यांना त्यांच्यापुढे असणाऱ्या आव्हानांबद्दल मार्गदर्शन करणे खूप उपयुक्त असते. हे एक प्रकारचे 'टीम वर्क'(सामूहिक काम) असते. शेतकरी व खाजगी क्षेत्रांसह ज्या घडामोडी थडत असतात, त्याची जबाबदारी सरकारवर असते. या ठिकाणी मी इस्त्रायलमधील चित्र दाखवत आहे, या ठिकाणी वर्षातील बाराही महिने पाऊस पडत नाही. तरीही तेथे नावीन्यपूर्ण पद्धतीने शेती करण्यात यशस्वी झालो. कारण, आम्ही ते आव्हान स्वीकारले व त्यासाठी पावले टाकण्यास सुरुवात केली. जेव्हा आपण पाण्याबद्दल बोलत असतो. आपण शेती कशी फायदेशीर करता येईल, याच्याबद्दल बोलत असतो. तेव्हा त्याची गुणवत्ता कशी वाढेल याबद्दल बोलतो व त्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना करता येतील याचाही विचार करतो. गुणवत्ता सुधारण्यासाठी सशक्त अशा पर्यावरणपूरक पद्धतीची आवश्यकता असते.

हा इस्त्रायलमधला कापूस आहे. आम्ही अतिशय कष्टाने त्याचे उत्पादन करीत असतो. जेव्हा आम्ही कोणतेही पीक घेत असतो तेव्हा त्यासाठी केलेली गुंतवणूक वजा जाऊन शेतकऱ्यांना फायदा कसा मिळेल, याचा प्रामुख्याने विचार करीत असतो. जेव्हा आपण इस्त्रायलकडे पाहतो, तेव्हा पुढील प्रमाणे नऊ भाग आपल्या डोळ्यांसमोर येतात. त्यात १) आम्ही तयार केलेल्या विविध प्रकारच्या जाती, २) पाण्याच्या व्यवस्थापनासाठी सिंचन, ३) रोपांचे संरक्षण, ४) शेतीतील मंदी, ५) हरितगृहे, ६) यंत्रसामुग्री, ७) पोस्ट हाऊसेस, ८) प्रदूषण आणि ९) साहस हे नऊ घटक आपल्याला आढळतात. या प्रत्येकामध्ये आम्ही उपाययोजना केलेली आहे. हंगामाच्या अखेरीस शेतकऱ्याला फायदा कसा होईल, हे आम्ही नेहमी पाहात असतो.

आम्ही भारतात काय करीत असतो, याबद्दल जेव्हा

बोलतो, तेव्हा आम्ही आपणास सांगू इच्छितो की, आम्ही 'इंडो-इस्रायल एक्स्लन्स सेंटर' सुरू केलेले आहे. तेथे आम्ही सरकारी पातळीवर काम करीत असतो. तसेच, इंडो-डच सेंटरही सुरू केलेले आहे. ते खूपच प्रभावशाली आहे. ही केंद्रे अद्यावत साधनांनी सुसज्ज असून तेथे शेतकऱ्यांसाठी विविध प्रकारची माहिती संकलीत केली जाते. ही केंद्रे कोणकोणत्या ठिकाणी आहेत, हे नमूद करताना आम्हाला आनंद होतो की, सध्या देशभरात २८ ठिकाणी ही केंद्र सुरू असून सर्व केंद्रे सक्रीय आहेत. कार्यरत आहेत. त्या पैकी चार महाराष्ट्रात आहेत. दापोली येथे आंब्याचे केंद्र आहे. नागपूर येथे संत्र्याचे केंद्र आहे. राहुरी येथे डाळिंबाचे केंद्र आणि औरंगाबाद येथे आंब्याचे केद्र कार्यरत आहे. इस्रायलबरोबरच्या भागिदारीत ही सर्व केंद्रे सक्रीय आहेत.

जेव्हा आम्ही इंडो-इस्रायल प्रकल्पाकडे पाहतो तेव्हा आमच्यादृष्टीने ही महत्त्वाची पिके आहेत. आम्ही या मौल्यवान अशा नगदी पिकांवर अधिक लक्ष केंद्रीत करण्याचे ठरविले आहे. आम्हाला खात्री आहे की, या नगदी पिकांच्या जोरावर आम्ही शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणू शकू. म्हणून, आपण जेव्हा या नगदी व मौलीक पिकांकडे पाहतो तेव्हा केवळ जेनेटिक किंवा पाण्याच्यादृष्टीने न पाहता, त्यासाठी उत्तम नर्सरी मॅनेजमेंट, उत्तम मार्केटिंग हवे. असे केल्यास शेतकऱ्याला निश्चितपणे फायदाच होईल. जर, शेतकऱ्यांनी या पिकांचे उत्पादन करणे थांबवल्यास त्याला त्याचा फायदा होणार नाही. आपण शेतकऱ्यांच्या मालाला चांगली किंमत कशी मिळेल, हे पाहणे अत्यावश्यक आहे. आणि आम्ही नेमके हेच करीत आहोत.



जेव्हा आपण 'नर्सरी मॅनेजमेंट' बाबत बोलतो तेव्हा प्रत्येक केंद्रामध्ये त्यासाठी भक्कम अशी यंत्रणा उभी असणे गरजेचे आहे. त्या केंद्रांतून लक्षावधी बियाणे उपलब्ध झाली पाहिजेत. शेतकऱ्यांना सर्वोत्तम दर्जाचे बियाणे कसे मिळेल व त्यायोगे केंद्राला जास्तीजास्त उत्पन्न कसे मिळेल हे पाहिले पाहिजे. या केंद्रातून दरवर्षी सुमारे एक लाख शेतकऱ्यांना प्रशिक्षित केले जाते.

आपणाकडे सध्या देशभर 'व्हेजीटेबल नर्सरी' आहेत. त्या पैकी काही केंद्रे वर्षाला ८० लाख बियाणे तयार करीत आहेत. जेव्हा आम्ही हरितगृहे उभारतो, त्या वेळी त्यात गुंतवणूक कशा पद्धतीने करावी, याचा तर्कसंगत विचार करीत असतो. ज्या तंत्रज्ञानाने आपल्याला उत्पन्न मिळत नाही, त्याचा अंगीकार आम्ही करीत नाही. प्रत्येक हरितगृहांचे स्वत:चे असे एक वेगळे वैशिष्ट्य आहे. कृषी क्षेत्रात महिलांनी जास्तीत जास्त प्रमाणात सहभागी होण्याची आवश्यकता आहे. विशेषत: कृषी उद्योग, मार्केटिंग आदि क्षेत्रात महिलांनी मागे राहून चालणार नाही. सर्वांत शेवटचा मुद्दा म्हणजे, इंडो-इस्रायल केंद्राद्वारे प्रत्येक खेड्यांपर्यंत पोहोचण्याचा आमचा प्रयत्न आहे. हे एक 'टीम वर्क' आहे. कृषी क्षेत्रातील वेगवेगळ्या संशोधनासाठी सरकारचेही सहकार्य घेऊन आपल्याला हे कार्य करायचे आहे आणि हेच इंडो-इस्रायल सेंटरचे उद्दिष्ट आहे.

■■






## रफाल विमानाचे झाले काय?

भारताला फ्रान्सकडून मिळणाऱ्या पहिल्या रफाल विमानाची लिंबू, नारळाने झालेली पूजा सर्वांनी पाहिली होती.

देशाचे संरक्षणमंत्री राजनाथसिंग यांनी फ्रान्समध्ये जाऊन ही पूजा केली होती आणि तिचे थेट प्रसारण भारतात करण्यात आले होते आणि लिंबू ठेवण्याच्या कृतीचे भक्तमंडळींनी विलक्षण उत्साहाने स्वागतही केले होते.

2019च्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात ब्रह्मांडनायकांनी सप्टेंबर-2019 मध्ये पहिले रफाल विमान भारताला मिळेल असे जाहीर केले होते. त्यानुसार पूजा करण्यासाठी रफाल विमान मिळाले पण लढण्यासाठी अद्याप विमान मिळायचे आहे.

2019मध्ये बंगलुरु येथे झालेल्या एअर शो मध्ये फ्रान्सने केवळ तोंडी लावण्यासाठी म्हणजेच फक्त दाखवण्यासाठी एक रफाल विमान पाठवले होते. त्याने आकाशात भराऱ्या मारुन लोकांचे मनोरंजन केले होते. पण ब्रह्मांडनायकांनी पंतप्रधान झाल्यानंतर तत्काळ 32 रफाल विमाने खरेदी करण्याचा जो परस्पर करार केला होता त्याचे काय? आता ही विमाने मिळणार कधी?

यासंदर्भात एक मजेदार किस्सा घडल्याचे कानावर आले. बांगला देशाच्या हवाईदलासही रफाल विमाने खरेदी करायची आहेत आणि त्यांचे संरक्षणमंत्री भारतात आले असता त्यांनी सहज म्हणून विमानांची चौकशी केली असता त्यांना फारच वेगळी माहिती मिळाल्याचे समजले.

रफाल विमाने तयार करणारी कंपनी दासू किंवा दासॉ आहे. या कंपनीत म्हणे संप चालू असल्याने उत्पादनाला खीळ बसली आहे.

ही माहिती मिळाल्यानंतर बांगला देशाने ही विमाने खरेदी करण्याची आपली योजना रद्द केली म्हणे!






बांगला देशाचे ठीक आहे ! पण भारताचे काय? प्रत्येक गोष्टीचा गाजावाजा करण्याची सवंग सवय लागलेले हे सरकार आहे.

रफाल विमानांचा परस्पर करार करताना ब्रह्मांडनायकांनी सर्व कामकाज पध्दती धाब्यावर बसवली होती. त्यामुळे त्याबाबत संशय निर्माण झाला होता.

मागाहून यासंदर्भात बाहेर आलेल्या माहितीनुसार भारतातील काही विशिष्ट उद्योगपतींना या व्यवहारात झुकते माप मिळाले असल्याचे निष्पन्न झाले होते.

तत्कालीन फ्रान्सच्या राष्ट्रप्रमुखांनी देखील भारतातर्फे एका विशिष्ट उद्योगपतीच्या कंपनीला भागीदारी देण्याबाबत सांगण्यात आल्याचा गौप्यस्फोट केला होता आणि आजतागायत ब्रह्मांडनायक किंवा त्यांच्या साथीदारांनी त्याबाबत खुलासा केलेला नाही.

'रफाल येणार आणि पाकिस्तानला कापरे भरणार' अशा प्रकारच्या अत्यंत बालिश व भंपक घोषणा अंधभक्तांकरवी करण्यात आल्या होत्या. पण पहिले रफाल विमान सोडा त्याचा साधा एक पंख किंवा एक चाकही भारतात अजुन दाखल झालेले नाही.

एवढे होऊनही 'स्वनामधन्यता', स्वतःचा बडेजाव मिरविण्याचे प्रकार चालूच आहेत. आणि कुणी फार प्रश्न विचारु लागल्यास तत्काळ त्याला 'देशद्रोही', 'पाकिस्तानी एजंट' वगैरे म्हणून त्याचा आवाज बंद करण्याचे प्रकारही अखंड चालू आहेत.

थोडक्यात काय रफाल अजुन कारखान्यातच आहे.

पोकळ व फुकट राणा भीमदेवी थाटातल्या घोषणा या घोषणाच राहिल्या आहेत!

विमान भारतात कधी येणार हे अद्याप अनिश्चितच आहे !

## दविंदरसिंग आहे कोण??

जम्मू-काश्मीर पोलिस दलातील एक वरिष्ठ अधिकारी दविंदरसिंग याला खतरनाक अतिरेक्यांना घेऊन जात असताना पकडण्यात आल्याची बातमी सर्वांनीच वाचली असेल आणि तोंडात बोटेही घातली असतील !

हा अस्तनीतला निखारा निपजला कसा?

आता हळूहळू बाहेर येत असलेल्या माहितीनुसार या पोलिस अधिकाऱ्याचे अतिरेकी व दहशतवाद्यांशी अनेक



वर्षांपासून संबंध असल्याचे उघडकीस येत आहे.

मग प्रश्न निर्माण होतो की इतक्या दिवसांमध्ये त्याच्या या हालचाली कुणाच्याच कशा लक्षात आल्या नाहीत?

खरी मेख येथेच आहे!

या दविंदरसिंग याने संसदेवरील हल्ल्यासंदर्भात फाशी देण्यात आलेल्या अफजल गुरुचा पोलिस कोठडीत छळ केल्याची माहिती समोर आली आहे. या पोलिस अधिकाऱ्याच्या संदर्भात अफजल गुरुने त्याच्या डायरीत केलेल्या काही नोंदी विलक्षण धक्कादायक आहेत. संसदेवरील हल्ल्यात सहभागी हल्लेखोर दहशतवाद्यांच्या पाठवणीत दाविंदरसिंग याचा हात असल्याचे अफजल गुरुने लिहिलेले असल्याचे समजते.

असे असेल तर संसदेवरील हल्ल्याचे प्रकरण नेमके काय होते असे प्रश्न निर्माण झाल्याखेरीज रहात नाहीत!

एवढेच नव्हे तर भारतीय गुप्तचर संस्था आणि दहशतवादी अशा दोन्ही कडे 'डबल एजंट' म्हणून काम करणाऱ्या एका दहशतवाद्याशी दाविंदरसिंगचे नियमित संबंध असल्याची माहितीही समोर येत आहे.

एकंदरीतच एखाद्या हेरकथेत शोभावी अशी माहिती बाहेर येत आहे.

आणखीही काही चमत्कारिक माहिती चर्चेत आहे. त्यानुसार दविंदरसिंग यांचे दिल्लीतल्या उच्चपदःस्थांशी अतिशय निकटचे संबंध असल्याचे समजते. त्याच्या मुलीच्या आयआयएममधील प्रवेशासाठी एका अतिविशिष्ट श्रेणीतील नेत्याने मदत केल्याचे सांगण्यात येते.

लोकसभा निवडणुकीच्या ऐन तोंडावर पुलवामा येथे निमलष्करी दलाच्या जवानांच्या हत्याकांडाच्या वेळी दविंदरसिंग हेच तेथील जिल्हा पोलिस अधीक्षक होते असे सांगण्यात येते.

असा हा 'पॉवरफुल' अधिकारी पकडला कसा गेला?

यासंदर्भातही असे सांगितले जाते की जम्मू-काश्मीर पोलिसांमध्येही जे विविध गट आहेत त्यांच्यात परस्परांवर कुरघोडी करण्याचे जे प्रकार होत असतात त्यातून हा प्रकार घडला असावा असा कयास केला जात आहे.

दिल्लीतल्या उच्चपदःस्थांच्या वरदहस्ताचा उपयोग करुन घेऊन राज्यात इतरांवर दादागिरी करण्याचे प्रकार कुणी अधिकारी करीत असल्यास इतर मंडळी मग एकत्र येऊन त्याचा काटा काढतात हा सर्वसाधारण प्रकार असतो.

सीबीआयमध्ये राकेश अस्थाना नावाच्या अधिकाऱ्याने असाच प्रकार केला होता. आपले गुजरात कनेक्शन वापरुन थेट सीबीआयच्या प्रमुखांवरही दादागिरी करण्यास त्यांनी मागे पुढे पाहिले नाही तेव्हा त्यांना त्यांची जागा दाखविण्यात आली. दविंदरसिंग याच्याबाबतीत असाच काहीसा प्रकार झाला असावा असा अंदाज व्यक्त होत आहे. हे प्रकरण नाजुक व संवेदनशील आहे आणि याचे धागेदोरे फारसे बाहेर येऊ नयेत यासाठी केंद्र सरकार विशेष खबरदार आहे.

ज्या दिवशी परदेशी राजदूतांनी काश्मीरला भेट दिली होती त्यावेळी विमानतळ परिसराची सुरक्षा दविंदरसिंग याच्याकडेच होती.

राजदूतांशी हस्तांदोलन करणाऱ्यांमध्येही त्याचा समावेश होता. त्यामुळे केवळ बारा - तेरा लाख रुपयांसाठी असा महत्वाकांक्षी अधिकारी बळी जावा हे काहीसे न पटणारे आहे. त्याच्या या प्रकरणात इतरही अनेक गोष्टींचे धागेदोरे निगडित आहेत.

अशी चर्चा आहे की जरा या प्रकरणाची चर्चा थांबली की सावकाशपणे आणि फारसा गाजावाजा न करता हे प्रकरण मिटविण्यात येईल.

जे काय व्हायचे ते होईल!

हे प्रकरण मात्र रहस्यमय आणि मति गुंग करणारे आहे एवढे मात्र निश्चित!



## भाजपचे बंडखोर??

जॉर्ज फर्नांडिस यांच्या पहिल्या पुण्यतिथीचा प्रसंग होता. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार या कार्यक्रमाचे मुख्य अतिथि होते.

फर्नांडिस यांच्या संघर्षशील जीवनाचा आढावा त्यांनी घेतलाच पण आज फर्नांडिस असते तर त्यांनी काय केले असते, असा प्रश्नही उपस्थितांना केला. पवार यांनी रेल्वे, संरक्षण उत्पादन



यासह विविध क्षेत्रात खासगीकरणाचा तसेच परकी गुंतवणुकीसाठी सताड दरवाजे उघडण्याचा राज्यकर्त्यांनी लावलेला सपाटा याचा उल्लेख केला. त्याचप्रमाणे कामगार व मजुरांच्या विरोधात या सरकारने आणलेल्या विविध कायद्यांची यादीच वाचून दाखवली. वर्तमान सरकारच्या कारकिर्दीत देशाची व विशेषतः कामगार व मजुरांची स्थिति अत्यंत वाईट असल्याचे सांगून त्यांनी फर्नांडिस असते तर त्यांनी याविरुध्द आवाज उठविला असता आणि ती प्रेरणा घेऊन आता सर्वांनी राजकीय मतभेद विसरुन एकत्र येऊन याविरुध्द व्यापक आंदोलन व मोहिम



सुरु करण्याचे आवाहन त्यांनी केले.

पवारांच्या भाषणाला जोरदार प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाला भाजपचे बिहारमधील एक नेते व आमदार संजय पास्वान हेही उपस्थित होते. पास्वान यांनाही बहुधा पवार यांच्यापासून प्रेरणा मिळाली असावी.

तसे ते फटकळ व स्पष्टवक्ते नेते म्हणून ओळखले जातात. त्यामुळेच त्यांनी सध्या विविध मुद्यांवर सरकारच्या विरोधात सुरु असलेल्या आंदोलनांचा उल्लेख केला आणि 'लोक रस्त्यावर उतरत असतील तर सरकारने त्यांचे म्हणणे ऐकले पाहिजे' असे काहीसे धक्कादायक विधान केले. पण एवढ्यावरच ते थांबले नाहीत. भारत हा एक मोठा देश आहे आणि येथे कुणीही आपल्या ताल व लहरीनुसार राज्यकारभार करण्याचा प्रयत्न केल्यास ते उचित होणार नाही असेही आणखी एक धक्कादायक विधान केले.

पास्वान यांचा रोख कुणीकडे होता हे तेच जाणोत. पण सद्यःस्थितीत ते त्यांच्याच पक्षाच्या केंद्रातील सरकारला लागू पडणारे






वक्तव्य होते.

पास्वानच कशाला? मध्य प्रदेशातील भाजपचे एक आमदार नारायण त्रिपाठी यांनी राज्य सरकारने आणलेल्या एका कायद्याच्या विधेयकावर पक्षादेश झुगारुन काँग्रेसच्या बाजुने मतदान केले.

त्यावर कडी म्हणजे नागरिकत्व दुरुस्ती कायद्याच्या विरोधात सादर करण्यात आलेल्या ठरावावरही त्यांनी पक्षादेश झुगारुन काँग्रेसच्या बाजुने आणि त्या कायद्याच्या विरोधात मतदान केले.

आपल्या या बंडखोरीबद्दल बोलताना ते म्हणाले की 'वसुधैव कुटुंबकम' म्हणजेच 'हे विश्वचि माझे घर' ही भारताची संस्कृति असताना धार्मिक भेदभावाच्या आधारे आणलेल्या कायद्याला विरोध केलाच पाहिजे. हा कायदा भारतीय संस्कृतीच्या मूलभूत सिध्दांताच्या विरोधात जाणारा असल्यानेच आपण त्याविरुध्द मतदान केले.

भाजप नेतृत्वाला अशा रीतीने आव्हान देण्याचे हे प्रकार काय दर्शवितात?

हळूहळू का होईना, पक्षात आता काही धाडसी मंडळींना घुसमट सहन होईनाशी झाली आहे असे दिसू लागले आहे. त्याचे हे लहान लहान स्फोट आहेत.

अद्याप मोठे स्फोट होताना आढळत नाहीत. परंतु नौकेला छेद जातो तेव्हा तो सुरुवातीला लहानसाच असतो. पाणी जसजसे नौकेत घुसू लागते तसतसा तो छेद किंवा भेग ही रुंदावत जाते. त्याची परिणिती नौका बुडण्यात होते.

हे एक वास्तव आहे व तो एक सृष्टीचा नियम आहे.

भाजपचे वर्तमान नेतृत्व याची दखल घेईल तर ठीक ! अन्यथा????

## इकडे भक्त...तिकडेही भक्त? की चाहते?

भक्त आणि चाहते यांच्यात फरक असतो का?

असतो !

कधीकधी त्या सीमारेषा पुसल्याही जातात.

आघाडीची चित्रपट तारका दीपिका पदुकोन जेएनयू(जवाहरलाल नेहरू विद्यापीठ) मधील निर्घृण हल्ल्याचे लक्ष्य झालेल्या विद्यार्थ्यांच्या समर्थनासाठी उभी राहिली.

दीपिका जेएनयूमध्ये आली. धरणे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबर ती पंधरा मिनिटे उभी राहिली आणि परत गेली.

तिने कोणतेही भाषण किंव वक्तव्य केले नाही. केवळ सहानुभूती म्हणून तिने ती हजेरी लावली. एकप्रकारे तिच्या मौन हेरीचे राजकीय वर्तुळातही स्वागत झाले कारण मौन पाळून तिने राजकीय विवाद टाळला.



परंतु भाजप-संघ परिवाराच्या मंडळींच्या पोटात दुखणे स्वाभाविक होते. आघाडीची तारका डाव्या, उदारमतवादी विचारांच्या विद्यार्थ्यांच्या बाजुने उभी राहते म्हणजे काय? लगेचच परिवाराच्या प्रचारक टोळ्यांनी तिच्यावर नाहीनाही ती टीका सुरु केली. चित्रपटाच्या प्रसिध्दीसाठीचा ही स्टंट आहे येथपर्यंत त्यांनी मळमळ ओकली.

याचसुमारास दीपिकाची भूमिका असलेला व ॲसिड हल्लाग्रस्त महिलांच्या जीवनावरील 'छपाक' सिनेमा प्रदर्शित झाल्याने प्रचारकी टोळ्यांना आयते खाद्य मिळाले. पण दीपिकाने मौन पाळून वाद होऊ दिला नाही. प्रचार थंडावला.

पण यामुळे दीपिकाच्या राजकीय क्षेत्रातल्या चाहत्यांमध्ये एकदम भरमसाट वाढ झाली.

मध्यममार्गी, डावीकडे झुकलेल्या




व उदारमतवादाचा पुरस्कार करणाऱ्या राजकीय शक्तींना एकदम त्यांच्याबद्दल आकर्षण निर्माण झाले. त्यात त्यांनी ॲसिड हल्लाग्रस्त महिलांच्या प्रश्नावर सिनेमा काढल्याने त्यांच्याबद्दलच्या आदरात वाढच झाली.

काही मध्यममार्गी राजकीय पक्षाच्या नेत्यांनी आपण होऊनच या सिनेमाचा प्रचार सुरु केला.

अनेक राज्यांमध्ये या सिनेमाला



करमुक्त करण्याची मागणी झाली आणि विशेषतः बिगर भाजप व भाजप विरोधातल्या राज्यांमध्ये या सिनेमाला करमुक्ती देखील मिळाली.

काही स्वयंसेवी संस्थांनी या सिनेमाचे विशेष खेळ केले व लोकांना हा सिनेमा पाहण्यास उद्युक्त केले.

याच मालिकेत राष्ट्रीय लोकदलाचे तरुण नेते आणि चौधरी चरणसिंग यांचे नातू व अजितसिंग यांचे पुत्र जयंत चौधरी यांनी तर कमालच करुन टाकली. त्यांनी चक्क एका सिनेमा हॉलमध्ये एका खेळाची सर्व तिकिटे खरेदी केली आणि आपल्या कुटुंबियांसह व इष्टमित्रांसह हा सिनेमा पाहिला.

थोडक्यात काय?

दीपिकाच्या त्या पंधरा मिनिटांच्या जेएनयू मधील मौन उपस्थितीमुळे तिचा चित्रपट चर्चेत आलाच पण चित्रपटाला प्रतिसादही मिळाला.

जय हो !!

## सीएए आणि वाचाळ दिंड्या

'सीएए' उर्फ 'नागरिकत्व दुरुस्ती कायदा' वाजतगाजत लागू केला खरा पण त्याला झालेला विरोध बहुधा सत्तापक्षाला अनपेक्षित असावा.

दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे होणारा विरोध काही किरकोळ अपवाद वगळता अत्यंत शिस्तबध्द, अहिंसक आणि कायदेशीर आहे. यामुळे भक्तमंडळी विलक्षण पेचातही आहेत आणि भडकलेली पण आहेत.

या 'सीएए'विरोधी आंदोलनाला आता बदनाम करण्याचा खुनशी डाव आता भक्तमंडळींनी सुरु केला आहे.

हे आंदोलन देशविरोधी आहे, या आंदोलनाला पाकिस्तानची मदत आहे, पाकिस्तानधार्जिणे आंदोलन आहे येथपासून आंदोलनकारी देशद्रोही आहेत, गद्दार आहेत येथपर्यंत भक्तमंडळींनी त्यांची






नेहमीसारखी घाणेरडी व गलिच्छ पातळी गाठली आहे.

आंदोलनकारी मंडळींशी संवाद साधण्याऐवजी सत्ताधारी त्यांना दूषणे देणारी भाषणे करीत फिरत आहेत.

दिल्लीची विधानसभा निवडणूक आता होत असल्याने त्यांच्या भाषणांमध्ये केवळ कडवेपणाच नव्हे तर विखारही प्रकट होत आहे.

आंदोलनकारी लोकांना चिथावणी देण्याचे सर्व प्रयत्न वाया जात असल्याने आणि ते आपला शांतिपूर्ण सत्याग्रहाचा मार्ग सोडत नसल्याने भक्तमंडळी अक्षरशः पिसाळली आहेत.

अर्थखात्याचे राज्यमंत्री अनुराग ठाकूर यांनी दिल्लीत प्रचार करताना या आंदोलनकारी लोकांकडे निर्देश करताना घोषणा दिली, 'देश के गद्दारों को' आणि तत्काळ उपस्थित भक्तजमावाने, 'गोली मारों सालों को' म्हणून त्यांना प्रतिसाद दिला. केंद्रीय मंत्र्याकडून ही अपेक्षा नव्हती.







पण ते तर फारच लहान पडले ! साक्षात गृहमंत्रीच या आंदोलनकारी मंडळींना पाकिस्तानी एजंट म्हणत असतील तर अनुराग ठाकूर यांच्यासारखा कनिष्ठ मंत्री असलीच भाषा बोलणार!

अनुराग ठाकूर हे वादग्रस्तपणा करण्यात सराईत आहेत. त्यांनी प्रादेशिक सेनेत प्रवेश केला होता. एक दिवशी हे महाशय चक्क सेनेच्या गणवेषात लोकसभेत हजर झाले.

संसदीय नियमानुसार कुणाही संसदीसदस्याला गणवेषात संसदगृहाच्या आतमध्ये प्रवेश नसतो. त्यांना गणवेषात पाहिल्यानंतर एकच गोंधळ झाला व लोकसभा अध्यक्षांनी त्यांना सभागृहाबाहेर जाण्याचा आदेश दिला.

काहीच न घडल्याच्या अविर्भावात ते बाहेर गेले.

संसदीय सभ्यता, शिष्टाचाराही न पाळणारा हा माणूस असल्याने त्यांच्या भाषेबद्दल काय बोलावे?

दिल्लीचे आणखी एक खासदार प्रवेशसिंग वर्मा ! हे महाशय दिल्लीचे माजी दिवंगत मुख्यमंत्री साहेबसिंग वर्मा यांचे चिरंजीव व सध्या ते लोकसभेत आहेत. त्यांनी या आंदोलनकारी लोकांबद्दल आणखी खालची पातळी गाठली. ते म्हणाले, 'हे लोक उद्या तुमच्या घरात घुसतील आणि तुमच्या आयाबहिणींवर बलात्कारही करतील!'

ही सर्व भाषणे चित्रीत आहेत व त्याचे पुरावे पण आहेत. दिल्लीच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी त्याच्या चित्रफिती पण मागवल्या.

अखेर निवडणूक आयोगाने अनुराग ठाकूर व प्रवेशसिंग वर्मा या दोघांना 'स्टार प्रचारक' म्हणून बंदीची घोषणा केली.

निवडणूक आयोगाचा निर्णय

स्वागतार्ह आहे. परंतु एकाच भाषणात किंवा वक्तव्यात या नेत्यांना जो काही गोंधळ घालायचा होता तो त्यांनी घातलेला आहे. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई झाली ही बाब उचित असली तरी 'बैल गेला व झोपा केला' अशी त्याची अवस्था आहे.

## तुम्ही करता ती अडवणूक मग आम्ही करतो ती????

राजधानीतल्या जामियानगर परिसरातील शहीनबाग येथे गेल्या महिन्यापासून अधिक काळ नागरिकत्व दुरुस्ती कायद्याच्या विरोधात अत्यंत शांतिपूर्ण आणि अहिंसक व कायदेशीर असे निषेध आंदोलन सुरु आहे. त्यामुळे महिन्याहून अधिक काळ तेथील मुख्य रस्ता बंद आहे.

यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण झाला आहे आणि त्यामुळे या भागात वाहतुकीची मोठी कोंडी निर्माण



होत आहे.

भाजप व संघपरिवाराने येथील नागरिकांना चिथावणी देऊन, 'तुम्ही या आंदोलनकारी लोकांविरुध्द तक्रारी करा' म्हणून लकडा लावला. पण त्याचा काही उपयोग होऊ शकला नाही. कारण कुठेतरी सामान्य नागरिकांना पण या कायद्याबद्दल भरपूर शंका आहेत.

त्यामुळेच वाहतुकीची अडचण होऊनही कुणी त्याबद्दल फारशी तक्रार करण्यास तयार नाही. आता याचे दुसरे चित्र पहा !

या देशाचे सर्वशक्तिमान गृहमंत्री व ज्यांना आधुनिक पोलादी पुरुष म्हणून सर्वत्र ओळखले जाते ते ज्याठिकाणी राहतात, तेथे जाणारे सर्व प्रमुख रस्ते गेल्या



महिन्यापेक्षा अधाक काळापासून बंद करण्यात आले आहेत. त्यांच्या घरावर कुणी मोर्चा घेऊन येऊ नये या भीतीने त्यांच्या निवासस्थानाकडे जाणारे प्रमुख रस्ते चहूबाजुंनी बंद करण्यात आले आहेत.

या नाकेबंदीमुळे या मार्गावरुन जाणाऱ्या स्थानिक बसगाड्यांचे मार्गही बदलण्यात आले आहेत व त्यामुळे या परिसरातील बसने जा-ये करणाऱ्या नागरिकांचे हाल होत आहेत.

पण सर्वशक्तिमान गृहमंत्र्यासाठी रस्ते अडविले तर ते चालते.

आंदोलनकारी लोकांमुळे रस्ते अडले तर तो देशद्रोह अशी नवी व्याख्या देशात रूढ होत आहे.

मेरा भारत महान !!!!!



## प्रचाराचे 'तारे' अद्याप ढगातच?

दिल्लीत विधानसभा निवडणुकीचे अद्याप म्हणावे तसे वातावरण आढळून येत नाही.

या निवडणुकीवर नागरिकत्व दुरुस्ती कायद्याची अशी काही छाया पडलेली आहे की प्रचाराला म्हणावा तसा जोरच येताना दिसत नाही.

'आम आदमी पार्टी' उर्फ 'आप'चा जोर त्यांनी केलेली गेल्या पाच वर्षातील कामगिरी, विकास व प्रगतीवर आहे.

भाजपने नागरिकत्व दुरुस्ती कायदा, भारत-पाकिस्तान, हिंदू-मुसलमान हे नेहमीचे धार्मिक ध्रुवीकरणाचे व भावना भडकाविणारे मुद्दे घेतले आहेत. काँग्रेस पक्ष असून नसल्यासारखा आहे.

पण प्रचारासाठी आप आणि भाजपने जी 'स्टार-प्रचारकां'ची यादी जाहीर केली होती त्यातील प्रमुख 'स्टार' अद्याप बाहेर येऊन तळपताना दिसत



नाहीत आणि बहुधा ते ढगात झाकोळलेले असावेत.

भाजपतर्फे सध्या एकच तारा चमकतोय व तो म्हणजे सर्वशक्तिमान अमितभाई शहा म्हणजेच आधुनिक पोलादी पुरुष व गृहमंत्री !

खरे तर भाजपने करण्यात आलेल्या






DELHI KI MAHABHARAT

घोषणेनुसार सर्वशक्तिमान शहा यांच्या बरोबरीने ब्रह्मांडनायक उर्फ देशाचे पंतप्रधान हे दोघेच स्टार प्रचारक असतील असे म्हटलेले होते.

सध्या सर्वशक्तिमान शहाच प्रचार करताना दिसत आहेत.

शहा यांनी 20 जानेवारीला पक्षाचे अध्यक्षपद अधिकृतपणे सोडले. पण त्यांची जागा घेणाऱ्या जगत प्रकाश नड्डा यांना दिल्लीच्या प्रचारात फारच थोडा वाव ठेवण्यात आल्याचे दिसते.

सगळीकडे सर्वशक्तिमान शहाच दिसत आहेत.

ते सर्वशक्तिमान असल्याने



साहजिकच त्यांना त्यानुसारच जोरदार प्रसिध्दी मिळत आहे तसेच प्रसिध्दीसाठी प्रक्षोभक विधाने करण्याचे 'कौशल्य'ही त्यांनी आत्मसात केले आहे.

ब्रह्मांडनायक बहुधा केंद्रीय अर्थसंकल्प 1 फेब्रुवारीला सादर झाल्यानंतर प्रचाराच्या रणधुमाळीत उतरतील!

थोडक्यात अर्थसंकल्प सादर केल्यानंतर त्यातील लोकांना खुलविणाऱ्या तरतुदींच्या आधारे जनतेला आणखी भ्रमित करण्याची त्यांची योजना राहील.

पण बिच्चारे नड्डा जी ! त्यांना या दोन ताऱ्यांमधून कोणतीच संधी मिळताना दिसत नाही ! ते या दोन ताऱ्यांमुळे निष्प्रभ व झाकोळलेलेच राहण्याची चिन्हे आहेत !

## अर्ध्या रात्री सुध्दा मदतीला तत्पर

केंद्रीय शिक्षण मंत्रालय किंवा नव्या भाषेत मनुष्यबळविकास मंत्रालयातर्फे राष्ट्रीय शालेय बँड स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

देशभरातील सुमारे 16 शाळांनी त्यात भाग घेतला होता.

सुमारे चारशे विद्यार्थी व विद्यार्थिनींचा त्यात समावेश होता.

एवढ्या मुलामुलींच्या निवासाची सोय करणे हे एकप्रकारे अवघडच असते परंतु ठिकठिकाणी या मुलांची सोय करण्यात आली होती. केरळमधील कन्नूर येथील एका शाळेच्या मुलींची व्यवस्था राष्ट्रीय बाल भवन येथे करण्यात आली होती. परंतु हिवाळ्यात दिल्लीत परिसंवाद, परिषदा यांची प्रचंड गर्दी असल्याने निवास व्यवस्थेवर मोठा ताण असतो.

स्पर्धा संपल्यानंतर कन्नूरच्या शाळेतील या 26 मुली व त्यांचे शिक्षक के.सुधाकरन यांच्याशी संपर्क साधला आणि त्यांना अडचण सांगितली. हे सर्व होईपर्यंत मध्यरात्र झाली होती.

सुधाकरन यांनी मनुष्यबळ विकास राज्यमंत्री संजय धोत्रे यांना मध्यरात्री फोन केला आणि अवेळी फोन करीत असल्याबद्दल प्रथम माफी मागितली पण अडचण गंभीर असल्याने फोन केल्याचे सांगितले व या मुलींना बाल भवन येथेच राहू द्यावे अशी विनंती केली.

धोत्रे यांनी तातडीने संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधला आणि त्या मुलींच्या निवासाची सोय तेथेच करण्याचा आदेश दिला. यामुळे त्या मुलींना ऐन थंडीत व मध्यरात्री दिल्लीसारख्या ठिकाणी कुठेतरी निवास शोधत बसण्याचा अनास्था प्रसंग टळला.

सगळ्यांनी धोत्रे यांना धन्यवाद दिले. धोत्रे हे अतिशय साधेपणाने राहणारे



काही नेते किंवा मंत्री साधे असतात आणि फारसा बडेजाव न करताही आपापली कामे इमानइतबारे करीत असतात.

असाच काहीसा प्रकार नुकताच घडला.

एक दिवस आणखी राहून परतणार होते. पण आदल्या रात्रीच त्यांना जागा सोडण्यास सांगण्यात आले. दिल्लीच्या कडाक्याच्या थंडीत या शाळकरी मुलींना कुठे घेऊन जाणार या विवंचनेत शिक्षकमंडळी होती. मग शिक्षकांनी कन्नूरचे खासदार आणि कोणताही बडेजाव न करणारे मंत्री आहेत. भाजपमधील जमिनीवर पाय असलेल्या मोजक्या मंत्र्यांपैकी ते एक आहेत. बहुधा त्यामुळेच त्यांनी त्या लहान मुलींची अडचण तत्काळ दूर केली !

जय हो !!!

■■

**अर्थसंकल्पावर राष्ट्रवादी काँग्रेसची प्रतिक्रिया**

# अर्थसंकल्पाने महाराष्ट्राचा अपेक्षाभंग व देशवासियांची निराशा

**अजित पवार**

मुंबई – सन २०१९–२० च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार महाराष्ट्राला केंद्रीय करातील ४४ हजार ६७२ कोटींचा निधी मिळणे अपेक्षित होते, परंतु सुधारीत अंदाजानुसार केंद्रीय करातील ८ हजार ५५३ कोटी रुपये कमी होऊन ३६ हजार २२० कोटी रुपयेच मिळतील. हे महाराष्ट्रासाठी गंभीर आणि धक्कादायक आहे अशा शब्दात उपमुख्यमंत्री आणि वित्तमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय अर्थसंकल्पावर आपली नाराजी व्यक्त केली आहे. देशाच्या तिजोरीत महाराष्ट्र सर्वाधिक कर भरतो. अर्थव्यवस्थेत महाराष्ट्राचं योगदान सर्वाधिक आहे. तरीही केंद्रीय अर्थसंकल्पातून महाराष्ट्र गायब आहे याबाबत अजित पवार यांनी चिंता व्यक्त केली आहे.

अर्थसंकल्पात बंगळूरु परिवहन सेवेला २० टक्के भागभांडवल दिले जाते. मुंबई, पुणे, नागपूरच्या परिवहन सेवेचा उल्लेखही होत नाही. गुजरातच्या गिफ्ट सिटीमध्ये आंतरराष्ट्रीय सोने–चांदी बाजाराची घोषणा होते. हे सारं मुंबई





आणि महाराष्ट्राचं महत्वं कमी करण्यासाठी तर नाही ना? अशी शंका अजित पवार यांनी व्यक्त केली आहे. चालु वित्तीय वर्षाच्या सुरुवातीला राजकोषीय तुट ३.४ टक्के अपेक्षित होती. ती घसरुन ती वर्षाअखेर ३.८ झालेली आहे. तसेच २०२०-२१ अर्थसंकल्पामध्ये पुढील वर्षात चालू किमतीवर विकासदर १० टक्के (चालू किमतीचा विकासदर म्हणजे विकासदर अधिक महागाई दर) अपेक्षित धरला आहे. याचा अर्थ पुढील वर्षातील विकास दर ६ टक्के देखील राहणार नाही ही चिंतेची बाब आहे. असेही अजित पवार म्हणाले.

देशाची अर्थव्यवस्था आणि विकासदर गेल्या सहा वर्षातील सर्वात निचांक पातळीवर असताना शेतकऱ्यांचे उत्पन्न २०२२ पर्यंत दुप्पट, दुधाचे उत्पादन २०२५ पर्यंत दुप्पट असे दावे कशाच्या आधारे करण्यात आले याचा बोध होत नाही.

मेक इन इंडिया, स्मार्ट सिटीसारख्या योजना फसल्या असताना पीपीपी तत्वावर नवीन स्मार्ट सिटी निर्माण करणे किंवा एलआयसी, आयडीबीआय बँकेच्या समभागविक्रीची घोषणा हे उत्तम चांगल्या संस्थांच्या खाजगीकरणाच्या दिशेने टाकलेले पाऊल आहे असेही अजित पवार यांनी सांगितले.

देशात बेराजगारी सर्वोच्च पातळीवर आहे. आर्थिक मंदीचं गंभीर सावट आहे, अशा परिस्थितीत उद्योग आणि परदेशी गुंतवणुकदारांना आकर्षित करतील अशा निर्णयांची अपेक्षा होती. परंतु अर्थसंकल्पात त्याबाबत ठोस काही दिसले नाही. नोटाबंदी आणि जीएसटीमुळे अर्थव्यवस्थेची घसरण सुरु असताना लोकांच्या हातात पैसे शिल्लक राहतील अशा ठोस उपाययोजना अपेक्षित होत्या. उलट डिव्हीडंट डिस्ट्रीब्यूशन टॅक्सचा (डीडीटी) बोजा भागधारकांवर लादण्यात आला आहे हे चुकीचं आहे असेही अजित पवार यांनी सांगितले.

रियल इस्टेट क्षेत्र आज अत्यंत बिकट अवस्थेत असताना या क्षेत्राला दिलासा अपेक्षित होता. त्याबाबतही ठोस काहीही घडलेले नाही. मध्यमवर्गीयांना आठ लाख रुपये उत्पन्नापर्यंत सरसकट आयकर सवलत देणे शक्य होते परंतु ती संधी गमावली आहे. दिवाळखोरीत गेलेल्या बँकांच्या ग्राहकांची ५ लाख रुपयांपर्यंतची ठेव सुरक्षित करण्याचा निर्णय स्वागतार्ह आहे परंतु तो पूर्वलक्षी प्रभावानं राबवण्याची गरज आहे असा सल्ला अजित पवार यांनी दिला.

शिक्षण क्षेत्रात परकीय गुंतवणुकीचा निर्णय स्वागतार्ह असला तरी याचा फायदा दुर्बल, वंचित, उपेक्षित घटकांनाही मिळायला हवा. नव्या शिक्षण धोरणाची घोषणा झाली असली तरी त्यात प्रतिगामी विचारांना थारा असता कामा नये असेही अजित पवार म्हणाले. कृषी व पणन संदर्भातल्या तीन मॉडेल कायद्यांची घोषणा करुन केंद्राचा अजेंडा राज्यांवर थोपवण्याचा प्रयत्न सुरु आहे. शेतकऱ्यांसंदर्भात केलेल्या घोषणा व दिलेली आकडेवारी फसवी आहे. यातून शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होण्याची कोणतीही ठोस योजना, कार्यक्रम नाही असा आरोपही त्यांनी केला आहे. सामाजिक सुरक्षेच्या आघाडीवरही अर्थसंकल्पात पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले आहे. एकूण पाहता हा अर्थसंकल्प महाराष्ट्राचा अपेक्षाभंग करणारा, शेतकरी, कष्टकरी, महिला, विद्यार्थी, व्यापारी, उद्योजक, गरीब, वंचित, उपेक्षित घटकांना विकासाची संधी नाकारणारा आहे असेही पवार म्हणाले. अर्थसंकल्प जाहीर झाल्यानंतर शेअर बाजारात ११७८ अंकांनी झालेली घसरण हे उद्योग व गुंतवणुकदारांमधील नैराश्याचे निदर्शक आहे अशा शब्दात पवार यांनी आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या आहेत.

■■

## दिशाहीन अर्थसंकल्प : शरद पवार

**अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला अर्थसंकल्प दूरदृष्टी नसलेला आणि दिशाहीन आहे. अर्थसंकल्पात शेतीसाठी गोदामांवर लक्ष केंद्रित केले आहे. मात्र, शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे, याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट करणे हे स्वप्नच राहणार आहे. वाढती बरेजोगारी आणि ऑटोमोबॉईल क्षेत्राच्या प्रश्नांकडेही अर्थमंत्र्यांनी लक्ष दिलेले नाही.**





# अर्थव्यवस्थेला गती देण्यासारखं या अर्थसंकल्पात काही नाही

मुंबई - भारतात सगळ्यात मोठा फटका शेतकऱ्यांना बसतो मात्र या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना काहीच मिळालेले नाही. अर्थव्यवस्थेला गती देण्यासारखं या अर्थसंकल्पात काही सांगितलं नाही अशी टिका राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि जलसंपदामंत्री जयंत पाटील यांनी अर्थ संकल्पावर बोलताना केली आहे.

देशाची अर्थव्यवस्था आधीच गोंधळलेली त्यात गोंधळलेल्या अर्थमंत्र्यांनी आज अर्थसंकल्प मांडला. देशात मंदीचे वातावरण आहे, त्यासाठी अर्थसंकल्पात काहीच नाही. रस्त्याच्या कामांसाठी सरकारकडे पैसे नाही मात्र आज मोठ्या घोषणा केल्या गेल्या असेही जयंत पाटील म्हणाले.



## जयंत पाटील यांची टीका

जीएसटीबाबत सरकार पाठ थोपटून घेत आहे. मात्र अनेक राज्यांना अजून पैसे दिले गेले नाही. जीएसटीमुळे अनेक राज्याचे झालेले नुकसान कधी देणार... महाराष्ट्राचेही पैसे अजून मिळाले नाहीत ते कधी मिळणार असा सवालही जयंत पाटील यांनी अर्थमंत्र्यांना केला आहे.

मंदीतून देश बाहेर काढण्यात अर्थमंत्र्यांना अपयश आले आहे.आपल्या देशातील एअर इंडियासारखी कंपनी विकायला लागले आहेत.तर दुसरीकडे डाओसमध्ये पियुष गोएल मी मंत्री नसतो तर मीच कंपनी खरेदी केली असती अशी वक्तव्य करत आहेत असेही जयंत पाटील म्हणाले.

IDBI चे खासगीकरण करण्याची सरकारची मानसिकता आहे. तुमच्या इकॉनॉमीमध्ये पैसे नाही. कंपन्या विकून पैसे आणत आहे देशात स्वातंत्र्यानंतर जे तयार केलं ते मोडून काढायचे काम केलं जात आहे असा आरोपही जयंत पाटील यांनी केला आहे.

या अर्थसंकल्पात मुंबई आणि महाराष्ट्रासाठी काहीच शेतकरी कर्जमाफी आम्ही केली. केंद्रसरकार शेतकऱ्यांना दिलासा तर देत नाहीच पण दिलासा देण्यातही सहभागी होत नाही. पुरामुळे,अतिवृष्टीमुळे जी संकटं आपल्या राज्यावर आली. केंद्रसरकार त्यासाठीही पैसे देत नाही त्याकडे दुर्लक्ष करत आहे असा आरोप जयंत पाटील यांनी केंद्र सरकारवर बोलताना केला.




नाही. महाराष्ट्र आता मोदींचं नावडतं राज्य झालं आहे अशी जोरदार कोपरखळी लगावतानाच मोदींचं लक्ष गुजरात आणि अहमदाबादवर आहे म्हणून मुंबई महाराष्ट्रासाठी काही ठोस दिले गेले नाही. मुंबईकडे दुर्लक्ष करून त्याचं महत्व कमी करणे हेच उद्दिष्ट आहे असाही थेट आरोप जयंत पाटील यांनी बोलताना केला आहे. या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना दिलासा नाही...

आजचा अर्थसंकल्प म्हणजे निव्वळ जुमलेबाजी असून लोकांच्या डोळ्यात धुळफेक करणारा आहे असा थेट आरोपही जयंत पाटील यांनी केला आहे. अर्थसंकल्पात जलसिंचन काही दिसलं नाही. बुलेट ट्रेनसाठी किती पैसे दिले... खर्च केले... त्यावर बोला असा सवालही जयंत पाटील यांनी केला आहे.

■■




# मोठे आकडे टाकून लोकांना भुलभुलय्या दाखवणारे बजेट

मुंबई – मोठे आकडे टाकून लोकांना भुलभुलय्या दाखवणारे हे केंद्राचे बजेट असल्याची टिका करतानाच लोकांना आणि राज्यसरकारला स्वतःच्या हिमतीवर उभं रहावं लागणार अशी परिस्थिती यातून निर्माण होणार असल्याची भीती राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केली आहे.



छगन भुजबळ यांची टीका

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्प हा महाराष्ट्राची निराशा करणारा असून यातून काहीही साध्य होणार नाही असेही छगन भुजबळ यांनी सांगितले.

एकीकडे देशाचा जीडीपी खाली जातोय असे अर्थतज्ञ सांगत असताना हे मात्र वाढणार असे सांगत आहेत. देशाच्या मालकीची एअर इंडियासारखी

संस्था एकीकडे विकायला काढली जात असताना आता सर्व सामान्य नागरिकांच्या भरवशावर सुरु असलेली 'जिंदगी के साथ भी जिंदगी के बाद भी' हे बिरूद मिरवणारी एलआयसी (LIC) मधील शेअर विकून त्याचे खाजगीकरण केलं जातंय त्यामुळे आता पैसे मिळण्याचा भरोसा गेला असून लोकांनी विश्वास तरी कोणावर ठेवावा असा प्रश्न उपस्थित होत असल्याचे छगन भुजबळ म्हणाले.




महाराष्ट्र आणि इतर राज्यातही शेतकरी वर्ग अडचणीत असताना शेतकऱ्यांना मदत करायची नाही आणि बुलेट ट्रेन आणायची हा कुठला न्याय आहे. खरंतर अर्थसंकल्प धाडसी मांडता आला असता,शेती,रोजगार,विद्यार्थी, शिक्षण याकरीता धाडसी निर्णय घेता आला असता मात्र मूळ प्रश्न या बजेटमध्ये दूर गेले. फक्त लॉलीपॉप दाखविण्याच काम केलं जातंय अशी जोरदार टीकाही छगन भुजबळ यांनी केली आहे.




देशात महागाई प्रचंड झाली आहे त्यामुळे करदात्यांना केवळ ५ लाखांपर्यंत दिलासा देऊन काय उपयोग ? देशात बेरोजगारी वाढली, महागाई वाढली, खर्च करायला जनतेकडे पैसे नाही अशी स्थिती आहे. त्यामुळे या अर्थसंकल्पातून काय साध्य होईल हा प्रश्नच आहे असेही शेवटी छगन भुजबळ यांनी सांगितले.

# शेअर बाजार कोसळला हेच अर्थहीन अर्थसंकल्पाचे निदर्शक

## सुप्रिया सुळे यांची टीका



नवी दिल्ली- देशाच्या अर्थव्यवस्थेबाबत वर्षातील सर्वात मोठे भाष्य संसदेत होत असताना शेअर बाजार कोसळला यावरुन या अर्थसंकल्पाला काहीच अर्थ नाही हे उघड आहे अशी जोरदार टीका राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या खासदार सुप्रियाताई सुळे यांनी केली आहे.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन अर्थसंकल्प सादर करीत असताना शेअरबाजार तब्बल ७०० अंकांनी कोसळला याची आठवणही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी करुन दिली आहे.



सरकारच्या हातात शिल्लक राहिलेलं शेवटचं रत्न अर्थात एलआयसी (LIC) विकून त्यातून काही निधी उभारण्याचा घाट या सरकारने घातलाय. अर्थव्यवस्थेची दुर्दशा लपविण्याचा हा केविलवाणा प्रयत्न आहे.पण एलआयसीनंतर सरकारकडे विकण्यासारखं काहीही उरणार नाही.त्यानंतर हे सरकार काय करणार? असा सवालही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी सरकारला केला आहे.



Best

Compliments



# सीएए-एनआरसी

## एनआरसीमुळे भारताच्या विविधतेच्या



# आगीशी खेळ!

गहिनीनाथ

## प्रतिमेचे शक्ती व सामर्थ्य नष्ट होणार.

नागरिकत्व दुरुस्ती कायदा म्हणजेच सीएए(सिटिझन्स ॲमेंन्डमेंट ॲक्ट) आणि त्याच मालिकेत 'नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टर'(एनपीआर) आणि अखेरीस 'नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझन्स'(एनआरसी) लागू करण्याचा मोदी-शहा सरकारचा अट्टाहास हा आगीशी खेळ करण्यासारखा आहे. किंबहुना देशात अशांतता, असंतोष, संघर्ष उत्पन्न व्हावा असा तर या सरकारचा हेतु नाही असा प्रश्न मनात आल्याखेरीज रहात नाही. अशी योजना असेल तर त्याचा अर्थ काय निघतो ? देशात धार्मिक ध्रुवीकरण करणे, अल्पसंख्यक समाजाला दुय्यम करणे आणि बहुसंख्यकवादाचे वर्चस्व निर्माण करुन चिरंतन सत्तेत राहण्यासाठी सोय करण्याचा हा प्रकार असावा अशी समजूत झाल्याखेरीज रहात नाही. ही शंका किंवा हे प्रश्न निराधार नाहीत. ते साधार करण्यात आलेला नाही. त्यामुळेच केवळ एका विशिष्ट धर्माला म्हणजेच मुस्लिमांना वेगळे पाडण्याच्या भूमिकेतून हा कायदा करण्यात आल्याच्या भावनेला बळ मिळाल्यास ते वावगे ठरणारे नाही. यासंदर्भात पटणारा खुलासा करण्यात सरकार अपयशी ठरलेले आहे.

नागरिकत्व कायद्याच्या विरोधात देशभरात शांततापूर्ण निषेध आंदोलने सुरु आहेत. यामध्ये दिल्लीतल्या शहीनबाग येथील आंदोलनाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. त्याला कारणेही आहेत. या आंदोलनात महिलांचा पुढाकार आहे. त्यांनी याठिकाणी रस्ता-रोको किंवा ठिय्या -धरणे आंदोलन सुरु केले आहे. या महिलांनी आंदोलनात फक्त राष्ट्रध्वज आणि राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेचे फलक लावलेले आहेत.

**नवी दिल्लीतील शहीन बागेत मुस्लिम महिलांचे सुरू असलेले आंदोलन.**






आहेत. नागरिकत्व दुरुस्ती कायदा बहुमताच्या जोरावर सरकारने संमत केला. ही घाई कशासाठी होती हे कळायला मार्ग नाही. ज्या कायद्याचे केवळ राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय परिणाम होण्याची शक्यता असूनही तो संमत करण्यात सरकारने अनाकलनीय अशी तातडी आणि घाई दाखवली त्याची प्रतिक्रिया होणे स्वाभाविक होते. कारण राज्यघटनेत अंतर्भूत मूलभूत तत्वांच्या विरोधात जाणारा हा कायदा आहे. राज्यघटनेत नागरिकत्वासाठी धर्म हा आधार मानलेला नाही आणि नागरिकत्वासाठी घटनेत विशिष्ट प्रक्रियेचा समावेश केलेला असताना वर्तमान सरकारने नागरिकत्वाच्या संदर्भात एक वेगळाच फाटा फोडण्याचा प्रकार केला. या प्रकारासाठी कोणताही तर्कसंगत युक्तिवाद सरकारतर्फे याचप्रमाणे अन्यत्र होणाऱ्या आंदोलनांची सुरुवात व शेवट राष्ट्रगीताने केला जातो. अत्यंत शांततापूर्ण मार्गाने हे आंदोलन सुरु आहे. नागरिकत्व दुरुस्ती कायदा हा मुस्लिमांबाबत भेदभाव करणारा आहे आणि धर्मावर आधारित नागरिकत्वाची तरतूद राज्यघटनेत नसताना त्या आधारे हा कायदा संमत करण्यात आलेला आहे व सरकारने या भेदभावाबाबत खुलासा करावा अशी या आंदोलनकारी मंडळींची मागणी आहे. त्याचप्रमाणे 'एनपीआर' आणि 'एनआरसी'ला या मंडळींचा विरोध आहे आणि सरकारने त्याबाबत फेरविचार करण्याचे त्यांचे आवाहन आहे. सरकारने खुलासा करण्याची मागणी चुकीची आहे असे मानता येणार नाही. तसेच सरकारतर्फे या आंदोलनकर्त्यांशी

संपर्क साधल्यास सरकारला कमीपणा मानण्याचेही कारण नाही. याठिकाणी युपीए म्हणजेच मनमोहनसिंग सरकारची आठवण झाल्याखेरीज रहात नाही. अण्णा हजारे यांनी आंदोलन सुरु केले व उपोषणही सुरु केले होते. त्यावेळी मनमोहनसिंग सरकारने त्यांचा जीव वाचविण्यासाठी व त्यांनी उपोषण सोडावे यासाठी संसदेत ठराव केला होता आणि त्यानंतर अण्णांनी उपोषण सोडले होते. अण्णांच्या आंदोलनात रा.स्व.संघाची सक्रिय भूमिका होती आणि किंबहुना श्रीश्री रविशंकर, संघ परिवार आणि स्पेक्ट्रम प्रकरणात ज्यांना परवाने मिळाले नव्हते त्या कंपन्या यांच्या संयुक्त प्रयत्नातून हे पुरस्कृत आंदोलन झाले होते असे सांगण्यात येते. हे आरोप असले तरी तत्कालीन सरकारने कमीपणा न मानता या आंदोलनाला प्रतिसाद दिला होता आणि सामोपचाराची भूमिका घेतली होती. बाबा रामदेव यांना तर खास विमानतळावर जाऊन चार केंद्रीय मंत्री भेटले होते व तेव्हाही त्यांनी सामोपचार व संवादाची भूमिका घेतली होती.

अण्णा आणि रामदेव यांनी त्यावेळी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत मोदी-शहा सरकारमध्ये किती महत्व मिळते आहे याबाबत त्यांनीच बोललेले अधिक संयुक्तिक ठरेल. येथे सांगण्याचा मुद्दा हा की सरकारने आंदोलनकर्त्यांशी संपर्क व संवाद साधणे हा कमीपणा नाही. सरकारने तो मोठेपणा दाखविण्याची आवश्यकता असते कारण सरकार हे सर्वशक्तिमान असते. युपीए सरकारचे उदाहरण देण्याचे कारण त्या घडामोडी ताज्या व लोकांच्या स्मरणातील आहेत. या पूर्वी देखील अनेक सरकारे व राज्यकर्त्यांनी आंदोलनकारी नेत्यांबरोबर आपण होऊन संपर्क साधून त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची दखल घेऊन त्यांचे निराकरण करण्याचे प्रयत्न केलेले होते. एवढेच नव्हे तर आणीबाणीच्या विरोधात मुरारजी देसाई यांनी उपोषण केले तेव्हा इंदिरा गांधी पंतप्रधान होत्या आणि त्यांनी मुरारजी यांची आपण होऊन भेट घेऊन उपोषण मागे घेण्याची विनंती केली होती. त्यामुळे भारतात ही परंपरा नवी नाही. राजीव गांधी यांनी पंजाब, आसाम आणि मिझो करार करुन तेथील हिंसक चळवळी बंद करण्यात यश मिळविले होते. अटलबिहारी वाजपेयी यांनी तर लाहोरला बसयात्रा करुन पाकिस्तानबरोबर चांगले संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला होता. या उदाहरणांचा संदर्भ एवढ्याचसाठी की दिल्लीत शहीनबाग येथे आंदोलन करणाऱ्या लोकांशी मोदी-शहा सरकारने संपर्क साधून त्यांची समजूत घालण्याने कोणताही कमीपणा येणार नाही. उलट सरकारची प्रतिमाच त्यामुळे उजळणार आहे. शहीनबाग येथील लोक पाकिस्तानी किंवा परकीय नाहीत. ते पक्के भारतीय आहेत. त्यांच्याशी बोलणी करण्यासाठी पुढाकार घेण्याने सरकारला कमीपणा येणार नाही.

प्रत्यक्षात काय घडते आहे हे सर्वांच्या समोर आहे. या आंदोलनाची जेवढी बदनामी करता येईल ती करण्याचे प्रकार सुरु आहेत. हे कोण करीत आहे ? साक्षात देशाचे पंतप्रधान, देशाचे गृहमंत्री यामध्ये आघाडीवर आहेत. बाकी त्यांचे अनुकरण करणारे झिलकरी मंत्री आणि अत्यंत खालच्या पातळीवर जाणारी



दिल्लीतील शहीनबाग येथे नागरिकत्व कायदा दुरुस्तीच्या विरोधात गेल्या एक महिन्यापासून आंदोलन व उपोषण चालू आहे.

अन्य भाजपनेते मंडळी आहेत. पंतप्रधानांनी हे आंदोलन म्हणजे उत्स्फुर्त किंवा संयोग नसून 'प्रयोग' असल्याचे उद्‌गार काढले. केंद्रीय गृहमंत्र्यांनी तर हे आंदोलन देशविरोधी असल्याचेच सूचित केले आहे. आता या पध्दतीने पंतप्रधान व गृहमंत्र्यांनीच छू केल्यानंतर त्यांच्याखालची मंडळी कोणत्या खालच्या थरापर्यंत जाऊ शकतात हे सर्वांनी अनुभवले आहेच. अर्थखात्याचे राज्यमंत्री अनुराग ठाकूर यांनी शहीनबाग आंदोलनकारी आणि देशद्रोही यांची तुलना करताना, 'देश के गद्दारों को' अशी घोषणा भाषणात देताच समोर उपस्थित भक्तांनी 'गोली मारों सालों को' अशी री ओढून ती घोषणा पूर्ण केली. दिल्लीचे भाजपचे एक खासदार व दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री कै.साहिबसिंग वर्मा यांचे चिरंजीव यांनी आणखी कडी करताना म्हटले, 'हे आंदोलनकारी ते लोक आहेत की उद्या ते तुमच्या घरात घुसून आई-बहिणी-मुलींवर बलात्कार करतील!' एवढी भयानक आणि अत्यंत खालच्या दर्ज्याची विधाने केल्यानंतर सरकारच्या पंखाखालच्या निवडणूक आयोगाने लाजेकाजेखातर या दोघांनी काही दिवसांसाठी प्रचारास बंदी केली. परंतु भाजपची पातळी किती खालावली आहे याचे आणखी एक उदाहरण म्हणजे ज्या प्रवेश वर्मा यांनी आंदोलनकर्त्यांविरुध्द गलिच्छ भाषा वापरली त्यांना भाजप नेतृत्वाने लोकसभेत राष्ट्रपति अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावाच्या चर्चेस सुरुवात करण्याचा मान दिला. त्या भाषणातही त्यांनी तारे तोडलेच. त्यांनी राजीव गांधी यांचा उल्लेख 'राजीव फिरोज खान' असा करुन आपली 'लायकी' दाखवली. भाजप व संघ परिवार स्वघोषित भारतीय संस्कृतीचे रक्षक असल्याचा दावा करतात. मृत्युनंतर वैर विसरायचे असते - मरणान्ति वैराणि, ही भारतीय संस्कृतीची शिकवण व्यक्तिगत व्देषाने पछाडलेले भाजपचे नेते विसरत चालले आहेत. याच मालिकेतले आणखी एक नेते म्हणजे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री आदित्यनाथ ! त्यांना 'योगी' का म्हणावे असा प्रश्न पडावा आणि त्यांची भाषा पाहिल्यानंतर ते कोणत्या दृष्टिकोनातून 'संन्यासी' आहेत हे देखील समजणे अवघड व्हावे. त्यांनी देखील शहीनबाग आंदोलनाच्या विरोधात गरळ ओकण्याचे काम चालू ठेवले आहे. 'बोली नही गोली' असे उद्‌गार त्यांनी काढले.

गोळीची एवढी भाषा झाल्यानंतर त्यावर प्रत्यक्ष कृति करण्यासाठी काही अंधभक्त पुढे येणे स्वाभाविकच होते. लागोपाठ तीनवेळेस शहीनबाग आंदोलनकारी कार्यकर्त्यांवर गोळ्या झाडण्यात आल्या. हे सर्व प्रकार घडत असताना दिल्ली पोलिस हजर होते. पहिल्या प्रकारात एक विद्यार्थी जखमी झाला. अन्य दोन प्रकारात सुदैवाने कुणी जखमी झाले नाही. परंतु प्रश्न हा निर्माण होतो की गोळीबार कशासाठी ? यामागे दिल्लीची विधानसभा निवडणूक हे एक तात्कालिक कारण सोडले तर आणखी कोणते कारण असावे असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. यासाठी एक उदाहरण देणे क्रमप्राप्त आहे. 2019च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी डिसेंबर 2018च्या सुरुवातीला उत्तर प्रदेशात बुलंदशहर येथे मुस्लिम समुदायाचे धार्मिक संमेलन 'इज्तिमा' झले होते. दरवर्षी हे होते व यामध्ये प्रामुख्याने शुध्द आचरण कसे राखावे यावर व्याख्याने, प्रवचने होत असतात. यासाठी अक्षरशः लाखो मुस्लिम जमत असतात. बुलंदशहर मध्ये हा मेळावा किंवा संमेलन झाले. तीन दिवसांच्या या संमेलनाच्या अखेरच्या दिवशी बुलंदशहराजवळच्या एका खेड्यात एका हिंदू शेतकऱ्याच्या शेतात मेलेल्या गायींचे अवशेष सापडल्याची माहिती वणव्यासारखी पसरली. तत्काळ स्वघोषित गोरक्षकांनी वातावरण तापविण्यास

**बुलंद शहरात इजतिमासाठी दहा लाख मुस्लिम लोक जमले होते.**



सुरुवात केली. गोरक्षकांच्या दुर्दैवाने स्थानिक पोलिस अधिकारी समतोल बुध्दीचा असल्याने त्याने गोरक्षकांना सबुरीचा सल्ला दिला. पण उन्मादी गोरक्षकांनी त्याच्यावरच हल्ला केला आणि त्यात त्या पोलिस अधिकाऱ्याची (तो हिंदू होता) हत्या करण्यात आली. (आज हे खुनी उजळमाथ्याने भाजपनेत्यांबरोबर हिंडत आहेत. हे तथाकथित संन्यासी योगी आदित्यनाथ यांचे सरकार आहे) यामुळे या प्रकरणाला वेगळेच वळण लागले. परंतु मागाहून जी माहिती मिळाली ती भयंकर होती. 'इज्तिमा' आटोपून परतणाऱ्या मुस्लिम लोकांवर दगडफेक करणे आणि गायींच्या अवशेषाचे प्रकरण पुढे करुन या मुस्लिमांवर हल्ले करायची योजना आखण्यात आली होती. दुर्दैवाने पोलिस अधिकाऱ्याची हत्या झाल्याने त्या प्रकरणास वेगळेच वळण लागून ही भयानक योजना प्रत्यक्षात येऊ शकली नाही. त्यासाठी त्या बिचाऱ्या पोलिस अधिकाऱ्याचा बळी जावा लागला. पण या निमित्ताने देशभरात हिंदू-मुस्लिम दंगे भडकविण्याची योजना होती अशी खात्रीशीर माहिती या प्रकरणात सांगण्यात येत होती. हे कशासाठी? लोकसभा निवडणुकीसाठी धार्मिक ध्रुवीकरण व्हावे यासाठी हा एक प्रयत्न होता अशी चर्चा त्या भागात होती.



वरील उदाहरणे पाहिल्यानंतर सीएए, एनपीआर, एनआरसी लागू करण्यासाठी मोदी-शहा राजवट एवढी उतावीळ का झाली आहे याचा अंदाज एव्हाना येऊ शकेल. हे नेते या देशाच्या समाजाचे पध्दतशीर विभाजन करण्याच्या मागे लागले आहेत. मुस्लिमांना जर देशातून सहजासहजी हुसकावून देता येत नसेल तर परिस्थिती अशी निर्माण करायची की एकतर त्यांनी देश सोडावा किंवा दुय्यम दर्जा स्वीकारुन बहुसंख्यकवादाच्या छायेत व दबावात मुकाट्याने रहावे. दुसरा कोणताही हेतु यामागे आढळत नाही. कारण नागरिकत्वाचाच मुद्दा असता तर त्यासाठी राज्यघटनेत तरतुदी आहेत. त्यासाठी वेगळा स्वतंत्र कायदा आणण्याची गरज नव्हती. थोडक्यात, बहुसंख्यकवादी वर्चस्व भाजप व संघपरिवारास प्रस्थापित करायचे आहे आणि त्यासाठी हा आटापिटा आहे. असे केल्यास सूर्य व चंद्र अस्तित्वात असेपर्यंत भाजपची सत्ता कायम टिकेल अशी या नेत्यांची समजूत आहे.

या प्रक्रियेत भारताच्या प्रतिमेची अपरिमित हानि झाली आहे. राष्ट्रीय पातळीवर जो असंतोष निर्माण व्हायचा तो झालेलाच आहे. परंतु आंतरराष्ट्रीय पातळीवरही भारताची प्रतिमा मलिन झाली आहे. त्याची खदखद पंतप्रधानांच्या मनात आणखी तीव्रतेने आहे. गेली सहा वर्षे त्यांनी जागतिक पातळीवर बड्याबड्या नेत्यांना मिठ्या मारुन, आलिंगने देऊन ते केवढे मोठे जागतिक नेते आहेत हे दाखविण्याचा जीव तोडून आटापिटा केला होता. परंतु जम्मू-काश्मीरचे विभाजन आणि नागरिकत्व दुरुस्ती कायदा तसेच प्रस्तावित एनआरसी यामुळे त्यांनी स्वतःची जी आंतरराष्ट्रीय प्रतिमा तयार करण्यासाठी एवढे कष्ट घेतले होते त्यावर पाणी पडले. बांगला देशाबरोबर ऐतिहासिक सीमाविषयक करार केल्यानंतर पंतप्रधानांनी त्यांचे मन खुले करताना, 'जगात अन्यत्र असा करार झाला असता तर त्या नेत्यांना नोबेल पुरस्कार मिळाला असता' असे म्हटले होते. पंतप्रधानांना ज्या अनेक गोष्टींचा हव्यास आहे त्यात नोबेल पुरस्काराचा देखील समावेश आहे. पण आता त्यांचा हा बेत धुळीस मिळाला आहे. युरोपीय राष्ट्रसमूह, अमेरिका, संयुक्त राष्ट्रसंघ या सर्वांनी जम्मू-काश्मीरचे विभाजन आणि नागरिकत्व दुरुस्ती कायदा या बाबी भारताच्या अंतर्गत बाबी असल्या तरी त्यातून होणाऱ्या संभाव्य मानवाधिकाराच्या उल्लंघनाच्या बाबीकडे दुर्लक्ष करता येणार नाही अशी स्पष्ट भूमिका घेतलेली आहे. विशेषतः जम्मू-काश्मीरमध्ये राजकीय नेत्यांना स्थानबध्द करणे आणि इंटरनेट व मोबाईलवर बंदी या मुद्यांवर भारताला संयुक्त राष्ट्रसंघासह आंतरराष्ट्रीय जगतात स्वतःची भूमिका मांडण्यात यश आले नाही व बचावाचा पवित्रा घ्यावा लागला. नागरिकत्व दुरुस्ती कायदा आणि एनआरसी यामुळे 'विस्थापित' किंवा 'स्टेटलेस पीपल' म्हणजेच कोणत्याही देशाचे नागरिकत्व नसलेले लोक निर्माण झाल्यास संयुक्त राष्ट्रसंघाने हस्तक्षेपाचा इशाराच दिलेला आहे. यामुळे पंतप्रधानांच्या 'नोबेल स्वप्ना'चा चक्काचूर झालाच परंतु सर्व जगात भारताच्या प्रतिमेला धक्का पोहोचला. आतापर्यंत जगभरात भारतीय लोकशाही व विशेषतः एक उदारमतवादी व सहिष्णु लोकशाही व्यवस्था म्हणून भारताचे सर्वत्र आदराचे स्थान होते. ते स्थान मोदी-शहा राजवटीने नष्ट केले.

नागरिकत्व दुरुस्ती कायदा किंवा प्रस्तावित एनआरसी यामुळे भारताच्या प्रतिमेचे हनन झालेच आहे परंतु भारताची विविधतेत एकता म्हणून असलेली शक्ति व सामर्थ्य नष्ट होणार आहे. अत्यंत संकुचित अशा विचाराने प्रेरित विलक्षण छोट्या मनाच्या राज्यकर्त्यांनी हा आगीशी खेळ मांडला आहे. भेदभावाची ही नीती देशाला लक्ष योजने मागे घेऊन जाणारी ठरेल!

■■

# फेसबुकपेक्षा पुस्तक वाचनासाठी रोज फक्त दोन तास द्या

## अमोल मिटकरी यांचे आवाहन

गेली 12 वर्षे वक्ता म्हणून मला आदर मिळत आहे. मघाशी खटिंग सरांनी सांगितल्याप्रमाणे मी वक्ता म्हणून कधी कोणत्याही स्पर्धेत भाग घेतला नाही. मला कधी कोणी माईक हाती दिलाच नाही. कोणी संधी दिलीच नाही. पण, मी संधी शोधत होतो. गावातील गणपती मंडळात प्रथम माईक हाती घेतला, हा माझ्या वक्तृत्वाच्या प्रवासातील पहिला टप्पा! मला माईकचा छंद आहे. कधी अकोटच्या बस स्टँडवर गेलो. तिथे अनाऊन्सर नसला तर मी माईक हातात घेऊन अनाऊन्सिंग करायचो. थोडक्यात, गावपातळीवर सुरुवात करून आज इथपर्यंत आलो की, आज आपण मला इथे सन्मानाने वक्ता म्हणून बोलावले.

या स्पर्धेत या ठिकाणी यापूर्वी महाराष्ट्राचे तत्कालीन गृह मंत्री आर. आर. आबा येऊन गेले, मुंडे साहेब येऊन गेले, सुप्रियाताई येऊन गेल्या. जे इथे येऊन गेले ते महाराष्ट्रात चमकलेच. माझ्यापूर्वी खटिंग सरांनी या ठिकाणी मूल्यांकनाचा विषय केला. पण सर, सध्याचे युग असे आहे, 105 मार्क्स पडले तरी तो मागच्या बेंचवर असतो व 54 मार्क्स मिळवणारा मेरिटमध्ये येतो आणि ही जादू फक्त शरद पवार साहेबच करू शकतात, हे

### मराठवाडा युवा वक्ता वक्तृत्व स्पर्धा



**राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष व ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त गेल्या ९ वर्षांपासून मराठवाड्यात आमदार सतिश चव्हाण यांच्या पुढाकाराने 'भानुदासराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे' मराठवाड्यातील युवा वक्ता, ही वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली जाते. यंदा ही स्पर्धा २५ जानेवारी रोजी औरंगाबाद येथील देवगिरी महाविद्यालयामध्ये संपन्न झाली. या स्पर्धेची पारितोषिके राष्ट्रवादीचे नेते अमोल मिटकरी यांच्या शुभहस्ते विजेत्यांना प्रदान करण्यात आली. त्या प्रसंगी मिटकरी यांनी केलेले हे भाषण.**

तुम्हाला माहितीच आहे.

उत्स्फूर्त विषयाच्या बाबतीत बोलायचे झाल्यास वक्तृत्व स्पर्धेचा माझा संबंध नसायचा. पण, निबंध स्पर्धेत माझा पहिला नंबर असायचा. वक्तृत्व ही एक कला आहे. संस्कृतमध्ये एक सुभाषित आहे. 'शतेशु जयते शूरा। सहस्रेषुच पंडित:। वक्ता दशसहस्रेषु। दाता भवति वानवा॥' वक्तृत्व हे नेतृत्व असते. ज्या माणसाकडे वक्तृत्व असते, त्या माणसाच्या हाती सत्ता येते. बोलणारा मग लबाड असला तरी येते. अटलजींकडे वक्तृत्व होते म्हणून नेतृत्व आले. फार किचकट भाषणे लोकांच्या लक्षात राहात नाहीत. वक्तृत्व कलेत तुम्ही आलात, तुमचा त्या मागचा उद्देश काय? अर्थार्जन करायचे आहे की, समाज दुरुस्त करायचा आहे. अर्थार्जनासाठी बारा महिने वक्त्यांचा व्यापार आहे. एका महिन्यात 12 व्याख्याने झाली तरी प्राध्यापकापेक्षा चांगला पगार मिळू शकतो. पण, तुमचा उद्देश काय? केवळ पैसा



मिळवणे हा आहे का? समाज दुरुस्ती हासुद्धा व्याख्यानाचा वेगळा पैलू आहे.

भाषणामध्ये तुमच्या विनोद असावा, संतविचार असावेत, शेरोशायरी असावी, चुटकुले असावेत, मिमिक्री असावी. हे सर्व असेल तर, तुमचे दोन तास भाषण झाले तरी लोक कंटाळत नाहीत, हा माझा अनुभव आहे. तुम्हाला जर समाज दुरुस्त करायचा असेल, समाजातले काय दुरुस्त करायचे? तर, अंधश्रद्धा, वाईट चालिरीती, खुळचट परंपरा. हे जर दुरुस्त करायचे असेल तर, लोकांच्या हृदयाचा ठाव घेण्यासाठी तुम्हाला पुस्तकी भाषेच्या पलिकडची भाषाही बोलावी लागेल. तुम्हाला शहरी भागात कोणी बोलावत नाही. तुमची नाळ ग्रामीण भागाशीच जोडली गेली पाहिजे. वक्त्यामध्ये आत्मविश्वास असणे आवश्यक आहे आणि तो आत्मविश्वास अभ्यासानेच येत असतो. म्हणून, 18-18 तास फेसबुकला देण्यापेक्षा त्यातले निवडक फक्त दोन तास वाचनाला दिले पाहिजे. वाचनाने ज्ञानाची धार वाढत असते. वक्ता हा चांगला श्रोता असला पाहिजे व चांगला वाचकही असला पाहिजे.

वक्त्याचा प्रभाव कधी पडतो? वक्ता व्यसनमुक्तीवर बोलणार असेल तर, तो निर्व्यसनी असला पाहिजे. तुमच्या वक्तृत्वाला चारित्र्याचीही जोड असायला हवी. असे असेल तर, वक्तृत्वाला बाजारात चांगले दिवस आहेत. वक्त्याला अहंकार असू नये. नाहीतर, त्याचा देवेन्द्र फडणवीस होतो. म्हणून, माझी आपणा सर्वांना विनंती आहे की, आपल्या वक्तृत्व कलेचा वापर भारत सेक्युलर राष्ट्र राहील, यासाठी सदैव करा. तर तुम्ही स्वत:ला वक्ता म्हणून घ्या. महाअंतिम स्पधेत जे पात्र ठरले, त्या स्पर्धकांचे अभिनंदन! ज्यांचा नंबर आला नाही, त्यांनी आत्मविश्वास ढळू देऊ नका.

**प्रथम क्रमांक मिळवून शेख इरफान (मौलाना आझाद महाविद्यालय, औरंगाबाद) यावर्षीचा 'मराठवाड्याचा युवावक्ता' ठरला आहे, द्वितीय क्रमांक कृष्णा तिडके (नारायणराव चव्हाण विधी महाविद्यालय, नांदेड) यांना तर तृतीय क्रमांक दिक्षा सावंत (बलभीम महाविद्यालय, बीड ) हिने पटकाविला आहे. त्यांना अमोल मिटकरी, आ. सतीश चव्हाण यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. त्यावेळी शेजारी स्पर्धेचे संयोजक रामेश्वर कदम, स्पर्धेचे परीक्षक डॉ. सुधीर भोंगळे, केशव खटिंग व डॉ. निर्मला जाधव.**



# उद्याचा नवीन नरहर कुरुंदकर तुम्हा युवकांमधून निर्माण व्हावा



## डॉ. सुधीर भोंगळे यांचे विचार

या वर्षीचा मराठवाड्याचा युवावक्ता कोण होणार याचा निकाल ऐकण्यासाठी आपण व्याकूळ झालेले आहात, हे मला माहिती आहे. एखाद्या गोष्टीचा ध्यास लागला की, तो मनामध्ये मुरतो, या मुरण्याची तीव्रतम धारणा जेव्हा शिगेला पोहोचते तेव्हा तिला 'व्याकूळ' असे म्हणतात. व्याकूळता ही केवळ तळमळण्यात किंवा तडफडण्यात नसते. चांगल्या ध्यासाची आंतरिक घनओढ म्हणजे व्याकूळता होय. कुठल्याही नव्या आसाच्या आभाळाला विशालतेचे अंगण देणे हे व्याकूळतेत येते. यासाठी आधी संवेदना असावी लागते. ती संवेदना थिल्लर बनता कामा नये. संवेदनाला मनाचे संतुलन प्राप्त झाले की, व्याकूळता निर्माण होते. सूरतासाठीचा ध्यास निर्माण होतो. व्याकूळतेतूनच तो वाढीला लागतो. नाहीतर, आपण असे बघतो की, संध्याकाळी 6 वाजले की, पिणारा व्याकूळ असतो आणि भक्तही ईश्वरासाठी व्याकूळ असतो. या दोघांच्याही व्याकूळतेत फरक आहे. ज्यांना अनुभव आहे, त्यांना हे काय आहे, हे लवकर कळते.

कळीचं फुलात सहज होणे, हा व्याकूळतेचा उत्सव आहे. वेदना आशीर्वाद होणे, हीही व्याकूळता आहे. वेदनेचा प्राणांतिक थकवा देणारी सगुण व्याकूळता म्हणजे आई! म्हणून तिला आजन्म जपायचे असते, आजन्म पुजायचे असते. वृत्तीच्या प्रसन्नतेतून ते वाटायचे असते. व्याकूळतेची इतकी सुंदर प्रतिमा निदान मराठीत तरी दुसरी नाही.



व्याकूळता नि:स्वार्थपणाहून अधिक नितळ असते. संतांची व्याकूळता ही नुसती देवभेटीपुरती मर्यादित नव्हती. त्यात आत्मप्रकाशाच्या जाणिवेचा भाग होता. सृजनाच्या मुळाशी व्याकूळता आहे म्हणून निसर्ग सुंदर आहे. मनाला पहाडाचे सुंदर टोक निर्माण करून अनंताशी मैत्री करायला लावते ती व्याकूळता! उत्कट ओढीच्या अथांगतेला शब्द मौनावतात व अनिवार इंद्रधनुष्य अनुभवास येतात ती व्याकूळता, ती मी समजू शकतो. ती निकालासाठी तुमची व्याकूळता आहे.

पण, मला आणखी एका विषयाचा उल्लेख करायचा आहे, तो विषय आहे वाढदिवस! माननीय पवार साहेबांच्या वाढदिवसानिमित्त ही वक्तृत्व स्पर्धा आहे आणि ज्यांनी ही स्पर्धा आयोजित केलेली आहे, त्या सतीश चव्हाण यांचा 58 वा वाढदिवस आहे. तो उद्या(26 जानेवारी) असला तरी आपण तो आजच साजरा करणार आहोत. म्हणून, मी त्याचा उल्लेख मुद्दाम केला. या वर्षात मी काय चांगले केले व काय वाईट केले, याचा चिंतनशील

जमाखर्च मांडण्याचा दिवस म्हणजे वाढदिवस! वाढदिवस केवळ जन्माच्या तारखांनी मोजायचा नसतो, तर वाढदिवसाच्या दिवशी प्रकाशाने ओवाळून आशिर्वाद देतात 'जिवेत शरद: शतम्।' याचा अर्थ समाजकार्यासाठी शतायू होवो. पवार साहेबांना व सतिश चव्हाण साहेबांना आमच्या सर्वांच्या वतीने हा आशिर्वाद आहे. वाढदिवसाला पुराणकाळापासून औक्षण आलं. तुम्हा सगळ्यांना आई वाढदिवसाच्या दिवशी ओवाळत असेल. त्याला निरांजनाने ओवाळतात. याचा अर्थ काय? तर, तू स्वयंप्रकाशी हो. कुठल्याही अभद्र कर्तृत्वाचे छिद्र पडायला नको. म्हणून, आपल्या डोक्यावर अक्षता टाकल्या जातात. कपाळी कुंकू हे सर्व मांगल्याचे प्रतीक आहे. कापसाच्या धाग्यासारखा अखंड वाढत राहा. कापूस आणि कर्तृत्वाला सोन्याचा सुगंध लाभो, म्हणून, सोन्याच्या अंगठीने ओवाळायचे व ती अंगठी कपाळाला लावायची.

आजकाल केक कापतात व मेणबत्त्या विझवतात. केक कापा पण, नमस्कार करायला शिकवा. मेणबत्त्या लावा पण, त्या विझवू नका. आपण सारे प्रकाशगामी आहोत. सूर्योपासक आहोत, अज्ञानाचा अंध:कार नाहिसा करून ज्ञानाचा नवा प्रकाश निर्माण करणारे आहोत. कर्तृत्वाच्या समाधानाचे दव, म्हणजे वाढदिवस होय. आयुष्याचा देठ सांभाळणारा मोरपिसी शामियाना म्हणजे वाढदिवस! जो आपणा सगळ्यांना मनापासून साजरा करायचा आहे.

आता शेवटच्या गोष्टीबद्दल बोलणार आहे, म्हणजे ज्यांना पारितोषिके मिळाली व ज्यांनी स्पर्धेमध्ये भाग घेतला, त्या सर्वांचे मी मनापासून, संस्थेच्या वतीने अभिनंदन करणार आहे. अभिनंदन म्हणजे, कोणतीही चांगली गोष्ट झाली की, आपण त्याचे अभिनंदन करतो. अभिनंदन करायला मन मोठे लागते. ज्याचे अभिनंदन करायचे, तो आवडावा लागतो. आवडत्या गोष्टीला उभारी देण्याचा उद्‌गार म्हणजे अभिनंदन! जे आपल्याला जमले नाही, ते त्याने करून दाखवले, म्हणून जो उत्स्फूर्त उद्‌गार बाहेर पडतो, तो अभिनंदन हाच असतो. अभिनंदनात मनामनांचा खुला संवाद असतो. कर्तृत्वाला मनापासून दाद देण्याची मानस तयारी असते. अभिनंदनाने मनाची उदारता वाढते. आपापसातील स्नेह घट्ट होतो. जगण्यातल्या नवनवीन गोष्टी सहज जवळ करता येतात. संवादातला भाव हा उपदेशात येतो. ही भाग्याची गोष्ट लाभणे हे अभिनंदनात आहे आणि अभिनंदनामुळे तुम्ही आकाशाएवढे होता. म्हणून, ज्यांनी पारितोषिक मिळवली, त्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो.




डॉ. सुधीर भोंगळे हे दीपप्रज्वलनाने स्पर्धेचे उद्‌घाटन करताना, शेजारी उपप्राचार्य डॉ. अनिल आर्दड, प्राचार्य डॉ. शिवाजीराव थोरे, उपप्राचार्य डॉ. दिलीप खैरनार

परीक्षक या नात्याने दोन गोष्टींचा उल्लेख करायचा आहे. उत्स्फूर्त विषयामध्ये आम्ही तीनही परीक्षकांचे मत असे आहे, की स्पर्धकांची तयारी म्हणावी तितकी चांगली नव्हती. तीन मिनिटांची चिठ्ठी आल्यानंतर तुम्हाला तयारीसाठी वेळ होता.

जर तुमची उत्स्फूर्त विषयाची तयारी म्हणजे ऐन वेळी कोणताही विषय मिळाला व तुमचा अभ्यास असेल, त्याला चिंतन, मननाची जोड असेल, तर, कोणत्याही विषयावर तीन मिनिटांत व्यवस्थित व मुद्देसूदपणे बोलणे, कमीतकमी शब्दांत आशयघन बोलणे, हे सहज शक्य आहे. मुलांची त्यादृष्टीने तयारी नव्हती. माझी सर्व विद्यार्थ्यांना विनंती आहे की, तुम्ही अधिक वाचन करा. अभ्यास करा. समर्थ रामदासांनी लिहून ठेवले आहे–

**‘अभ्यासोनी प्रकट व्हावे, नाहीतर झाकोनी असावे।**
**प्रकट होवोनी नासावे, हे बरे नव्हे।’**

तेव्हा जे बोलायचे ते विचार करून बोला.

दुसरा एक शेवटचा मुद्दा सांगून मी थांबणार आहे. विषय देऊन जी मुले बोलली, ती फार सुरेख बोलली. विषयाची तयारी त्यांची अधिक चांगली झाली होती. उत्तम पद्धतीने त्यांनी आपला विषय मांडला आहे. मराठवाडा ही संतांची भूमी आहे, विचारवंतांची भूमी आहे. नरहर कुरुंदकरांसारखा फार मोठा विचारवंत या भूमीने अख्ख्या देशाला दिला आहे. नरहर कुरुंदकरांनी स्पर्श केला नसेल, असा एकही विषय नसेल. माझी तुम्हा सर्व विद्यार्थ्यांना विनंती आहे. कुरुंदकरांचे साहित्य तुम्ही सगळ्यांनी वाचले पाहिजे. जपले पाहिजे. त्यांच्या इतका मोठा वैचारिक साहित्यिक महाराष्ट्रात जन्माला आला नाही. हे या भूमीचे भाग्य आहे. ते तुम्ही जपा व उद्याचा नवीन नरहर कुरुंदकर तुमच्यातून निर्माण व्हावा, एवढीच परमेश्वर चरणी प्रार्थना करतो.




स्पर्धेच्या परीक्षक डॉ. निर्मला जाधव यांचे सन्मानचिन्ह व पुस्तक देऊन सत्कार करताना आमदार सतीश चव्हाण, शेजारी डॉ. सुधीर भोंगळे

## स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. सुधीर भोंगळे यांनी केलेले भाषण

मराठवाडा युवा वक्ता वक्तृत्व स्पर्धेचे यंदा नववे वर्ष आहे. मा. शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार सतीश चव्हाण हे पुढाकार घेऊन भानुदास चव्हाण प्रतिष्ठानमार्फत दरवर्षी स्पर्धेचे आयोजन करीत असतात. स्पर्धेच्या सुरुवातीला मी सर्व स्पर्धकांना मनापासून शुभेच्छा देतो. स्पर्धा जिंकण्यासाठी अभ्यास, उपासना, सराव, वाचन करण्याची गरज आहे. उपासना हे मानवी जीवनाचे अंगभूत तत्त्व आहे. तुमच्या जगण्याचा नि उपासनेचा साक्षात संबंध आहे. म्हणजे माझ्या जगण्यातली उत्कटता नि भव्यता ज्या रुपातून व्यक्त होते ती माझी उपासना असते. उप म्हणजे जवळ नि आसन म्हणजे धारणा. माझ्या अर्थगर्भ जाणिवांना ज्यामुळे आकार लाभतो ती उपासना असते.

उपासना अभ्यासाशी निगडित आहे. अभ्यास मनात एकदम येत नाही. त्यासाठी ध्यान करावे लागते. ध्यानातून मनोधारणा पक्की करायची. भक्कम आसन द्यायचे. त्यातून नवा माणूस घडतो. नव्या काळाचे चांगले भान येते म्हणून उपासनेतून होणारा अभ्यास माणसाला नवे बनवतो.

वक्ता म्हणून ज्यांना आपले व्यक्तिमत्त्व घडवायचे आहे. त्यांची जिज्ञासा सतत जागृत व जिवंत असली पाहिजे. प्रत्येक गोष्टीचे ज्ञान व माहिती आपल्याला मिळालीचपाहिजे. या जिज्ञासेने जो उभा राहतो तो कोणत्याही विषयावर केव्हाही बोलू शकतो. जिज्ञासा हा मानवाचा न मावणारा अवकाश आहे. कधीही न संपणारी ती तितिक्षायुक्त वाटचाल आहे. जिज्ञासेत कुतूहल आहे. आपल्यात ते निर्माण झाले पाहिजे. पण ते तात्पुरते व वरवरचे असता कामा नये. त्याला अभ्यासपूर्ण खोली पाहिजे. आजन्म चिंतनात राहून समाजाला अमरत्वाचा नवा प्रकाश देण्याची जी शक्ती आहे, तिला जिज्ञासा म्हणतात. जाणण्याची इच्छा जशी जिज्ञासेत आहे, तशी इच्छेच्या निरीक्षणाची व्यापकताही आहे. कुतूहलाचे मनःपूत चिंतन म्हणजे जिज्ञासा. उत्सुकतेला व्यापक परिमाण देणे म्हणजे जिज्ञासा. म्हणून उपनिषदातली पहिली आज्ञा आहे, ‘अथा तो ब्रह्मजिज्ञासा.’

जाणून घ्यायची मनापासून तयारी असेल तर कोणताही विषय अवघड नाही. मनातली जिज्ञासा एकदा जागृत झाली की माणूस अभ्यासात रमतो. हा अभ्यास आयुष्यभर अखंडपणे करायचा असतो. जे असा अभ्यास करतात तेचकाळाच्या ओघात नुसतेच वक्ते नव्हे तर समाजाला दिशादिग्दर्शन करणारे विचारवंत ठरतात. आपणही त्या दिशेने वाटचाल करावी एवढी नम्र सूचना करून स्पर्धेचे उद्घाटन झाले असे जाहीर करतो.

■■

# मराठी राजभाषा होण्यासाठी नकारात्मक दृष्टिकोन न ठेवता स्वागत करा

## हेमंत टकले यांचे विचार



मुंबई – छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यात मराठी भाषा अधिकाधिक वापरात असावी, ती ज्ञानभाषा... व्यवहार... विज्ञान...आणि संस्कृतीची भाषा व्हावी यासाठी राज्य सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे आपण सर्वांनी या निर्णयाकडे नकारात्मक दृष्टी न ठेवता त्याचे स्वागत केले पाहिजे, असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे कोषाध्यक्ष आमदार हेमंत टकले यांनी व्यक्त केले आहे. मराठी भाषा सर्व शाळांमध्ये अनिवार्य करण्याबाबत महाराष्ट्र विकास आघाडी सरकार पुढील अर्थसंकल्पात ठोस निर्णय घेणार असल्याचे आमदार हेमंत टकले म्हणाले.

मराठी भाषेच्या माध्यमातून स्वत:चे जीवन समृद्ध करण्याची जबाबदारी ही सर्वांची आहे. जेणेकरून अनेक विषयांना चालना मिळेल व आपण परिवर्तनाकडे निश्चित जाऊ, असा विश्वास आमदार हेमंत टकले यांनी व्यक्त केला.

राज्य सरकार रंगभवन येथे मराठी भाषा भवन उभारणार आहे शिवाय मंत्रालयामध्ये मराठी भाषेसाठी पूर्णपणे काम करणारा विभाग उभारणार आहे. ही मराठी भाषेसाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट आहे.त्यामुळे सर्वांनी आपापल्यापरीने मराठी भाषेसाठी योगदान द्यावे असे आवाहनही आमदार हेमंत टकले यांनी केले आहे.

१९६० साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांनी पहिले मुख्यमंत्री म्हणून राज्याच्या विकासाचा... सांस्कृतिक... सामाजिक जडणघडणीचा पाया रचला होता. तेव्हापासून मराठी भाषेला राज्य भाषेचा दर्जा मिळाला. परंतु आज ६० वर्षांनंतरही इतर भाषांचा प्रभाव आपल्या राज्यातील व्यवहाराच्या सर्व पातळीवर आणि शिक्षणाच्या सर्व स्तरांवर अधिक जाणवतो असल्याची खंतही आमदार हेमंत टकले यांनी व्यक्त केली.

स्पर्धेच्या युगामध्ये इंग्रजीशिवाय पर्याय नाही. पण आज जगभरातले तज्ज्ञ सांगतात की, मातृभाषेमध्ये शिक्षण देणे हे विद्यार्थ्यांच्या आकलनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचं आहे. त्यामुळे मातृभाषा मराठी, राज्यभाषा मराठी आणि मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी प्रयत्न चालू असताना मराठी भाषा शाळांमध्ये सक्तीचे करणे गांभीर्याने घ्यायला हवे असेही आमदार हेमंत टकले म्हणाले.

सध्या राज्यात मराठी शाळा बंद पडत असल्याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. भाषा ही अशी गोष्ट आहे की, जी तुम्ही वापरली नाही तर त्याला गंज चढणारच. भाषा वापरात राहिली पाहिजे. विद्यार्थ्यांपासून व्यवहार, विज्ञान, नोकरी, राज्य कारभार यामध्ये आली तरच भाषा टिकते. त्यामुळे भाषा सक्ती करणे हा शब्दप्रयोग अयोग्य आहे. कारण, आपल्या राज्यात इतर राज्यातील मातृभाषा बोलणारे येत असतात. इतर राज्यांमध्ये त्यांची मातृभाषा सक्तीची असली तरी आपल्या राज्यात



आवश्यक म्हणून मराठी भाषेला प्राधान्य दिलं पाहिजे आणि तेच योग्य असेल असेही आमदार हेमंत टकले यांनी सांगितले.

आज सगळे विषय आपल्याला मराठीमध्ये शिकता येऊ शकतात. मात्र, विज्ञान, तंत्रज्ञान अशा विषयांमध्ये इतर भाषेचा वापर लक्षात घेता पुढील पिढीसाठी मराठी संस्कृती, भाषा लयाला जाण्याची शक्यता आहे. यासाठी मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी २७ फेब्रुवारी या कविवर्य कुसुमाग्रजांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून राज्य सरकार मराठी भाषा दिन साजरा करणार आहे अशी माहितीही आमदार हेमंत टकले यांनी दिली. महाराष्ट्र विकास आघाडीचं सरकार मराठी भाषेसाठी ठोस पावले उचलत आहे, हे निश्चितच स्वागतार्ह आहे. केवळ दुकानांच्या पाट्या मराठीत करून, मुलांना मराठी माध्यमाच्या शाळेत घालून मराठी भाषा संवर्धन होणार नाही. लोकांची मानसिकता बदलण्यासाठी जनसंपर्काच्या माध्यमातून अधिकाधिक कार्यक्रम राबवून भाषेची प्रगती साधावी लागेल असे मतही आमदार हेमंत टकले यांनी मांडले आहे.

■■






# मोदींनी हेगडेंचा राजीनामा घ्यावा

(पान ४ वरून)

चालते व्हा!' असा संदेश दिला होता किंबहुना स्वातंत्र्य लढ्याची ती सुरुवात होती. याची आठवण म्हणून भव्य असे घुमटाकार दांडी कुटीर उभे केले आहे. त्यात महात्माजींच्या जीवनातील सर्व महत्त्वाचे प्रसंग दाखविणारे प्रदर्शन उभे केले आहे. अहमदाबादेतील साबरमती आश्रमातही महात्मा गांधींनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी जो संघर्ष केला व हालअपेष्टा सोसल्या त्याची छायाचित्रे लावलेली आहेत. गांधीजींच्या जीवनावरची अशी प्रदर्शने व छायाचित्रे आपल्याला भारतातील अनेक महत्त्वाच्या शहरांमध्ये उदा. नवी दिल्ली, पुणे, जळगाव, वर्धा-सेवाग्राम, मुंबई, अहमदाबाद, राजकोट, मद्रास, हैदराबाद वगैरे. पहायला मिळतात. हेगडे यांची मुक्ताफळे जर मोदी यांना खरी वाटणारी असतील तर मग ही छायाचित्रे, प्रदर्शने खोटी आहेत असे म्हणण्याचे धाडस पंतप्रधान मोदी दाखविणार आहेत का?

महात्मा गांधींना आपण आधुनिक भारताचे राष्ट्रपिता म्हणून ओळखतो. हे राष्ट्रपितेपण गांधीजींना स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेस पक्षाचे राज्य दीर्घकाळ भारतावर टिकले म्हणून मिळालेले नाही. भारतीय जनतेच्या, विशेषतः ग्रामीण जनतेच्या मनात हे स्थान स्वातंत्र्यपूर्वकाळीच निर्माण झालेले होते. पंडित नेहरूंनी एकदा परदेशी वार्ताहरांची चेष्टा करताना म्हटले होते की, 'हे वार्ताहर सदैव या देशात गांधीजींची लोकप्रियता कमी होते आहे की वाढते आहे, याच्या चिंतेत असतात. शहर भागातील सुशिक्षितांशी चर्चा करून गांधीजींची लोकप्रियता वाढते आहे की कमी होते आहे, याविषयी अंदाज बांधणे नेहमीच उथळपणाचे ठरणार आहे. मूठभर सुशिक्षितांना काहाही वाटो, गांधीजींचे सामर्थ्य सर्वसामान्य जनतेवर त्यांचा जो प्रभाव आहे, त्यावर अवलंबून असून सुशिक्षितांच्या बौद्धिक चर्चांवर हे नेतृत्व उभे नाही.''

कोणत्याही देशाचा स्वातंत्र्याचा लढा यशस्वी होण्यापूर्वीचा म्हणजे स्वातंत्र्यपूर्व कालखंड वैशिष्ट्यपूर्ण असतो. या कालखंडात राष्ट्रीय नेतृत्व घडताना भारतीयांच्या मनात गांधीजींनी जे स्थान मिळविले, त्या स्थानावर आधुनिक भारतातील त्यांचे राष्ट्रपितेपण अवलंबून आहे. संपूर्ण जगाने म. गांधींचे नेतृत्व व विचार मान्य केले. म्हणूनच जगातील दोनशेहून अधिक देशांमध्ये त्यांचे स्मारक व पुतळे उभे राहिले आहेत. हेगडे यांचा पुतळा त्यांच्यानंतर त्यांच्या गावात व बंगळुरूमध्ये जरी उभा राहिला तरी पुष्कळ! तेव्हा आपली लायकी पाहून विधाने करा या शब्दात मोदींनी त्यांना समजावलेलं बरं!

# दीडशेव्या शताब्दीतच विचारांना हरताळ

(पान ५ वरून)

त्यामुळे तो सर्व धर्मांसोबत सलोख्याने, शांततेने राहू शकतो.''

मग आज धर्माच्या आधारावर राज्यघटनेत निरनिराळ्या दुरूस्त्या करुन केंद्र सरकार देशात अशांतता व अस्वस्थता का निर्माण करीत आहे? भारत हा देश कधीही निव्वळ हिंदूंचा नव्हताच. शेकडो वर्षे या भूमीवर मुस्लिमांनी राज्य केले आहे हा इतिहास तर खोटा नाही ना? छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यातील अनेक महत्त्वाच्या पदांवर मुस्लिम मावळे होतेच ना? भारताच्या स्वातंत्र्य लढ्यासाठी ज्या अनेकांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले व हौतात्म्य पत्करले आणि ब्रिटिशांविरुद्ध प्राणपणाने जे लढले त्यात मुस्लिम नव्हते का? अनेक मुस्लिम नेत्यांनी भारताच्या फाळणीला आणि पाकिस्तानच्या निर्मितीला विरोध केला ही खरी वस्तुस्थिती आहे की नाही? मग असे असताना जे हिंदुत्ववादी, जनसंघीय आणि आजचे भाजपवाले जे कधीही स्वातंत्र्यलढ्यात सहभागी नव्हते त्यांनी 'हा देश निव्वळ हिंदूंचा आहे' असे म्हणण्यात काय हशील आहे. हा देश सर्वधर्मिय लोकांचा आहे. हिंदू इतकाच अधिकार भारतीय राज्यघटनेने मुस्लिम, ख्रिश्चन, पारशी, ईसाई, जैन, बौद्ध व इतर सर्व धर्मियांना दिलेला आहे. अशा वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुढाकार घेऊन बनविलेली भारतीय राज्यघटनेची मोडतोड केंद्र सरकार का करायला निघाले आहे? माणसांच्या रोजच्या जीवन मरणाशी संबंधित असलेले अनेक प्रश्न देशापुढे आज आ वासून उभे असताना (उदा. आर्थिक मंदी, बेरोजगारी, उपासमार, शेतकरी आत्महत्या, उद्योगांना टाळे, दुष्काळ-पूर-अतिवृष्टी-भूकंप यांसारखी नैसर्गिक संकटे वगैरे) त्या प्रश्नांची सोडवणूक प्रभावीपणे करण्यासाठी समर्थपणे उभे राहण्याऐवजी मुस्लिम धर्मियांच्या विरुद्ध उभे राहण्यात काय शहाणपण आहे? मोदी-शहा या जोडीने अजूनही याचा शांतपणे विचार करावा. जनतेने तुमच्या हाती सत्ता दिली ती लोकांच्या कल्याणासाठी व राष्ट्राच्या उन्नतीसाठी, ते काम करायचे सोडून फालतू धंदे कशाकरिता करता आहात? हा देश तुमच्या जेवढ्या बापाचा आहे तेवढाच आमच्याही बापाचा आहे असे येथे जन्मलेल्या व लहानाचे मोठे झालेल्या प्रत्येक मुस्लिम माणसाने म्हटले तर त्यात त्याची काय चूक आहे? भारतावर प्रेम करणाऱ्या व निष्ठा असणाऱ्या प्रत्येक मुस्लिम माणसाचा भारतावर हिंदूंइतकाच अधिकार आहे हे सत्य कोणालाही नाकारता येणार नाही!

*Best Compliments*

## शेवटचे पान



# नवी रात्र मुंबईची

साधारणपणे १९५०-१९६० च्या दरम्यान प्रसिध्द हिंदी चित्रपट सृष्टीतला मोठा गुणी नायक राजकपूर ह्याचा जागते रहो हा सिनेमा आला होता. मध्यरात्री नंतरची मुंबई कशी जागते ह्याच एक विलक्षण चित्रण करण्यात आल होत. चांगल्या वाईटाची बेमालूम मिसळ कशी होत जाते आणि तरीही ह्या शहरातला प्रत्येक नागरिक कसातरी संघर्ष करीतच असतो. आज जवळ जवळ ६० वर्षाच्यावर काळ पुढे गेला, कदाचित चेहरे बदलले असतील, घोडागाड्या, ट्रॅमच्या जागी नव्या वाहतूक साधनांची दादागिरी सुरु झालेली असेल. पण बाहेरुन आलेल्याला सामावून घेण्याची मुंबईची ताकद काही कमी होत नाही. इथे अनेकांचा दिवस अजूनही रात्रीच सुरु होतो आणि हे काही केवळ मौजमजेसाठी नाही तर हाताला काम मिळण्यासाठी सुध्दा गरजेचे असते. म्हणजे बघा ना मुंबईच्या चौपाटीवर कुणे ऐके काळी चंपी मॉलीश करणारे सर जो तेचा चकराए या दिल डुबा जाओ, आ जा प्यारे पास हमारे काहे घबराय" चंपी मॉलीश, तेल मॉलिश, म्हणत रोजी रोटी कमवू शकत होता. मुंबई नाईट लाईफ ह्या बातमीनेच अनेक तथा कथित संस्कृती रक्षकांची झोप उडवली आहे. त्यातील वास्तवता न बघताच विरोधी ढोल बडवायला सुरवात झाली आहे. २४ तास हॉस्पिटल हवे असते, २४ तास लोकल ट्रेन हवी असते, भुकेलेल्या चार घास मिळण्याची सोय असावी लागते. मुंबई काही फक्त धनाढ्यांची बटिक नाही, ती तुमच्या आमच्या सामान्य माणसांसाठी सुध्दा हक्काची मैत्रीण आहे. ये शहर कभी सोता नहीं" अशा ह्या नगरीची ख्याती. या शहराबद्दल प्रसिध्द शायर म्हणतो चिन और अरब हमारा, हिंदुस्थान हमारा, रहने को घर नही है सारा जहाँ हमारा, जितनी भी बिल्डिंगे थी सेठोंने बाट ली है, फुटपाथ बम्बई के है आशियाना हमारा ।

गेल्या शतकामध्ये मुंबईतल्या कापड गिरण्या जेंव्हा जोमाने चालत होत्या त्यावेळेला राज्याच्या कानाकोपऱ्यातून गिरणी कामगार गिरणीत काम करण्याकरीता मुंबईत आले. मुळातच मुंबईत रहायला जागा कमी त्यामुळे एका खोलीत वीस कामगार रहायचे, हे शक्य होत कारण कामगारांच्या चोवीस तास चालणाऱ्या तीन शिफ्ट असायच्या. त्यामुळे प्रत्येक शिफ्टची वेळ संपल्यानंतर ती जागा उरलेल्यांना विश्रांतीसाठी मिळत असे. आजही मुंबईतल्या नामांकीत हॉस्पिटलपैकी कॅन्सरसाठी प्रसिध्द असलेले टाटा हॉस्पिटलमध्ये सबंध देशातून उपचारासाठी येणारे रुग्ण व कुटुंबे भेटतील. त्यांचा निवारा रस्त्यावर असतो, भूक भागविण्यासाठी सोय तर हवी. खरच आपण एवढे कोत्या मनोवृत्तीचे का झालो. नाईट लाईफ म्हणजे चैन, पैसा उधळणे, पंचतारांकीत हॉटेलमध्ये मेजवान्या करणे, त्या पलिकडेही मुंबई आहे. फार पूर्वी शहर और सपना नावाचा चित्रपट आला होता. त्यामध्ये घर किंवा निवारा शोधण्यासाठी रस्त्यावर दिवस काढणाऱ्या तरुणाईची कथा होती. कुसुमाग्रजांनी म्हटलेले आहे, रात्रीच्या गर्भात असे उद्याचा उष:काल.



चला तर मग या नव्या संकल्पनेला सामोरे जाताना मनातले पूर्वग्रह काढून टाकुयात आणि बघुया तर खरी तुमच्या आमच्या जीवनात हा अहोरात्र चालणारा विरंगुळा तयार कसा होतोय. ख्यातनाम लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंनी कथा मुंबईची या पोवाड्यामध्ये एक अलौकीक दर्शन घडविले आहे. त्यातल्या दोनच ओळी आजही आपल्या सगळ्यांसाठी महत्वाच्या आहेत.

**कथा मुंबईची सुरु आता करतो । इथं माणूस भवयवाणी फिरतो ॥**

